# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला. रविवार ता० ६ माहे एप्रिल सन १८७९ इसवी. अंक १३


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |

डाक हशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी पावली ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल.

| | |
|---|---|
| मे. बुलक साहेब डे. क. | ४७०२०८ |
| रा. रा. बापुजी रंगनाथ | ६००८ |
| ,, ,, रंगराव विठ्ठल जहागिरदार | २३०८ |
| मे. दोराबजी कावसजी तहशिलदार | २० |
| रा. रा. गंगाधर जेराम मल साहु | १० |
| ,, ,, हरिहर गणेश पटवर्धन | ६०८ |
| ,, ,, सखाराम मोरेश्वर खजिनदार | ६ |
| ,, ,, श्रीधर बाळकृष्ण आपटे | ६०८ |
| ,, ,, पुरुषोत्तम गणेश केळकर | २६ |
| ,, ,, गंगाधर सिताराम मास्तर | १२ |
| ,, ,, भास्कर लक्ष्मण अभ्यंकर मा. | २० |
| ,, ,, बाळाजी मोरेश्वर | २०८१३०६ |
| ,, ,, विष्णु कृष्ण श्रेष्ठी मास्तर | ६०८ |
| ,, ,, बापुजी तुकाराम | ६०८ |
| ,, ,, शंकर पाटील मुईखेडकर | ६०८ |
| ,, ,, विठोबा पा. गोरेगावकर | ९ |
| ,, ,, शितळसिंग ना. तहशिल० | ६०८ |
| ,, ,, वामन आनंदराव देशमुख | ९ |
| ,, ,, बुढाजी देशमुख झिलांगकर | ९ |
| ,, ,, गणपतराव देशमुख | ८०४ |
| ,, ,, मुकुंदा वल्लद नारोजी | ६०८ |
| ,, ,, नरसिंग यशवंतराव जमा. | ६०८ |
| ,, ,, बाळकृष्ण नारायण मा. | ६०४ |
| ,, ,, घनःश्याम भगापा मा. | ६०८ |
| ,, ,, नारो रघुनाथ माळोकर मा. | ९ |
| ,, ,, तुकाराम पा. पिळकवडी | २०१२ |
| ,, ,, महादेवराव पांडे | १२०९०२ |
| ,, ,, गणेश बल्लाळ मास्तर | १० |
| मे० आबासाहेब खजिनदार | १० |
| रा. रा. नरसो रामचंद्र वकील | १३ |
| ,, ,, जानकीराम वामन कुळकर्णी | १९ |
| ,, ,, पंढरीनाथ नारायण मुनसरीफ | १९ |
| ,, ,, मुकुंदराव देशमुख मुंडगाव | १४०३ |
| ,, ,, विष्णु आत्माराम मास्तर | ९ |
| ,, ,, मोतीराम जयगोपाळ साहू | १२ |
| ,, ,, चंद्रभानजी देशमुख झोडगे | ११०४ |
| देवीसिंग देशमुख बोरगावकर | ९४--२-८ |
| प्रल्हाद बाळकृष्ण देव | ६०८ |
| नवसाजी वल्लद महादाजी पाटील | २३ |
| हणमंतराव जसवंत देशमुख | १३-९-४ |
| राघजी घनःश्याम वकील. | ९ |
| बाळापूर लायब्ररी | ३-९ |

## जाहिरखबर.

### कृषिकर्म विद्या अथवा शेतीचें वर्णन.

या नावाचें शेतकी संबंधी बहुत माहितीचें एक नवीन पुस्तक मराठी ग्रंथोत्तेजक मंडळानें नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. त्याच्या कांहीं प्रति इकडे विक्रीस ठेविल्या आहेत. याची मांडणी साध्याची सुमार साडे पांचशें पृष्ठें आहेत. व किंमत ३०१२ आहे. बाहेर गावच्या लोकांस हा कहाशील शिवाय ०४ पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरखबर.

### नवीन स्टांप आक्ट.

सन १८७९ चा आक्ट पहिला स्टांपाविषयीं याच्या मराठी प्रती नेटिव ओपिनियन छापखान्यांत सुंदर रीतीनें छापले ल्या आमचे एथें विकण्यास आल्या आहेत. किंमत ०९ नऊ आणे. एथून बाहेर गावीं नेणारास आणखी एक आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## NOTICE.

The undersigned invites sealed tenders for the supply of the following articles (in the approximate proportions stated below) to the Akola Central Jail for six months commencing from the 1st of May 1879.

| | | Average monthly requirment. | |
|---|---|---|---|
| Wheet | about | 118 Mands of 40 seers. | |
| Jawarree | ,, | 100 | do. |
| Dhall | ,, | 45 | ,, |
| Firewood | ,, | 140 | ,, |
| Oil seeds (Thillee Alsee and Kuddee of any one kind) | ,, | 25 | ,, |
| Gram | about | 20 | ,, |
| Wool | ,, | 10 | ,, |
| Hemp | ,, | 10 | ,, |

Sealed samples in quantities of not less than a seer of each discription of articles above mentioned must accompany each tender.

A sum of Rs. 100 shall accomompaning each tender which in the case of the accepted tender will be lodged as a deposit in the Local Goverment Treasury.

Tenders will be received up to 12 noon on the 15 th of april 1879 by the undersigned and selection will be made by him subject to the approval of the Inspector General of Jails.

The undersigned does not bind himself to accept the lowest or any tender.

Conditions can be seen at the Office.

T. Hume
Suprintendent Central.
Jail Akola.

## नोटिस.

तारीख १ माहे मे सन १८७९ पासून पुढे ६ महिने पावेतो खालीं लिहिलेले सामान अकोल्याचे सेंट्रल जेलकरितां पाहिजे आहे. तें देण्याकरितां मोहोरबंद टेंडरें खालीं सही करणारास पाहिजे आहेत.

एक महिन्याकरितां जिन्नस.

लागतात ते.

| | | | |
|---|---|---|---|
| गहु | सुमार | ११८ मण (४० शेरी मण) | |
| जवारी | ,, | १०० | ,, |
| दाळ | ,, | ४५ | ,, |
| जळाऊ लाकडे | ,, | १४० | ,, |
| तेलबीजें (तीळ, अळशी, करडी, या पैकीं कांहीं) | | २५ | ,, |
| हरभरे | ,, | २० | ,, |
| लोकर | ,, | १० | ,, |
| अंबाडी | ,, | १० | ,, |

प्रत्येक टेंडराबरोबर वरील प्रत्येक जिन्नस एक शेरहून कमी नाहीं इतका मासल्या करितां मोहोरबंद पाठविला पाहिजे.

प्रत्येक टेंडराबरोबर १०० रुपयाची रकम पाठविली पाहिजे. ज्याचे टेंडर मंजूर होईल त्याची ती रकम लोकल गव्हरमेंटच्या खजिन्यांत डिपाझिट ठेविली जाईल.

टेंडरें पाठवणें तीं खालीं सही करणाराचे नावानें तारीख १५ माहे एप्रिल सन १८७९ इसवी रोजीं १२ वाजेतोंपर्यंत पाठवावी. त्यांतुन इन्स्पेक्टर जनरल आफ जेल्स यांचे पसंतीनें निवड केली जाईल.

सर्वांत कमी किमतीचें अथवा अमुक एक किमतीचें टेंडर कबूल केलें जाईल असें खालीं सही करणार आपणास बांधून घेत नाहींत.

आमचे आफिसांत शर्तींची यादी पहाण्यास मिळेल.

टी ह्यूम.
सुपिरटेंडेंट सेंट्रल जेल अकोला.

## नोटिसा

हरी वल्लद कडताजी माळी इंगळे रहाणार बेलखेड तालुके अकोट यास ओंकार बहिरोजी साहू दुकान पेठ तालुके हरदा जिल्हा हुशंगाबाद याकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्याकडे आमची जवारी ठेव ठेविली होती ती तुह्मी विकली पुढें तुह्मास मागती गेल्या श्रावण मासी तुह्मी साडे सात खंडीचा पुर्जा लिहून दिल्हा व त्यांत करार केला कीं हंगामावर खळ्यांत माल तयार झाला ह्मणजे लागलीच देऊं तसे न करूं तर सवाई ड्यौढी जबा जी मागाल तेव्हां देऊं त्याप्रमाणें हंगामावर तुह्मांस मागतां तुह्मी माल दिला नाहीं व अजूनही देत नाहीं याजकरितां तुह्मास ही नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत आमची जवारी सवाईसुद्धां अकोला एथे आमचा मुख्त्यार आहे त्याजवळ जवारीची सावकारी चिठी अथवा माल मोजून द्यावा. तसे न कराल तर तुह्मावर दिवाणींत दावा करून खर्चासुद्धां भरून घेऊं या नोटिसीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावें ता. ३१ माहे मार्च सन १८७९ इ०

(सही) ओंकार बहिरोजी विकलम
बाळाराम मुख्त्यार

## नोटिस.

राघोजी वल्लद बाघजी बहादरे जात कुणबी धंदा शेतीचा रहाणार मौजे बाघ प्रगणे महान तालुके व जिल्हे अकोले यांस आत्माराम वल्लद गंगाराम गुजराथी दुकान मौजे झोडगे प्रगणे पिंजर तालुके व जिल्हे अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आह्मास रुईचे ओझें १ गेले भाद्रपद मासी लावणी दिलें व त्याबद्दल रुपये रोख नेले व रुईचें ओझें गेले वसंत मासी देण्याचा करार केला होता तोही गुजरून गेला नंतर आह्मी तुह्मास पुष्कळ वेळ मागणें केलें. तुह्मी देतों देतों ह्मणतां परंतु देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासुन ४ दिवसांचे आंत सदहू रुईचें ओझें आणून द्यावें. सदहू मुदतींत ओझें आणून दिलें नाहीं तर त्याची चालू भावा प्रमाणें किंमत लावून या नोटिशीचे खर्चासह तुह्मावर फिर्याद करून कोर्ट खर्चासह सर्व रुपये भरून घेऊं. कळावें तारीख ३१ माहे मार्च सन १८७९ इसवी.

[सही] आत्माराम वल्लद गंगाराम
गुजराथी दस्तुर
खुद.

## नोटिस.

बापुन्या वल्लद भिवसेन मायके जात कुणबी रहाणार मौजे दापुरें प्रगणे महान तालुके अकोला यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमची तुह्माकडे खातेबाकी व्याजासह १७० एकशें सत्तर रुपये येणें आहे ते रुपये आह्मी तुह्मास कित्येक वेळा मागितले तुह्मी देतों देतों ह्मणतां पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तरी पावल्यापासून १५ दिवसांचे आंत सर्व रकमेची अदाई करावी. न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्ट खर्चासह व नोटिशीच्या खर्चासह सर्व रुपये घे-

तर्फे जातील. कळावें तारीख २६ माहे मार्च सन १८७९ इसवी.

(सही) गणेशराम सवाईराम दुकान तर्फे झर्लाग तालुके अकोले दस्तुर जगन्नाथ

---

नोटिस.

त्र्यंबक रामजी जोध व नारोबा झाबाजी भालेराय रहाणार पातुर शेखबाबू तालुके बाळापुर जिल्हे अकोले यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझे मालकीचें घर पातुर शेखबाबू एथें दुकान बजारांत आहे तेथें हल्लीं नारोबा भालेराय रहात आहे.

१ त्र्यंबक रामजी जोध हा तें घर नारोबा भालेराय यांस नोंदून देणार आहे ह्मणून मी परस्परें ऐकिलें मुळीं मी असतां त्र्यंबक यास नोंदून देण्यास, बक्षीस देण्यास किंवा गहाण देण्यास अधिकार नाहीं. जर तो माझे संमतीवाचून कोणास लिहून देईल तर धोगारा बुडेल. घेणारानें विचार करून घ्यावें.

२ नारोबा भालेराय यांजला दहापांच वेळां मी घर खालीं करून मागितलें असतां देतों ह्मणून बोलला परंतु देत नाहीं ह्मणून आज तारखेपासून १५ दिवसांचे आंत त्यानीं घर खालीं करून द्यावें.

येणेंप्रमाणें उभयतां या नोटिशीनें कळविलें आहे त्याप्रमाणें झालें नाहीं तर मे महिन्याची सुट्टी संपतांच कोर्ट खुलें झाल्याबरोबर कोर्टमार्फत घर खाली करून घेतलें जाईल. व फिर्यादीचा खर्च व या नोटिसीचा खर्च तुह्मास देणें येईल. सबब उभयतांस या नोटिशीचे द्वारानें कळविलें आहे. कळावें. तारीख १९ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

(सही) सानाबाई जवजे लक्ष्मण जोध रहाणार पातुर हल्लीं मु० दहिहंडा निशाणी खुद हातची

---

## वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र शुद्ध १५ शके १८०१

---

## दोन प्रतिष्ठित घराण्यांतील कलह.

कैलासवासी रा. रा. नारसिंगराव मुनशी वकील व शेट भगुलाल ताराचंद यांच्या कुटुंबांत ठेविच्या संबधानें बरेच दिवसांपासून आमचे एथें एक मुकद्दमा चालू होता. त्याचा या आठवड्यांत अपिलांत मे. जुडिशियल कमिशनर साहेबांचे कोर्टांत निकाल झाला आहे. हा मुकद्दमा मोठे महत्वाचा असून ह्या संबधांतील दोन्ही पक्षाचे लोक प्रतिष्ठित आहेत. ह्मणून त्यांतील हकिकत आज आह्मी आपले वाचकांस कळवितों.

शेट भगुलाल ताराचंद हे मोठे नामांकित संपन्न सहुकार होते ते मरण पावले तेव्हां यांच्या पत्नी पन्नाबाई ह्या तरुण व सुबुद्ध असल्यामुळें त्यांनीं आपले मोठे दुकानचीं नानातऱ्हेचीं कामें पहाण्यास कोणी तरी चांगला सभ्य चालीचा गृहस्थ असावा ह्मणन भगुलालजीच्या वेळेपासून नरसिंगरावजीचा त्या दुकानाशीं वकीलीचा संबध होता ह्मणून नरसिंगरावजीस त्यांना आपले तीर्थरूपाप्रमाणें मानून त्यांच्या सल्ल्यानें त्या वागू लागल्या. पुष्कळ मोठमोठाली कोर्ट संबधी कामें नरसिंगरावजीच्या हातून पन्नाबाईनें करविलीं. त्यामुळें परस्परांत निष्कपट स्नेह चालला. असा संबध चालू असतां नरसिंगरावजीनीं त्या दुकानाशीं पैशाचा व्यवहारही केला. हजारों रुपये द्यावे घ्यावे असा परस्परांत व्यवहार होत होत असतां एकेवेळीं नरसिंगरावजीनीं ४७०० रुपयांची रकम पन्नाबाईचे जवळ अनामत ह्मणून ठेविली. कांहीं दिवस पन्नाबाईनें ती रकम आपले जवळ ठेवून उपयोग नसल्यामुळें परत देण्याचें मनांत आणिलें. तेव्हां नरसिंगरावजी यानीं त्यांच्यापासून ती रकम काढून त्यांच्या दुकानांत जें आपलें चालू खातें पुष्कळ मोठें चाललें होतें त्यांत जमा करविली. दुकानांत आपली रकम जमा करवून नरसिंगरावजी यांणीं दुकानदारापासून एक सरकत घेतली. पुढें आणखी कित्येक रकमा दिल्या घेतल्या त्यांत ह्या रकमेचीही भराई करून घेतली. कांहीं दिवसांनीं नरसिंगरावजी मरण पावले. त्यांच्या मरणानंतर त्यांनां एक कुटुंबाचा एक व दुसरे कुटुंबाचे दोन असे तीन मुलगे आहेत त्यांच्यांत वाटणीच्या संबधानें कलह होऊं नये. ह्मणून त्यांचे अति जिव्हाळ्याचे अपत्य रा. रा. मल्हारराव सदाशिव माजी तहशिलदार यांणी गांवांतील चार सभ्य गृहस्थ जमवून आपण त्यांत मिळून पंचाईत करून मयतास देणें घेणें काय आहे याचा तपास करून देणें होतें तें सर्व देऊन टाकून बाकी राहिलेली मिळकत तिघं मुलांस सारखे हिश्शानें वाटून दिली.

नरसिंगरावजीचे ४७०० रुपये पन्नाबाईजवळ आहेत ते मिळावे ह्मणून मुलांनीं पंचाइतीचे वेळेस पंचांस ह्मटल्यावरून पंचांनीं नरसिंगरावजीचे हातच्या वहींतील सदरी रकमेबद्दलचा जमाखर्च पाहून पन्नाबाईस मागणें केलें. पन्नाबाईनें सांगितलें कीं, नरसिंगरावजी जिवंत असतांच ही रकम त्यांना पावली आहे. व आतां उलटी दुकानची रकम त्यांच्याकडेस घेणें निघत आहे. त्यावरून पंचांनीं त्यांच्या वह्या मागवून पाहिल्या व पुष्कळ तपास केला. आणि पन्नाबाईच्या गुमास्त्यानें सांगितलें कीं, ही रकम नरसिंगरावजीनें घेऊन आपले कुटुंबास दिली त्यावरून नरसिंगरावजीचे कुटुंब गयाबाई यांना विचारिलें, त्यांनीं पंचासमक्ष कबूल केलें कीं, रकम मजकडेस आली आहे. त्यावरून पंच व सरपंच यांनीं ती रकम दोन मुलांचे हिश्शाबद्दल जी रकम गयाबाईस देण्याची त्यांत धरून गयाबाईजवळ असलेल्या नगदीच्या रकमेंत सामील करून पन्नाबाईचे दुकानचें खातें पुरें करून नरसिंगरावजीचे जें चिठ्ठर घेणें तें वजा करून पन्नाबाईची अखेरीस देणें निघालेली रकम त्यांनां देऊन त्यांचे दुकानची पावती घेतली व ती मुलांस दिली. याप्रमाणें निकाल झाल्यावर कांहीं दिवसांनीं गयाबाईनें पुन्हा पंचांस नोटिस दिली कीं, ४७०० रुपयांच्या रकमेबद्दल आणखी तपास करा. त्यावरून पंचांनीं पुन्हा पन्नाबाईच्या वह्या मागविल्या परंतु तक्रार काय आहे ती दाखविण्यासाठीं गयाबाईकडून कोणी आलें नाहीं ह्मणन त्यांनी वाट पाहून अखेरीस पन्नाबाईच्या वह्या परत केल्या. पंचाइतीनंतर सरासरी एक महिन्यानें पुन्हा गयाबाईचे मुखत्यार व नरसिंगरावजीचे ज्येष्ठ चिरंजीव यांणीं पन्नाबाईस जमाखर्च दाखविण्याचें ह्मटलें त्यांनीं पुन्हा जमाखर्च दाखविले. आणि पंचांनीं एक ४६९ रुपयांची चांदीची रकम पन्नाबाईस पंचाइतीचे वेळेस त्यांची ती चांदी असल्याचें त्यांनां दिसून आल्यावरून देवविली होती. त्या रकमेचा दुकानच्या वहीखात्यांत जमाखर्च नाहीं असें त्यांनां (नरसिंगरावजीकडील लोकांस) दिसून आल्यावरून त्यांनीं पन्नाबाईवर लागलींच थोडे दिवसांनीं फिर्याद करून ती रकम वसूल केली.

नरशिंगरावजी सन १८७३ सालांत मरण पावले तेव्हां पंचाईत होऊन पन्नाबाईचें खातें पुरे होऊन पंचानीं त्यांची रकम त्यांनां दिली. सन १८७४ सालांत ४६९ रुपयांबद्दल फिर्याद होऊन निकाल झाला. तेव्हांपासून सन १८७७ पर्यंत उभयतांत कांहीं एक वाद नव्हता. सन १८७७ सालीं गयाबाईनीं पन्नाबाईवर ४७०० रुपयांबद्दल फिर्याद केली व डिपुटी कमिशनर साहेबांनीं गयाबाईचेवतीनें फैसल दिला. त्यावर पन्नाबाईनीं अपील केलें व अपिलांत पन्नाबाईच्या वतीनें निकाल झाला.

या हकीकतींत उभय पक्षांस अनुकूल गोष्टी कोणकोणत्या होत्या व त्यांत खरें काय असावें याबद्दल थोडा विचार करूं.

४७०० रुपये पन्नाबाईजवळ ठेविल्याबद्दल नरशिंगरावजीनीं आपले हातचे एका वहींत लिहून ठेविलेलें आहे. वे रकम परत आल्याचा दाखला नरशिंगरावजीच्या वहींत नाहीं. पंचांपैकीं मल्हारराव आबा व रामुलाल हे (जरी पंचानीं ही रकम गयाबाईजवळ आहे असें ठरविलें आहे तरी) ह्मणतात कीं गयाबाईनीं पंचासमक्ष रकम कबूल केली नाहीं. पंचाईत झाल्यावर थोडक्याच वेळानें गयाबाईनीं ४७०० रुपयांबद्दल पुन्हा तपास करावा ह्मणून पंचास नोटिस दिली. इतक्या गोष्टी गयाबाईस अनुकूल आहेत, ह्मणजे त्यांच्याकडून दाखविण्यांत आल्या आहेत.

नरशिंगरावजीच्या खानगी वह्यांत या रकमेच्या संबधानें साग्र जमा खर्च मुळींच नाहीं, ज्या रकमा नरशिंगरावजीनीं घेतल्या ह्मणून मुकद्दम्यात कबूल केलें आहे त्याही रकमा त्या वहींत जमा नाहींत, तेव्हां नरशिंगरावजीच्या वहींत एकंदर रकम जमा नाहीं ही गोष्ट बादीस अनुकूल होत नाहीं, ४७०० रुपये दुकानांत जमा करून पन्नाबाईनीं नरशिंगरावास सरकत करून दिली होती त्या सर्व रकमेची भराई झाल्यानंतर ती सरकत परत आणून घेतलेली आहे पन्नाबाईचे जमा खर्च ज्या ज्या गुमास्त्याचे हातचे आहेत ते सर्व सयत आहेत, पंचापैकीं प्रतिष्ठित तीन पंच ह्मणतात कीं गयाबाईनीं आपल्याकडे रकम कबूल करून घेतली पंचानीं ज्या खात्यांत ४७०० रुपयांची रकम जमा होती त्याच खात्याची तपासणी करून अखेर रकम पन्नाबाईची देणें निघाली ती त्यांनां देऊन त्यांची पावती घेतलेली आहे, गयाबाईचे तीर्थरूपानीं पंचाइतीचे वेळेस एक हिशेब लिहिला आहे त्यांत ४७०० रुपयांची रकम परत कशी पावली याविषयीं तपशील लिहिला आहे. पंचाईत झाल्यावर पंचास पुन्हा नोटिस जरी दिली तरी गयाबाईनीं ४७०० रुपयाची रकम आपणास पावली नाहीं असें दाखविलें नाहीं, व ४६९ रुपयांबद्दल दिसून येतांच फिर्याद करून रकम वसूल केली असें असतां या रकमेबद्दल सुमार ४ वर्षें कांहीं तजवीज केली नाहीं, पंचनाम्यांत ४७०० रुपयांची रकम पन्नाबाईकडून घेणें आहे असें मुळींच लिहिलेलें नाहीं इतकेंच नाहीं परंतु गयाबाईच्या जवळ ५०६० रुपये नगदी आहेत ह्मणन लिहिलें आहे त्यांतच ही रकम सामील आहे असें सर्व पंच ह्मणतात. आणि पंचानीं नरशिंगरावजीचें सर्व देणें घेणें पहून चिठ्ठर आणा पै सुद्धां निकाल केला व तो पंचनाम्यांत लिहिला. असें असतां ४७०० रुपयांची रकम जर पन्नाबाईजवळ अमानत होती तर त्या संबधानें ते पंच त्यांत कांहींच न लिहिते व त्याच खात्याची शेवटची बाकी पन्नाबाईस देऊन तिची पावती घेते हें संभवत नाहीं. इतक्या गोष्टी पन्नाबाईकडून दाखविण्यांत आल्या आहेत.

एक सालची एक कच्ची कीर्द पन्नाबाईनीं हजर केली नाहीं याबरून गयाबाईचें ह्मणणें होतें कीं ती त्यांनीं मुद्दाम दाबून ठेविली. व अवलकोर्टानेंही ह्मटलें आहे कीं, सदर्हू वही कोर्टांत दाखल न होणें ही गोष्ट संशय उत्पन्न करिते. त्याविषयीं पन्नाबाईचें ह्मणणें असें आहे कीं, आमचा एक गुमास्ता लबाडी करून पळून गेला. त्यानें ती वही चोरून नेली, तथापि ती पंचांनीं पाहिली होती व त्या वहीचा उतारा पंचाइतीच्या वेळेस नरशिंगरावाचे मुलांनीं नेला आहे, व त्यापैकी दफ्यास लागूं पडण्या इतका नरशिंगरावजीकडील मनुष्याचेच हातचा उतारा आहे तो दाखल केला आहे. हा उतारा खरा आहे ह्मणून नरसिंगरावजीचे मुलानीं कबूल केलें आहे. यावरून वही हजर नाहीं तरी संशयास कांहीं जागा नाहीं, असें आह्मास वाटतें.

अवलकोर्टानें गयाबाईचे वतीनें निकाल केला तथापि प्रतिवादीच्या बचा खोट्या आहेत किंवा वादीचा पक्ष मजबूद आहे असें ह्मटलें नाहीं. सर्व पुराव्याचें वजन पन्नाबाईस अनुकूळ आहे असें या कोर्टानें कबूल केलें आहे. व सदरील हकीकतीवरून आह्मासुद्धां असेंच वाटतें कीं,

पन्नाबाईचा पक्ष फार मजबूद आहे. जरी पंचाईत झाल्यावर लवकरच गयाबाईनें पंचास ४७०० रुपयांबद्दल तगादा करा ह्मणून ह्मटलें हें त्यांच्या पक्षास साधक आहे. तरी १९ दिवसांत लागलींच पंचास नोटिस दिली. त्यांनीं या मोठ्या रकमेकरितां ४ वर्षे कांहीं खटपट न करितां स्वस्थ बसावें हें त्यांच्या पक्षास सामान्य बाधक आहे असें नाहीं. शिवाय आह्मास वाटतें कीं, पंचाइतींत जे गृहस्थ होते ते चांगले प्रतिष्ठित होते. त्यांनीं ४७०० रुपयांचे रकमेचा वाद (दोन पंच ह्मणतात त्याप्रमाणें) तसाच कायम ठेवून त्याविषयीं पंचनाम्यांत कांहीं उल्लेख केला नसता हें बिलकूल संभवत नाहीं. त्याप्रमाणें ४७०० रुपयांची रकम पन्नाबाईकडे आहे. असें माहित असतां. त्यांच्या खर्चाचा हिशेब करून चुकती रकम त्यांना देऊन त्यांची पावती पंचांनीं नराशिवजीचे लोकांस देवविली हें जर खरें हे तर पंचाइतींतही ४७०० रुपयांची रकम निकाल होणें राहिली होती असें ह्मणणें आमच्या मतें केवळ असमंजसपणाचें आहे. व जे दोन पंच असें ह्मणतात ते कांहीं दूषित मनानें तसें ह्मणत असतील असें सहज विचार करणारास दिसून येईल.

याप्रमाणें दोन्ही पक्षाचा मजकूर ज्या अर्थी आह्मी वर समग्र दर्शविला आहे. त्या अर्थी अपील कोर्टानें पन्नाबाईच्या तर्फेनें फैसल देतांना फार चांगला व पोक्त विचार केला असें निराळें सांगावयास नको आहे. ही हकीकत वाचूनच कळणार आहे कीं या वादांत हाच निर्णय होणें न्याय्य आहे.

आतां या मुकदम्याचे संबंधानें आह्मास एक विशेष गोष्ट सांगावयाची बाकी राहिली आहे ती अशी:—

पन्नाबाईचे पक्षास इंग्रजी जाणणारे वकील आहेत व मुकदमा मोठ्या महत्वाचा आहे ह्मणून चांगल्या विद्वानाची सहाय्यता आपल्यास असावी यासाठीं गयाबाईनीं मि. आर. एन. मोटाभाई बारिस्टर यांस आपल्याकडून नेमिलें होतें. हे गृहस्थ चांगले मोठ्या घराण्यांतील असून विलायतेहून बारिस्टरची पदवी मिळवून आलेले आहेत. यांनीं मुकदम्याची माहिती करून घेण्यासाठीं जु० कमिशनर साहेब पाशीं मुदत मागून घेतली होती व माहिती करून घेतली होती. पुढें कोर्टांत मुकदमा चालू झाला तेव्हां विरुद्ध पक्षाकडील वकील रा. रा. देवराव विनायक यांचें बोलणें संपल्यानंतर आपण स्वतां त्यांचें खंडण करावयाचें व आपल्या पक्षाकरितां बोलण्याचें ते कांहीं न करितां ते उगीच स्वस्थ बसून राहिले. मग त्या पक्षाचे दुसरे नेटिव वकील होते ते कांहीं बोलले असें आह्मी ऐकतों. हें जर खरें असेल तर फार वाईट आहे. कोर्टांत वाद करणारे लोकांस मोठी उमेद काय ती बारिस्टराची असते. तेव्हां बारिस्टरांनींच जर मुकदमा समजून घेऊनही बे[illegible]र तो चालविला नाहीं कीं वा त्यांत आपले पक्षाचे प्रतिपादनार्थ कांहीं भाषण केलें नाहीं. तर त्यास नेमणारे पक्षकरांची मोठी नाउमेद होणारी आहे व आपले पैसे फुकट गेले असें त्यांस वाटू लागणारें आहे. व तशीच चर्चा हल्लीं गांवांत चालू असल्याचें आह्मी ऐकतों.

मुकदमा मोठ्या महत्वाचा होता व पक्षास कितक्या संभवनीय हकीकती होत्या त्यांचें खंडण पूर्णपणें व्हावें ह्मणून गयाबाईकडील लोकांनीं बारिस्टर नेमिलें होतें तेव्हां त्यांनीं वेळेवर आपला पक्ष उणा दिसूं द्यावयाचा नव्हता. जर त्यांनां या मुकदम्यांत कांहीं बोलण्या जोगें दिसत नव्हतें तर त्यांनीं मुळींच हा मुकदमा चालवावयास घ्यावयाचा नव्हता. आतां स्वतां न बोलण्यांत आमचे बारिस्टर साहेबांचा जर इतकाच हेतु असेल कीं पक्ष उणा आहे सबब आपण कांहीं बोलू नये. तर अशा प्रसंगीं काम घेऊन कोर्टांत जाऊन स्तब्ध बसण्यापेक्षां मुळींच काम न घेतां पक्षकारास सांगावयाचें होतें कीं तुझा पक्ष उणा आहे तूं भांडूं नको. व पैसे खराब करूं नको. आणि जर असें ते करते तर त्यांस तें मोठें भूषण झालें असतें. चांगले प्रतिष्ठित वकील असें करीत असतात असें आह्मांस ठाऊक आहे.

आमच्या या प्रांतांत विद्वान बारिस्टर लोक येऊन लोकांस न्यायाचे कामांत चांगली मदत मिळत जावी अशी आमची इच्छा आहे. व तीसाठीं मि. मोटाभाई यांस अशी शिफारस करितों कीं त्यांनीं आप आपल्या विषयीं लोकांत भलताच ग्रह होईल असें न वागतां आपल्या विद्येचा या आमच्या अडाणी प्रांतास चांगला उपयोग होऊं द्यावा. व या पुढें ते तसें करीत जातील अशी आह्मी उमेद बाळगतों.

हा खटला एथील दोन सभ्य घराण्यांतील स्त्रियांत उत्पन्न झालेला आहे. व थोडे अल्प विच्यारानें या दोघी पैकीं एकीचें पुष्कळ नुकसान झालें आहे याबद्दल आह्मांस वाईट वाटतें. आमच्या मतें हा वाद वास्तवीक आपसांत मिटवावयाचा होता. यांत दिवाण दरबार पाहण्याची बिलकुल गरज नव्हती. जर गयाबाईनीं गांवांतील च्यार सभ्य गृहस्थांस जमवून त्यांनां या गोष्टीचा निवाडा करा असें ह्मटलें असतें तर बिन खर्चानें हा न्याय झाला असता व आजचा प्रसंग आला नसता. असो. पुढें तरी लोकांनीं कोर्टांत जाण्यापूर्वीं आपला चांगला विच्यार करून जात जावें व होईल तेथवर आपसांत च्यार थोर गृहस्थांच हातून आपले वाद मिटवून घेत जावेत असें आह्मी इच्छितों.

## वऱ्हाड.

मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी आय ई यांच्या मानपत्रानिमित्त १४ वे तारखेस जनरल सभा होणार आहे.

कर्नल बेल साहेब जुडिशियल कमिशनर काल रोजीं चिखलदऱ्याकडे जाण्याकरितां एथून गेले.

मेजर बुलक साहेब डिपुटी कमिशनर काल सायंकाळचे गाडींतून मुंबईकडे गेले. त्यांना पोंचविण्याकरितां बहुत मंडळी स्टेशनावर गेली होती. व या आठवड्यांत त्यांस भेटण्याकरितां कित्येक मंडळी बाहेरून आली होती. बुलक साहेबांनीं उत्तम रीतीनें काम करून रयतेस फार सुख दिलें याकरितां त्यांनां टौनहालांत पानसुपारीकरितां बोलावण्याचा मंडळीचा विच्यार झाला होता परंतु त्यांनीं असा समारंभ आपणाकरितां नको आहे. घरगुती रीतीनें आपण सर्वांच्या भेटी घेऊं असें सांगून तो बेत रहीत करविला.

मे० लाटण साहेब डिपुटी कमिशनर लवकरच नरनाळ्यावर जाणार आहेत.

मि० कीज साहेब कमिशनर साहेबांचे हेड क्लार्क रजेवरून परत आले. तेव्हां मि० स्टसी साहेब, मि. जॉन्स साहेब, व मि. मकई साहेब आतां आपआपल्या जागांवर मागें जातील. कीज सा. पेनशन घेणार अशी बोलवा होती तो बेत रहित झाला कीं काय न कळे.

एथील नायब तहशिलदार मि. खिराजुदीन दीड महिन्यांची रजा घेऊन स्वदेशीं गेले त्यांचे जागेवर डिपुटी कमिशनर आफिसांतील कारकुन रा. रा. जयकृष्ण केशव देशपांडे यांस नेमिलें व त्यांच्या जाग्यावर रा. रा. हरी विनायक देवधर यांस नेमिलें.

रा. रा. बापुजी रंगनाथ, रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी, रा. रा. दामोदर भिकाजी जठार, रा. रा. वामनराव नारायण बापट, इत्यादि मंडळी गेल्या आठवड्यांत एथें आली होती ती परत आपआपले कामावर गेली.

जळगावचे नायब तहशिलदार रा. रा. भिकाजी चिमणाजी यांनां पेनशन घेण्याचा हुकूम मिळाला. व त्यांचे जागेवर हुजूरांतून रा. रा. नरसो यशवंत यांस अकट-नेमिलें हें ऐकून आह्मांस संतोष होतो. नरसोपंत हे मोठे हुशार कारकून व बहुत दिवसांचे जुने असतां बराच काळ मागें पडले होते. पण शेवटीं त्यांची हुशारी डिपुटी क. साहेबांनीं मनांत आणून त्यांनां नायब तहशिलदार केलें हें चांगलें झालें. असें ऐकण्यांत आलें होतें कीं ही नायब तहशिलदाराची जागा वाशीमचे राजे उदाराम यांचे घराण्यांतील रा. रा. काशिनाथ राव यांस काम शिकण्याकरितां द्यावी व सुमार निमा पगार त्यांस द्यावा. पण त्याप्रमाणें घडलें नाहीं असें दिसतें.

मि० सी. भिमराव साहेब अख्याची यांस दोन महिन्यांची रजा मिळाली.

कर्नल बुषबी साहेब बुलढाण्याचे डिपटी कमिशनर यांणीं तीन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागेवर मे० थामसन साहेब आसिस्टंट कमिशनर यांस नेमिलें.

असे वर्तमान आहे कीं एथील मिडल क्लास स्कुलावरील कायमचे मास्तर रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर सुमार १० महिने झाले रजेवर आहेत व या महिन्याचे २४ वे तारखेस त्यांची रजा संपते तरी आणखी दोन महिन्यांची रजा घेण्याचा त्यांना विचार आहे— याच मिडल क्लास स्कुलांतील फर्स्ट असिस्टंट मास्तर रा. रा. हरी धोंडदेव भाटवडेकर यांनीं ३ महिन्यांची रजा घेतली त्यांचे जागेवर रा. रा. महादाजी गंगाधर लिमये यांस नेमिलें व ते येऊन आपलें काम पाहू लागते.

रा. रा. पुरुषोतम गणेश केळकर वाशिमचे हेडमास्तर यांनीं पहिले तारखेपासून दोन महिन्यांची रजा घेतली व ते मंगळवारीं एथें येऊन गुरुवारीं मुंबई पुण्याकडे गेले. त्यांचे जागेवर अॅक्टिंग कोणी न नेमतां असलेल्या मास्तर लोकांतच डायरेक्टर साहेबांनीं व्यवस्था केली असें समजते.

हैदराबाद व सिकंदराबाद एथें वकिली करितां असलेले मि० ब्ल्यकबर्न साहेब यांस वऱ्हाडांत सर्व ठिकाणीं वकिली करण्याची सरकारांतून परवानगी मिळाली.

हवा दिवसानु दिवस अधिक कडक होत चालली आहे. तरी सुखाची गोष्ट कीं, पाऊस या वर्षीं पुष्कळ पडला असल्यावरून पाण्याची समृद्धी बरी आहे.

हैदराबादचे कोरिनेट नवाब शमसुल उमराव साहेब थोडे दिवस मुंबईस रहावयास जाणार आहेत.

उमरावतीचे पोलिस इन्स्पेकटर रा. रा. कृष्णराव सखाराम काल एथें आले आहेत.

वाशिम ( मित्राकडून ) एथें म्युनिसिपालिटीचें काम हल्लीं मि० शाबसला साहेब तहशिलदार हे पहात आहेत. ते फार मेहनत घेऊन काम करितात. बाजारांत झाडें लावण्याच्या कामीं हल्लीं त्यांचे सक्त प्रयत्न चालले आहेत.

वाशिमास एक मिशन स्कूल स्थापन झालें आहे व त्यावर एक कानव्हर्ट मास्तर नेमिला आहे.

उमरावतीचे तहशिलदार रा. रा. गिरराव रामचंद्र या आठवड्यांत एथें आले होते. त्याचप्रमाणें अकोटचे तहशिलदार मि० दोराबजी कावसजी, बाळापूरचे तहशिलदार रा. रा. सखाराम दत्तात्रय, जळगावचे तहशिलदार मि० आर्देसर दिनशाजी हे मे० बुलक साहेब यांस भेटण्याकरितां एथें आले होते.

## वर्तमानसार.

अयोध्या प्रांतांत जुडिशियल खात्यांत हिंदुस्थान सरकारानें नवीन सुधारणा करून मि० सय्यद महमदखान बारिस्टर ऑट लॉ यांस जज्ज नेमिलें आहे. मि. सय्यद महमदखान हे बनारस एथील सय्यद अहमदखान सी. एस. आय. यांचे चिरंजीव होत.

रंगूनकडून पुन्हा अस्वस्थतेची बातमी आली होती परंतु ता. ६ मार्चच्या तारेवरून आतां तिकडील स्थिति असमाधान मानण्यासारखी नाहीं. या तारेंत असें लिहिलें आहे कीं इंग्रज लोकांचें सैन्य ब्रह्मदेशांत खास येत आहे असें ब्रह्मदेशाचे राजास कळल्यावरून तो आतां इंग्रज सरकारचें ह्मणणें ऐकण्यास तयार आहे अशी भावना ठेवण्यासारखी बातमी आहे याचे मुद्दा प्रधान लौकरच रंगून एथें येणार आहेत व या वेळीं तहांत कांहीं कठीण कलमें घातलीं तरी ब्रह्मदेशाचा राजा मान्य करील असा सर्व साधारण समज झाला आहे.

फेब्रुवारी महिन्यांत ३८९४९१० रुपयांचा कापूस मुंबई बंदरांतून बाहेर गेला.

बनारसनिवासी व ठ्या पराचे स्वातंत्र्याविषयीं अलाहाबाद एथील पायोनियर पत्रांत कोणी एक पत्र लिहिलें आहे व त्यांत ह्मणे असें विचारिलें आहे कीं विलायतीं कायद्यांतील कलमांत कर घ्यावयाच्या रस्त्यांत जर हिंदु आहे तर हिंदुस्थानांतून विलायतेस जाणाऱ्या कापडावर न घेता वार इग्लंडानें कशास घेऊं देतोच नाहीं काय?

हल्लीं तालुक्यांत तेनपुर गावीं दोन दिवसापूर्वीं बाजार भरला असून त्या वेळीं दरवडेखोर येऊन त्यांणीं पेठ लुटली व त्या वेळीं त्यांणीं १ पुरुष व २ बायकांस मारहाण केली अशी येथें बोलवा असून बंदोबस्तासाठीं पुणाहून पोलिसचे लोक रवाना झाले आहेत असें कळतें.

भोर इलाख्यांत गांवोगांवीं लोकांची बंडाळी फार माजली असून त्यांचा पाडाव करण्याकरितां श्रीमंत पंत सचीव साहेब यांणीं मुंबई सरकाराकडे मदत मागितली आहे ह्मणून पुण्यास बोलवा आहे.

गेल्या गुरुवारीं २०० रामोशी लोकांची एक टोळी दरवडा घालण्याचे उद्देशानें पुणें शहरालगत कांहिं कोसांपर्यंत येऊन परत गेली. सदर्हू संबंधानें पोलीस तपासांत आहे, ह्मणून वगैरे मजकूर बोलतात.

सातारच्या राजाच्या घराण्यांतील "जंगली राजे" हे हल्लीं सिंध प्रांतांत सरकारच्या अटकेंत आहेत त्यांत ब्रह्मसमाजाचें मत रुचतें ह्मणून त्यांनीं तिकडे एक गुजराथी ब्रह्मसमाज किंवा प्रार्थनासमाज स्थापला आहे.

हिंदुस्थानांतील प्राचीन कमांकेस गवई तानसेन याच्या वंशांतील अमृतसेन हाडि मोठा गाणारा आहे. तो जयपुरच्या राजाच्या पदरीं आहे हा अलीकडे अपल्या इतमामासुद्धां फिरावयास निघाला आहे. त्याला भोपाळच्या बेगम साहेबांनीं १५ हजार रुपयांची देणगी दिली. तो

हल्लीं इंदूरास होळकर सरकारास भेटावयास आला आहे.

गुदस्तां तुर्कीस्तान व रशियेंत लढाई झाली तिजमध्यें रशियन लोकांनीं दिलेल्या खंडणीची याचप्रमाणें अनेकांची निघाली. एकंदर युरोपचे ज्या हातीं ९१० दिवसांत निघाल्यात त्यांत कांहीं देणें सुमारें १३ कोटि रु. होती व त्यांची फेड करण्याकरितां त्यांच्यापाशीं ४ कोटि रु. होते म्हणून रुपयांस ३ किंवा ४ आण्याप्रमाणें देऊन तडजोड केल्या.

लंडन एथून तारीख २७ मार्च रोजीं आलेल्या तारेवरून असें कळतें कीं, रशियन सरकारानें युरोप खंडांतील मोठमोठाले राष्ट्रांस एका खलित्यानें असें जाहिर केलें आहे कीं, रोमेलिया प्रांतावर कबजा रशियन सरकारच्या सैन्यानें पूर्ण रीतीनें सोडल्यानंतर सदर्हू प्रांतांत शांतता कायम ठेवण्याकरितां युरोप खंडांतील सर्व राष्ट्रांचें मिळून एक १५ हजार शिपायांचें सैन्य टेवावें.

---

## रामजोशीकृत कविता.

अथवा

लावण्या भाग दुसरा

या पुस्तकाची प्रथमावृत्ति लवकरच खलास झाल्यामुळें हल्लीं दुसरी आवृत्ति विशेष सुधारून टाईपानें छापिली आहे प्रथमावृत्तीपेक्षां या खेपेस कांहीं उत्कृष्ट नवीन लावण्या घालून टीप वगैरे दिल्या आहेत. याची किंमत पूर्वीप्रमाणें अगदीं थोडी ह्मणजे अठ आणे ठेविली असून बाहेर गांवीं मात्र टपालखर्चाबद्दल अर्धा आणा अधिक पडेल. पुस्तकें पुण्यास आमच्याकडे किंवा ज्ञानप्रकाश व शिवजी छापखान्यांत मिळतील. कळावें तारीख १८ डिसेंबर सन १८७९ इसवी.

शंकर तुकाराम शालिग्राम

वऱ्हाडसमाचार छापखान्यांतही हीं पुस्तकें विक्री करितां आलीं आहेत.

---

## बापुगोखल्याचें चरित्र.

जुन्या बखरीचे आधारानें हें नवीन उत्तम पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यास तयार केलेलें आमच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलें आहे याची किंमत १ रुपया असून टाकहशील एक आणा आहे अगदीं अलिकडील ह्मणजे पेशवाई अखेरच्या या शूर पुरुषाचें नाव सर्वत्र मशहूर आहे. तव व त्याचें यथार्थ व साद्यंत चरित्र बहुतांस वाचावयास व संग्रहीं बाळगण्यास उत्साह असेल ह्मणून आह्मी मुद्दाम याच्या प्रती विक्रीस आणविल्या आहेत. सर्वांस कळावें तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८७९

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

## हुन्नर संग्रह भाग १ ला.

किंमत दर प्रतीस ८ आणे.

या विद्या, कला कौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या १०० हुन्नरांचा समावेश केला आहे. यांत एकंदर सात प्रकरणें केलीं आहेत, तीं येणेंप्रमाणें:— १ रंग १ सुगंध ३ रंगारी, ४ मिश्रधातु ५ आगकाड्यांचा कारखाना, ६ छापखान्या संबंधी माहिती, ७ किरकोळ उपयुक्त विषय. टिकिट पाठविणारांनीं अर्धा आणा दराच्या व दर रुपयास अर्धा आणा वर्तकमिशन खालीं सही करणाराकडे, अथवा आह्माकडे वऱ्हाडसमाचार छापखान्यांत अकोलें एथें पाठविल्या असतां पुस्तकें तावडतोब रवाना केलीं जातील. बाहेरगांवच्या लोकांस टपालखर्च अर्धा आणा पडेल. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

गोविंद मोरोबा कारलेकर.
नळाबर पंचमुखी मारुतीची गल्ली.
घर नंबर १०९ मुंबई.

---

## जाहिरात.

ब्रिटिश इंडियांतील चांदीचे नाण्यास करकोचे पाडण्याची किंवा खूण करण्याची किंवा इतर रीतीनें त्या नाण्याला विरूप करण्याची वहिवाट पडली आहे. याजकरितां असें नाणें कोणी कोणास देण्यास आणिलें असतां कोणी घेऊं नये. आणि तारीख १ जून सन १८७९ इसवी रोजीं व त्यानंतर असे प्रकारचें नाणें वऱ्हाडांत सरकारी देण्यांत कोणी आणिलें असतां तें घेऊं नये. असा सरकारचा इरादा आहे. आणखीही असें कळविण्यांत येत आहे कीं, असें विरूप झालेलें नाणें उपाचें वजन येग्य रीतीनें मापल्याशिवाय कमी झालें आहे. तसें नाणें वर लिहिलेले तारखेस व त्यापुढें सरकारी खजिन्यांत आणिलें असतां त्याचे मोडून तुकडे केले जातील. व सदर्हू तारखेपासून या बाबदींत जो कायदा आहे तो सरकार अमलांत आणतील. कळावें. तारीख २४ माहे मार्च सन १८७९ इ०

W. B. Jonse
कमिशनर मु. अ. हैदराबाद.

---

### नोटिस.

सर्वत्रांस कळविण्याकरितां प्रसिद्ध करण्यांत येतें कीं, उमरावती जेलांत व पागलखान्यांत जें सामान लागतें तें खालीं लिहिल्याप्रमाणें पुरविण्याकरितां जे कोणी मक्ता घेण्याची इच्छा करतील त्यांनीं जेलचे सुपरिंटेंडेंट साहेबांकडेस तारीख १० माहे एप्रिल सन १८७९ रोजीं बारा वाजण्यापूर्वीं अर्ज करावेत व त्या अर्जाबरोबर १०० रुपये अमानत पाठविले पाहिजेत. मक्त्याच्या शर्ती कोणत्या आहेत याची माहिती स्वतः येऊन जेलचे सुपरिंटेंडेंट साहेब यांजकडेस अर्ज केला असतां मिळेल. आणि त्याप्रमाणेंच उमरावती एथील प्रमोदसिंधु व अकोला एथील वऱ्हाडसमाचार या छापखान्यांतही मिळेल. हा मक्ता तारीख १ माहे मे सन १८७९ इसवीपासून ६ महिनेपर्यंतचा देण्याचा आहे.

| वजन | मण | शेर |
|---|---|---|
| कैदी खुराकीचें सामान | | |
| जवारी पहिला इसम | १०० | |
| गहूं दुसरा इसम | १२० | |
| चणे पहिला इसम | १७ | |
| तूप पहिला इसम | ५ | |
| मिरची | १ | १० |
| धने | | १० |
| लसून | | १० |
| हळद | | ५ |
| लाकडे | ११० | |
| डाळ तुरीची | ४५ | |
| चिंच | ५ | १० |
| मीठ | ५ | |
| गोष | | १५ |
| दूध | | १० |
| साकर | | ५ |
| तांदूळ | | २० |

याशिवाय किरकोळ सामान लागेल तसें पागलखान्यांत लागणारें सामान,

| गव्हाचा आटा | मण | शेर | |
|---|---|---|---|
| इसम १ | ० | १२ | |
| डाळ | २ | १० | |
| फुटाणे | १ | १० | |
| भाजी | ४ | | |
| तूप | | १२ | ८छ. |
| गोष | १ | २० | |
| तेल | | १२ | |
| कांद | | [illegible] | |
| लसूण | | १ | ८छ. |
| मिरची | | [illegible] | |
| हळद | | १ | ८छ. |
| चिंच | | [illegible] | |
| मीठ | | १० | |
| लाकडे | ११ | | |
| तमाखू | | २ | ८छ. |
| गुडाखू | | २ | ८छ. |
| दूध | १ | २ | |
| सन | | १० | |

याशिवाय किरकोळ सामान लागेल तसें तपशील.

कारखान्याचें सामान

| | विडल. | आदल. | शेर |
|---|---|---|---|
| सूत नंबर १०चें सुफेद | | १० | |
| ,, नं. ३० चें ,, | | २० | |
| ,, नं. २० चें ,, | | ३० | |
| ,, नं. ४० चें लाल | | ५ | |
| ,, नं. ४० चें हिरवें | | ५ | |
| ,, नं. ४० चें पिवळें | | ५ | |
| सूत गावठी | | | ६० |
| ,, नं ८ चें सफेद. | | ३० | |
| ,, नं. १० चें ,, | | ३० | |
| ऊन काळी | | | १०० |
| गोंद | | | ५० |
| वगैरे | | | ५० |
| चुना | | | ५० |
| गूळ | | | १५ |
| बेत | | | ६० |
| सन | | | १५० |
| बाम | | १०० | |
| सागवानी लाकूडकदू | | | |
| बिकफूट | १० | | |
| शाई छापण्याची | | | १ |
| तीळ इसम १ | | | २००० |

याशिवाय किरकोळ सामान लागेल तें देण्याचें आहे.

वर दाखविलेलें सामान फक्त एक महिन्याचा खर्च समजण्याचा आहे.

जे. एच. बर्नस
सुपरिंटेंडेंट जेल उमरावती.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी करंदे यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला. रविवार ता० १३ माहे एप्रिल सन १८७९ इसवी. अंक १४

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हांशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

सर्वत्रांस कळविण्याकरितां प्रसिद्ध करण्यात येतें कीं उमरावती जेलांत व पागलखान्यात जें सामान लागतें ते खालीं लिहिल्याप्रमाणें पुरविण्याकरितां जे कोणी मक्ता घेण्याची इच्छा करतील त्यांनी जेलचे सुपिरिंटेंडेंटसाहेब कडेस तारीख १० माहे एप्रिल सन १८७९ रोजी बारा वाजण्यापूर्वी अर्ज करावेत व त्या अर्जा बरोबर १०० रुपये अनामत पाठविले पाहिजेत. मक्तयाच्या शर्ती कोणत्या आहेत याची माहिती स्वतः येऊन जेलचे सुपिरिंटेंडेंट साहेब यांजकडेस अर्ज केला असतां मिळेल. आणि या प्रमाणेंच उमरावती एथील प्रमोदसिंधु व अकोला एथील वऱ्हाडसमाचार या छापखान्यांतही मिळेल हा मक्ता तारीख १ माहे मे सन १८७९ इसवी पासून ६ महिनेपर्यंतचा देण्याचा आहे.

| | वजन मण | शेर |
|---|---|---|
| कैदी खुराकीचें सामान | | |
| जवारी पहिला क्लास | १०० | |
| गहुं दुसरा क्लास | १२० | |
| चणे पहिला क्लास | १७ | |
| तूप पहिला क्लास | २ | |
| मिरची | १ | २० |
| धने | | ३० |
| लसूण | | ३० |
| हळद | | १५ |
| लांकडे | १३० | |
| डाळ तुरीची | ४५ | |
| चिंच | २ | २० |
| मीठ | ५ | |
| गोष | | १५ |
| दूध | | ३० |
| साकर | | ५ |
| तांदूळ | | २० |

याशिवाय चिल्लर सामान लागेल तसें

पागलखान्यांत लागणार सामान,

| | मण | शेर | |
|---|---|---|---|
| गव्हाचा आटा | | | |
| क्लास १ | १० | १२ | |
| डाळ | २ | २० | |
| फुटाणे | १ | १० | |
| भाजी | ४ | | |
| तूप | | १२ | ८छ |
| गोष | १ | २० | |
| तेल | | १२ | |
| कांदे | | ७ | |
| लसूण | | १ | ८छ |
| मिरची | | ७ | |
| हळद | | १ | ८छ |
| चिंच | | ७ | |
| मीठ | | १० | |
| लांकडें | ११ | | |
| तमाखु | | २ | ८छ |
| गुडाखु | | २ | ८छ |
| दूध | १ | २ | |
| सण | | ३० | |

याशिवाय चिल्लर सामान लागेल तसें तपशील.

कारखान्याचें सामान.

| | | शिडल आदत शेर |
|---|---|---|
| सूत नंबर ५० चें सुफेद | २० | |
| ,, नंबर ३० चें ,, | २० | |
| ,, नंबर २० चें ,, | ३० | |
| ,, नंबर ४० चें लाल | ५ | |
| ,, नंबर ४० चें हिरवें | ५ | |
| ,, नंबर ४० चें पिंवळें | ५ | |
| सूत गांवठी | | ६० |
| ,, नंबर ८ चें सफेद | ३० | |
| ,, नंबर १० चें ,, | ३० | |
| ऊल काळी | | १०० |
| नीळ | | ५० |
| तरोळ | | ५० |
| चुना | | ५० |
| गूळ | | १५ |
| वेत | | ६० |
| सण | | ३५० |
| वात | १०० | |
| सागवानी लाकूडवस्तु | | |
| निव फूट | २० | |
| शाई छापण्याची | | ३ |
| तीळ क्लास १ | | २००० |

याशिवाय चिल्लर सामान लागेल तसें देण्याचें आहे

वर दाखविलेलें सामान फक्त एक महिन्याचा खर्च समजण्याचा आहे.

जे. एच. बर्नेस

सुपरिंटेंडेंट जेल उमरावती.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि०— गतवर्षी पाऊस न पडल्यामुळें लोकांना पाणी कसें मिळेल याची मोठी पंचाईत पडली होती. परंतु अन्न खावयास पाहिजे तितकें मिळत होतें. यावर्षी पर्जन्य पुष्कळ होऊन खावयास अन्न कसें मिळेल याची लोकांना धास्ती उत्पन्न झाली आहे. पर्जन्य अतिशयित पडल्यामुळें आमचे इकडील शेतें अगदी नासून गेलीं व दररोजचा खावयाचा जो पदार्थ जवारी त्याचें पीक फार कमी झालें लोक ह्मणत होते कीं, जवारीचें पीक जरी कमी झालें तरी रब्बीचें पीक यंदा चांगलें येईल त्याप्रमाणें रब्बीचें पीक चांगलें आलेंही होतें. व यंदा जवारीच्याबद्दल गहूंच निर्वाहास उपयोगी पडतील असें वाटत होतें परंतु उंदीर बुवांनीं रब्बीचें पिकाचा सफा उडविला. ज्याप्रमाणें मागें जवारीवर टोळधाड आली होती त्याप्रमाणें रब्बीच्या पिकावर उंदीरधाड आली. उंदरांनीं गव्हाचीं शेतें खाऊन टाकल्यामुळें शेतांतील पीक कापण्याची फारशी जरूरी राहिली नाहीं. याप्रमाणें दोन्ही पिकांचा निकाल झाला. आतांच आंबाडीचें बी खाऊन राहिले आहेत. महागाई तर भी ह्मणत आहे. चिखली एथील तहशिलदार पंडित नंबरांतील आमचे मोहाडी हरास करण्याकरितां आले होते तेव्हां चोरांनीं कांहीं धान्य चोरल्याबद्दल एक फौजदारी मुकद्दमा चालला होता असें ह्मणतात. आतांच चोरांनीं चोरी करण्यास आरंभ केला आहे.

एथें थोडक्या दिवसांमागें बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर आले होते त्यांनीं गाव वगैरे पाहिलें गाव सफा आहे असें ह्मणाले व त्याबद्दल एथील म्युनिसिपालिटीला शाबासकी आली आहे असें ह्मणतात. आमचे गांवीं महामारीचा तडाका चालला होता आलेल्या गांव सफा आहे किंवा कसें या विषयीं तपास झाला असता किंवा डि. सा. नीं स्वतः येऊन पाहिलें असतें तर बरें होतें. व म्युनिसिपालिटीला आतांपेक्षां चांगली शाबासकी मिळाली असती व आवरून सदोदीत गांव सफा असतें किंवा घाण असतें याविषयींही कळून येतें.

येथें अफूगांजाचा मक्ता आहे तो यासालीं बाळकृष्ण पुंजभट यांनीं घेतला होता त्यांनीं निमे पेशगीचा पैसा मुदतीच्या आंत आणून दिला नाहीं ह्मणून मक्ता पुन्हा दोन वार हरास झाला. साडेतेरासे रुपयांस मक्ता घेतला होता व तो पुन्हा दोनवार हरास करण्यांत सरकाराला २३५ दोनशे पस्तीस रुपये तोटा आला. व ते नुकसान बाळकृष्ण पुंजभट यांनीं द्यावे असें ठरलें त्याप्रमाणें नुकसानीचे रुपये घेण्याकरितां खुद्द तहशिलदार आले होते. त्यावेळेस त्यांनीं पैसा दिला नाहीं ह्मणून त्यांची सर्व जिंदगी जप्त केली व तीन दिवसांचे आंत नुकसानीचे रुपये भरून द्यावे नाहीं तर माल हरास केला जाईल असें सांगितलें आहे. पुढें काय होतें पहावें.

एथें अणगांवकर बुवा आले होते त्यांनीं एथील ब्राह्मवृंदांतील साज दोन तीन वर्षांपासून चालत आलेला तंटा मोडण्याविषयीं दोन च्यारदां घट वटना केली पण बुवा अल्पवई आल्या कारणानें त्यांचें जसें वजन पडावें तसें पडत नव्हतें. व बुवास जसें ज्यांनीं सांगितलें तसें ऐकावें यामुळें तंटा मोडला नाहीं. बुवाची दृष्टी नाकलीकाकडे फारशी नसून पैशावर फार आहे. असें ह्मणतात बुवाचें एक तर्‍हीं बोलणें फार होतें यामुळेंही तंटा मोडला गेला नाहीं. हे ब्राह्मण्य सर्व अदावतीचें आहे न यांत काहीं हांशील नाहीं. कळावें तारीख ४।१८७८

आपला दास

एक

" देऊळघाटस्थ "

## आत्मसुख.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. या जगतांत खरें सुख कोणतें आणि तें कसें प्राप्त होतें वगैरे विषयावर मोठमोठे धुरंधर, विद्यापीठाचे अलंकार, व्यास, वाल्मिकादिक यांनीं शेकडों ग्रंथ लिहून ठेविले आहेत. आणि ईश्वरपरायण भगवद्भक्त ज्यांनी वाणी ईश्वरीरंगलेली असे ज्ञानेश्वर तुकाराम आदि करून यांनीं बोलून ठेविलेलीं हजारो वाक्यें आहेत त्या सर्वांचा मथितार्थ पाहूं गेलें असतां आत्मा, नात्म विचारापासून प्राप्त झालेलें जें आत्मनिवेदन (आत्मज्ञान) आपासून झालेली जी स्थिति ती अनुभवणें हें होय. या सांगितले प्रमाणापर्यंत दृष्टी न गेली तर थोडक्यांतही मथितार्थ समजतो. तो असा कीं या भूमंडळावर अभिमानपरत्वें शेकडो जाति, शेकडो धर्म व शेकडो मार्ग झाले आहेत. पण त्यांचें मुख्य बीज हेंच आहे कीं सदरील सुख प्राप्त व्हावें. आतां ते सुख प्राप्त व्हावें अशी जी इच्छा ते व्यसन, व्यसन मनुष्यजातीच्या प्राण्याला जडलें ह्मणजे तो प्राणी निर्व्यसनी प्राण्यांमध्यें गणला जाईल काय? नाहीं. असो. असें जें सुख तें प्राप्त होण्याला मार्ग कोणता? असा प्रश्न सहज उत्पन्न होतो व तें किती योग्य तेंच असतें याचा विचार सुरू होतो.

विषयापासून झालेलें जें सुख तें अनुभवास येतें. तसें आत्मनिवेदनापासून झालेलें सुख अनुभव सिद्ध नसून जाणवलें जात नाहीं असें पंच पक्वान्नीं अन्न खाऊन तृप्ति होते, व पोट भरतें, हा अनुभव येतो पण स्वच्छ हवा खाणें, उत्तम बगीच्यांतून तळ्यावरून फिरणें वगैरे पासून सुखोत्पत्ति होते तरी तिचा अनुभव सांगतां येत नाहीं तसें आत्मसुखाचें आहे. आत्मसुख आत्मा अनुभवतो तो जिवाला अजाण असतो—ह्मणून जीव आणि आत्मा या दोघांची परस्पर ओळख होणें हेंच सुख व तीच तृप्ति. तृप्ति झाली ह्मणजे स्थीर होतो. स्थीर झाला ह्मणजे त्याला स्थितिप्रज्ञ ह्मणतात.

जो स्थितिप्रज्ञ होतो तो इतर विषय सुखाला अजाण होतो. अर्थात त्याचे ठिकाणीं द्वैत रहात नाहीं. खरेच आहे, क्षुधा जोंपर्यंत आहे तो पर्यंत भोजनाची चिंता. भजनांनीं भोजनाचा विसर पडतो तसेंच विषयसुखानें जोंपर्यंत तृप्ति होत नाहीं तोंपर्यंत क्षुधीत इच्छा धरून असते ती इच्छा दूर झाली ह्मणजे स्थितिप्रज्ञ होतो.

वर लिहिले प्रकारावर आत्मानात्म विचाराची जी तृप्ति तें खरें सुख होय, असें झालें, पण तो आत्मानात्म विचार कसा केला असतां तृप्ति होते हें समजणें राहिलें तर एका वस्तूपासून अनुभव घेणें अथवा श्रेष्ठपुरुषानें श्रवण करणें होऊन त्याजवर झालेला जो विच्यार तें मनन, तदनंतर त्याचा अस्खलीत ध्यास घेणें तो निजध्यास, तो करतळामळवत झाला ह्मणजे साक्षात्कार प्राप्त होतो. हाच साक्षात्कार पूर्ण दशा पावला ह्मणजे आत्मनिवेदन होतें. ही कोटी मोठी होय. या कोटीची भूमिका प्राप्त होण्यास अतुल श्रम करावे लागतात. इतकेंच नव्हे तर हजारो लंगोट्या घालून, धुरळ्यात लोळून, सर्वसंगपरित्याग करून, वनांत राहून, नानाप्रकारचे शरीरास कष्ट देऊन ही भुमिका प्राप्त होण्याची इच्छा धरतात, पण अंतःकरणांत विचार शिरल्या शिवाय ते सर्व प्रयत्न व्यर्थ जाऊन समाधानी न होतां उलट प्रकार होतात. याजकरितां सद्विचारानें आत्मसुख अनुभवावें हें इष्ट होय कळावें हे विनंती.

ग० न०

## वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वद्य ७ शके १८०१

## बंबांची अवश्यकता.

वऱ्हाडांत उन्हाळा मनस्वी असतो. इकडील घरें कच्च्या बांधणीचीं, गवती, कवलारू अशीं फार. व त्यामुळें आगीचे भयही इकडे फार. वर्षांस बहुत गांवीं कित्येक वेळां आगी लागतात व कांहीं तर गावचेगाव जळून अग्नीनारायणार्पण होतात. उन्हाळा नुकताच सुरू झाला आहे पण इतक्यांत आगी लागण्याचे ४।५ प्रसंग अकोल्यांत आले. अकोल्यास म्युनिसिप्यालिटी आहे, ती अशा कामावर देखरेख ठेविते तिनें आगी विजविण्या करितां पाण्याचे बंब ठेवावे असें कित्येक वर्षें आह्मी सुचवीत आलों आहों. पण कांहीं घडलें नाहीं; इतके दिवस म्युनिसिप्यालिटीची स्थिति निकृष्ट होती पण हल्लीं तशी नाहीं. आतां तिला उत्पन्न चांगलें आहे, हद्द वाढली आहे. इस्टाब्लिशमेंट अधिक झालें आहे. व कापसाचा व्यापार वाढला आहे याजकरितां आगीच्या शमनार्थ बंब ठेवणें फार अवश्यक आहे असें आह्मांस वाटतें व म्युनिसिप्यालिटीला आणखीही आह्मी सुचवितों कीं, तीइतका खर्च करिते तसे तिनें पाण्याचे दोन निदान एक तरी बंब आणवून ठेवावा ह्मणजे चांगलें होईल. अति उष्णतेमुळें बंबाच्या चामड्याच्या नळ्या खराब होतात सबब बंब उपयोगी नाहींत अशी मागें आह्मी एक म्युनिसिप्यालिटीची हरकत ऐकिली होती पण ती बरोबर नाहीं व्यवस्थित रीतीनें बंबाचें सामान ठेवणें अथवा बिघडत असल्यास दुरुस्त करणें हें बंब बाळगणारास भाग आहे. सबब बंब बाळगले पाहिजेत व त्यांची काळजी घेतली पाहिजे. लोक म्युनिसिप्यालिटीस कर देत आहेत तर आगीपासून त्यांचीं घरें बच्यावणें म्युनिसिप्यालिटीला भाग आहे. व त्याकरितां बंब घेणें अवश्यक आहे उमरावतीस, नागपुरास अकोल्याहून उष्णता कांहीं कमी नाहीं, पण तेथें बंब असल्याचें आमचे ऐकण्यांत आलें आहे. ह्मणून एथीलही म्युनिसिप्यालिटीनें तसें करावें असें आह्मी सर्व लोकांच्या वतीनें तिला सुचवितों.

उन्हाळ्यांत प्रत्येक घरवाल्यानें दररोज आपले घरापुढें ९ घागरी भरलेल्या ठेवाव्या अशी मागें चाल होती तीही हल्लीं अमलांत नसल्याचें दिसतें. तर हें ज्याचे काम असेल त्यांनीं तें वेळेवर करावें असें त्यांसही आह्मी सुचवितों; नाहींपक्षां एकादे वेळीं भयंकर प्रसंग येऊन लोकांचें फार नुकसान होणार आहे.

## हिंदुस्थानांतील राज्य सुधारणा.

( नेटिवओपिनियनवरून )

हिंदुस्थानच्या हिताहिताचे विषयांकडे इंग्लंडांतील लोकांचें अलिकडे लक्ष लागल्या सारखें दिसतें व ही गोष्ट पाहून आह्मांस आनंद वाटतो. प्रिन्स आफ वेल्स यांचे हिंदुस्थानांत आगमन, दिल्लीदरबार, वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य नष्ट करण्याचा कायदा, हत्यारांचा कायदा, अलिकडे नवीन बसलेला कर, आफगाणिस्थानची लढाई, इंग्लंडांतील आपसांत वर्चस्व मिळण्याचा ग्रहकलह वगैरे अनेक कारणानीं अलिकडे इंग्लंडांतील लोकांचे हिंदुस्थानचे हिताहिताकडे लक्ष लागलें आहे. हिंदुस्थान संबंधानें पार्लमेन्ट सभेंत वारंवार वादविवाद होत आहेत, बडे व वजनदार लोक वारंवार भाषणें करित आहेत, वर्तमानपत्रांतून आणि मासिक पुस्तकांतून हिंदुस्थानाविषयीं अलिकडे अनेक निबंध येत आहेत ह्या वादविवादांपासून किंवा निबंधापासुन तत्काळ विशेष फायदा नाहीं हें जरीं खरें आहे; तथापि आमच्या देशाची बरीवाईट स्थिति सर्व प्रकारें इंग्लंडावर अवलंबून आहे, तेव्हां त्या देशांतील लोकांचें इकडे लक्ष जाणें ही क्षुल्लक गोष्ट नव्हे असें मानिलें पाहिजे. अशिक्षित व अप्रस्वार्थी युरोपियन लोकांच्या वर्तनापासन जरी केव्हां केव्हां अन्याय होतात तथापि पुष्कळ खऱ्या व सुशिक्षित इंग्लिश लोकांचे विच्यार निःपक्षपाती असतात हें कबूल केलें पाहिजे. व अशा गुणामुळेंच इंग्लिश लोकांची कीर्ति जगभर गाजत आहे. फ्रेझर्स मागेझीन नावाच्या एका मासिक पुस्तकाच्या जानेवारीच्या अंकांत हिंदुस्थानच्या लोकांशीं इंग्लिशांनीं कसें वागलें पाहिजे याविषयीं एक उत्तम निबंध लिहिला आहे व तो आमच्या लोकांनीं वाचून पहावयाचें अगत्य आहे. या निबंधांत एतद्देशीय लोकांस हुद्याच्या जागा देणें किती जरूर आहे, त्या न देण्यापासून इंग्लिश लोकांचा कसा तोटा आहे व देशाचे कसें नुकसान होत आहे, लार्ड डलहौसी यांच्या कारकीर्दीपासून देशाचा खर्च अन्यायानें वाढत चालला, तसेंच हिंदुस्थानच्या रक्षणा साठीं साठ हजार इंग्लिश सैन्य व शिवाय नेटिव फौज ठेवण्याचे कारण काय व तें योग्य आहे किंवा नाहीं याव अशाच दुसरे कित्येक गोष्टींचीं खरीं कारणें दाखविलीं आहेत. निबंध फार मोठा आहे ह्मणून कित्येक महत्वाच्या गोष्टींचा मतलब आह्मी पुढें देतो.

जेथें युरोपियन लोकांची अवश्यकता नाहीं अशा सरकारी हुद्यांच्या जागांवर युरोपियन लोकांस नेमणें आणि त्यांस वाजवीपेक्षां जास्त ह्मणजे दुप्पट पगार देणें अशा वहिवाटीमुळें राज्यकारभार चालविण्याचा खर्च दिवसानुदिवस वाढत चालला आहे. जर हुद्याच्या कामावर नेटिव लोकांस नेमिले तर ते युरोपियन लोकांप्रमाणेंच चांगल्या रीतीनें कामें बजावतील. आणि अशा रीतीनें नेटिव लोकांस हुद्याच्या कामावर नेमिलें ह्मणजे ते इंग्रज लोकांशीं प्रेमभावानें वागतील; कारण इंग्रजांची हिंदुस्थानांत राज्यसत्ता आहे ह्मणून हुद्यांचीं कामें नेटिवांस मिळतात असें त्यांस वाटेल व त्याच कामावर युरोपियन लोक ठेविले असतां जो खर्च लागणार आहे त्याच्या चतुर्थांश खर्चानें काम नेटिव लोकांनीं होणार आहे. पार्लमेंट सभेंत जो नुकताच वादविवाद झाला त्यांत अशा प्रकारच्या बऱ्याच गोष्टी बाहेर आल्या आहेत. एका रेल्वे कंपनीत इंजिनड्रायव्हरच्या कामावर युरोपियन लोकांऐवजी नेटिव लोकांस ठेविल्यामुळें सदर्हू कंपनीस एका वर्षात ११८०० रुपये कमी खर्च लागला.

कोणत्याही रीतीनें पाहूं गेलें असतां असें स्पष्ट दिसून येतें कीं नेटिव लोक दुय्यम कामावर ठेविले असतां जो खर्च लागतो त्याच्या पेक्षां पुष्कळपट जास्त खर्च युरोपियन लोक ठेविले असतां लागला पाहिजे आणि याचें कारण युरोपियन लोकांच्या चैनीसवई व हिंदुस्थानांतील लोकांचा वेतवात हेंच एक नव्हे तर जन्मभूमीपासून अत्यंत दूर देशांत मनुष्यानें यावें ह्मणून इंग्रज लोकांस मोठें वेतन देण्याची जी अवश्यकता लागते तीही लक्षांत आणिली पाहिजे तथापि अशा प्रकारें अतिशय मोठाले पगार देऊन राज्य चालविण्याची ही रीति फार खर्चिक आहे व अशा खर्चिक रीतीनें कोणतेंही राज्य चालविणें फार कठीण आहे. जीं कामें चालविण्यास इंग्रज लोकांसारखे वाकबगार एतद्देशीय लोक मिळण्याचा संभव आहे त्या कामावर इंग्रज लोकांस कां नेमावें याचें कारण समजत नाहीं. हिंदुस्थान सरकारानें हिशेबी व जमावंदी खात्यांत व त्याचप्रमाणें मुलकी खात्यांत हिंदुस्थानांतील लोक न ठेवितां दुसरे लोक ठेवणें हें गैर आहे. एतद्देशीय लोक पाहिजे तेव्हां आणि फारच थोड्या पैशानें मिळतात, व हिंदुस्थान देश त्यांची जन्मभूमि असल्यामुळें त्यांनां त्या देशाची फार चांगली माहिती असली पाहिजे; आणि ते अशा प्रकारचीं कामें करण्यास कोणत्याही रीतीनें हुशार युरोपियनांपेक्षां कमी आहेत असें नाहीं.

हिंदुस्थानच्या राज्याचा कारभार इंग्रज लोक नेमून चालविला असतां जें इंग्लंडाचें हिंदुस्थानावर स्वामित्व असेल त्यापेक्षां तद्देशीय लोकांकडून राज्यकारभार चालविला असता तें कमी होईल असें नाहीं. अनेक लोक नोकरीकरितां हिंदुस्थानांत पाठविण्यापासून इंग्लंडास फायदा नाहीं. तेच लोक जर झीलंड किंवा आस्ट्रेलियाच्या बेटांत वसाहत करण्याकरितां पाठविले असते तर अधिक मोठा फायदा. ज्या हिंदुस्थान देशाची निकृष्टावस्था लक्षांत आणिली असतां या देशाचा राज्यकारभार नेमक्या वेतनें व काटकसरीनें चालविण्याची अवश्यकता दिसून येते, त्या हिंदुस्थान देशांत अनेक इंग्रज लोक नोकरीस आल्यानें मोठी नुकसानी होते इतकेंच नाहीं तर इंग्लंडालाही त्यांच्यापासून अमदी फायदा नाहीं. प्रतिवर्षीं हिंदुस्थानांतून वेतनाच्या द्वारें जो पैसा विलायतेंत येतो त्यामुळें इग्लंडचा मोठा फायदा होतो अशी निःसंशय लोक कल्पना करितात, परंतु अर्थशास्त्रांतील निर्विवाद सिद्धांतांपैकीं हा एक सिद्धांत आहे कीं भांडवल फलदायक कामामध्यें घातल्याशिवाय त्यापासून देशाला फायदा होत नाहीं. हिंदुस्थानांतून पेनशनद्वारें येणाऱ्या पैशापैकीं एक पैसा तरी फलदायक रीतीनें खर्च केला जातो काय? तो सर्व पैसा पेनशनर लोक व त्यांचीं कुटुंबें यांच्या उदरनिर्वाहाशिवाय दुसऱ्या कोणत्या तरी कामाकरितां खर्चिला जातो काय? अशी आवडती ह्मणच पडून गेली आहे कीं, सिव्हिल सर्व्हिस लोकांनां पैसा मिळण्याला एक द्वार झालें आहे. अशा रीतीनें पुढें येणारी जी स्थिति ती पहिल्या स्थितीपेक्षां फार वाईट होते.

पुढें निबंधकार असें लिहितो कीं, थोडी हकीकत सांगितली तर माझ्या ह्मणण्यांत कोणत्याही रीतीनें अतिशयोक्ति नाहीं असें दिसुन येईल. जेव्हां लार्ड डालहौसी हिंदुस्थानांतून गेले तेव्हांही इंग्रज सरकारास राज्यसंबंधी दर वर्षास तीस कोट रूपये खर्च लागत असे. तेव्हांपासून आजपर्यंत आमचें राज्य अंशतः वाढलें असेंही नाहीं; तथापि चालू सालची खर्चाची रकम ६,००,०००,०० रूपयेपेक्षां कमी नाहीं. या पैकीं कांहीं पैसा लोकोपयोगी कामाकरितां खर्च झाला आहे, व अशी कामें करण्याच्या खात्याला पब्लिक वर्क्स हें थट्टेनें दिपवाळी ह्मणजे दिवाळखोरी हें नांव पडलें आहे. परंतु ह्या खात्यामध्येंही अनेक इंग्रज लोक विलायतेहून हिंदुस्थानच्या सुधारणेसाठीं आणण्याची व्यर्थव भपाट खर्च करण्याची अवश्य रूढी सुरू आहे.

नर सरकारास इंजिनियर लोक पाहिजेत, तर सरकारानें तें काम एतद्देशीय लोकांस शिकविण्याकरितां पाठशाळा स्थापन केल्या पाहिजेत. अशा शाळांमध्य तयार झालेले एतद्देशीय लोक कूपर हिल कालेजांतून येणाऱ्या तरुण इंग्रज लोकांसारिखे कामें करण्यास योग्य होतील आणि अशा लोकांस ठेविल्यानें युरोपियन लोक ठेविल्यापासून जो खर्च लागतो त्याच्या चतुर्थांशांत काम होणार आहे. आणि सरकारी कालेजांत शिकून तयार झालेले अनेक लोक मुलकी नोकरी करितां उमेदवार तयार आहेत. अशा लोकांस दुसरा कांहीं चांगला उद्योग मिळत नाहीं यामुळें फंद फितुरीचे मजकूर सरकारच्या विरुद्ध लिहिण्याचे उद्योग करितात.

हिंदुस्थानांतील मुलकी कामांवर अनेक इंग्रज लोक असल्या कारणानें इंग्लिश सैन्यही ( सोल्जर ) त्याच मानानें पुष्कळ आहे. याप्रमाणें तद्देशी लोकांना मुलकी खात्यांतील युरोपियन कामगार लोकांस पोसावे लागते इतकेंच नाहीं तर, त्या कामगार लोकांच्या व राज्य संरक्षणार्थ ठेविलेल्या साठ हजार फौजेसही पोसावे लागतें. कनेडा व आस्ट्रेलिया या देशाप्रमाणें हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत आमचें त्या देशावर वर्चस्व सत्ता आहे ती मोडून टाकण्याचें येणार नाहीं. जोंपर्यंत हिंदुस्थानांतील लोक आपल्या पक्षाचे आहेत तोंपर्यंत उत्तरकडील रूस देशापासून भीति नाहीं, प्राचीन काळीं हिंदुस्थानावर अनेक वेळां अनेक जातीच्या लोकांनीं स्वाऱ्या करून ते विजयी झाले परंतु त्यांच्याशीं तद्देशीय लोक द्वेष करीत असत काय? नाहीं खरोखर नाहीं. यद्यपि जरी ते विजयी लोक मोठे गुन्हे करीत तरी देखील त्यांच्याशीं नेटिव लोक द्वेष करीत नसत असें आहे. तर याचें कारण काय? यांचें कारण इतकेंच आहे कीं ते विजयी लोक आपली नास धूळ करण्याची रानटी हौस एकदां तृप्त होऊन त्यांचा हुरूप नाहींसा झाला ह्मणजे ते तद्देशीय लोकांत मिळून जात असत आणि पराजित लोकांपैकीं पुढारी लोकांस मोठ्या हुद्याच्या व वजनदारीच्या सरकारी कामांवर नेमिले असत. आमची रीती त्यांच्या रीतीहून अत्यंत भिन्न आहे. जेव्हां आम्ही एकादा मुलूक जिंकितों तेव्हां तेथील राज्यकारभार करण्यास योग्य अशा बुद्धिमान, विद्वान, कुलीन, मोठ्या पदवीचे व वजनदार लोकांस निराश होऊन रहावें लागतें. कारण आमची राज्यकारभार चालविण्याची रीत ह्मटली ह्मणजे तद्देशीय लोकांस मोठ्या हुद्याच्या जागांवर कधींच नेमावयाचें नाहीं. अशा प्रकारें त्या लोकांचा राज्यकर्त्यांशीं प्रेमभाव नाहींसा होतो. हिंदुस्थानच्या राज्यकारभार चालविण्याच्या सध्याच्या रीतीकडे लक्ष दिलें तर असें दिसून येईल कीं युरोपियन लोक हे हिंदुस्थानांत पैसा करण्याकरितां येतात, आणि थोडीं वर्षे एथें राहून पैसा मिळाला ह्मणजे लागलेच ते विलायतेस निघून जातात. तेव्हां तद्देशीय प्रत्येक बुद्धिमान व विद्वान मनुष्याच्या मनांत खिन्नता व असंतोष हीं [illegible] करितात यांत कांहीं आश्चर्य आहे काय? आणि प्रत्येक ज्या इंग्रजी ग्रंथांत राष्ट्राला आणि राज्यकारभारांत स्वतंत्रता असावी असें सांगितलें आहे अशा ग्रंथाचें कालेजांत ज्ञान प्राप्त करून जेव्हां प्रत्येक तरुण विद्यार्थी पाठशाळा सोडितो तेव्हां तो आमच्या राज्यकारभार करण्याच्या रीतीला शत्रु व्हावा यांत आश्चर्य आहे काय ? तर यांत मुळींच आश्चर्य नाहीं. आणि अशी स्थिति असतां सध्याची राज्यकारभार करण्याची रुढी तशी चालविणें हें केवळ मूर्खपणाचें व अनीतीचें काम आहे.

येणेंप्रमाणें लिहिलेल्या निबंधांत कित्येक गोष्टी विचारणीय आहेत हें लिहिणें नको.

## वऱ्हाड.

मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी आय ई यांच्या मानपत्राच्या संबंधानें जनरल सभा उदईक ४॥ वाजतां टौनहालांत होणार आहे. व त्या वेळीं बाहेरूनही पुष्कळ सभ्य गृहस्थ येणार आहेत असें समजतें.

एथें अक्कलकोटावर मे. पेस्तमजी विकाजी शेट पार्शी यांच्या मोठाल्या धर्मशाळां पैकीं एक धर्मशाळा आहे. ती जरा सिकस्त झाली आहे. व त्या दिशेकडील मुशाफर लोकांची तेथें रहाण्याची रहदारी अलीकडे अगदी मोडली आहे आणि शहर व पेठ यांचे दरम्यान धर्मशाळा नसून लोकांची मोठी गैरसोय आहे. हें मनांत आणून मे. द. बहिमनजी साहेब सी आय ई यांनीं खटपट करून कांहीं वर्गणी जमा केली. व ती धर्मशाळा नदीचे काठावर पुलाचे पूर्वभागास टौनहालाकडील सडक आणि बालाजीचा मठ याचे दरम्यानचा खड्डा बुजवून तेथें बांधण्याचा विचार केला आहे. अक्कलकोटावर धर्मशाळा उतरण्याचें काम सुरू झालें आहे. बहिमनजी साहेबांनीं ही गोष्ट फार चांगली केली.

एथें तासगावकरांचे नाटक आलें आहे. त्यांचे कालपर्यंत तीन खेळ झाले. मागच्यापेक्षां सुधारणा आहे. काम विक्रम चरित्र त्यांनीं उत्तम केलें. शेगावास एक स्त्रीनाटक आलें आहे. व खामगावास भोंडोपंत मराठे सांगलीकर यांचें नाटक आलें आहे.

मि० जोन्स साहेब कमिशनर यांची स्वारी गुरुवारीं इलिचपुराकडे गेली. तेथून चिखलदऱ्यास जाणार आहे.

कर्नल बेल सा. जुडिशियल कमिशनर गुरुवारपर्यंत इलिचपुरास होते. शुक्रवारीं चिखलदऱ्यास गेले.

प्रोसेस फीचे कामी कांहीं नवीजुनी वहिवाट करण्याचे विच्यारा करितां चिखलदऱ्यास एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर लोकांची एक कमिटी जु० कमिशनर साहेब लवकरच भरविणार आहेत असें ऐकतों.

जवारीचा भाव १४ शेराशून कमी आहे सबब अलीशान रेसिडेंट साहेब यांनीं दिवाणी कैदी ज्याना चौथे क्लासचा ३॥ रुपये महिना भता देण्याचा ठराव केला होता तो वढावून ५॥= केला आहे.

डा० हावर्ड सा. उमरावतींचे सिव्हिल सरजन यांनीं रजा घेतली आहे सबब त्यांचें काम पहाण्यासाठीं हैदराबाद कांटिजंटचे दुसरे घोडेस्वार पल्टणीपैकीं आपाथिकरी डा. किंग यांस नेमिलें.

या आठवड्यांत शहरांत एका कपाशी भरलेल्या घरांस, स्टेशनकडे २७ गवती घरांस व पेंठेत दाणे आळींतील एका दुकानास आग लागून पुष्कळ नूकसान झालें व राकायल पेटून एक मनुष्य भाजून मरण पावला.

मि० कोज साहेब कमिशनर साहेबांचे हेडक्लार्क हे मागील अठवड्यांत लिहिल्याप्रमाणें नोकरीवर रुजू झाले नाहींत असें समजतें. ते हैदराबादेस गेले आहे. व मि. बर्न्स सा. एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रजेवर जाणार आहेत त्यांची बदली त्यांस मिळण्याची खटपट झाल्यास ते करणार आहेत असें ह्मणतात.

जुडिशियल कमिशनर साहेबांचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. भास्कर सखाराम जयवंत यांनी १८ वे तारखेपासून एक महिन्याची रजा घेतली आहे. वैशाख मासीं मुलाचा व्रतबंध व मुलीचें लग्न नाशकास जाऊन करून येण्याचा त्यांचा विच्यार झाला आहे.

मे० सय्यद नुरुद्दीन सा. यास हैदराबादेस रेसिडेंटसा०चे [illegible] नेमिल्याविषयीं या अठवड्याचे हिंदुस्थान स.चे ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

मेजर स्मिथ साहेब हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट यांस मार्चाचे २० वे तारखेपासून ३ महिन्याची रजा दिली व त्यांचे काम पहाण्यास सिव्हिल सर्व्हिस पैकीं मि. जे. आर फिटझरल्ड आफिशियेटिंग थर्ड क्लास असिस्टंट पोलिटिकल एजंट यांस नेमिलें.

एथें नाटकें सुरू झालीं आहेत सबब नाटकगृहाचे कामीं अहमदनगरच्या आगीच्या प्रकरणावरून हिंदुस्थान सरकारचे बंदोबस्ताविषयीं ठराव झालेले आहेत त्याबरहुकूम नाटकगृह आहे नाहीं हे पहाण्याचा अधिकार म्युनिसिप्यालिटीस आहे त्याप्रमाणें मे. दस्तुर बहिमनजी साहेब यांनीं नाटकगृह स्वतां जाऊन पाहिलें. व सर्व बाजूचे दरवाजे खेळाचे अवलपासून अखेरपावेतो खुले राहू द्यावे व आगीच्या कामीं सावधागिरी ठेवावी असा त्यांनीं नाटकवाल्यांस हुकूम दिला व नंतर त्यांनीं नाटकाची सुरुवात केली असे समजतें. खुले दरवाज्यावर पैरवी ठेवणें पोलिसासही अवश्य असून ते त्याप्रमाणें ठेवित असतात.

मुंबई इलाख्याच्या सन १८६५ च्या १ल्या कायद्याचें कलम ३९ हैदराबाद अमानी मुलखास लागू केलें आहे. जमीनीच्या बांधवरोळ्यासंबंधी हा कायदा आहे.

वऱ्हाडचे रेलवे माजिस्त्रेटची नेमणूक कमी केल्यावरून मलकापुरास समयविशेषी युरोपियन माजिस्त्रेट नसल्यास त्या भागाचे रेलवेकडील मुकद्दम्याचे चौकशीकरितां तितका भाग अकोलें जिल्ह्यांत आहे असें समजावें ह्मणून ठराव झाला आहे.

मि० हाबसन साहेब अ० पो० सुपरिंटेंडेंट यांनां पहिले तारखेपासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

मि० काटग्रेव्ह साहेब पोलिस सुपरिंटेंडेंट यांनीं एक महिन्याची हक्काची रजा घेतली होती ती आपलेच अर्जावरून रद्द केली,

रा. रा. सीतलसिंग मंगरूळचे नायब-तहशिलदार यांस थर्ड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

मे. शाबासखा वाशीमचे तहशिलदार यांस तारीख १६ पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

बुलढाणें जिल्ह्यांतील खालीं लिहिलेले नायब तहशिलदार यांस थर्ड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

रा. रा. खंडेराव यशवंत—चिखली.
रा. रा. रामचंद्र आबाजी —मलकापुर
रा. रा. अवधूत आनंदाराव—मेहेकर.

## वर्तमानसार.

बांबे गव्हर्नमेंट ग्याझेटवरून— रा. बा. मदन श्रीकृष्ण पुण्यास स्माल काज कोर्टावर रुजू झाले— रा. सा. सखाराम कृष्ण शेट यास मालवणास सेकंड क्लास से. ग्रे. सबा जडज नेमिलें— खा. बा. माणकजी नसरवानजी यांस वसई आणि डाहाणू एथें से. क्ला. से. ग्रे. स. जडज नेमिलें रा. सा. नारायण गोविंद आपटे से. क्ला. फ. ग्रे. सबा० जडज दापोलिस आपले कामावर रुजू झाले. रा. सा. मंगेशराव बळवंत से. क्ला. फ. ग्रे. स. जडज सोलापुरास रुजू झाले त्याप्रमाणें राव साहेब गणपतराव अमृत मानकर खेडास रुजू झाले— रा. सा. चिंतामण नारायण भट यांची अष्ट्याहून ठाण्यास से. क्ला. से. ग्रे. वर प्रो. टेंप. नेमणूक झाली. रा. बा. पुरुषोत्तमराव सिद्धेश्वर बिनिवाले फ. क्ला. स. जडज सातान्यास आपले कामावर रुजू झाले— रा. सा. बाळाजी महादेव केतकर से. क्ला. से. ग्रे. स. जडज यांनीं रहिमतपुरचा च्यार्ज आपले बदलीस दिला.

फरुकाबाद व कानपुर यांचे दरम्यान ८१ मैल लांबीची एक लहान रेलवे तयार करण्याचें काम्पास सरकारचें मंजुरान मिळालें आहे.

जयपुरचे महाराज यांची थोरली राणी इतक्यात देवाघरी झाल्याची खबर आली आहे. रेवा येथील महाराज या राणी साहेबांचे बंधु होत. ज्ञा. प्र.

काठेवाडाकडील दुष्काळाची स्थिति नीट नाहीं अशी पुनरपि बातमी आली आहे. पुष्कळ लोक दुष्काळामुळें शहरें सोडून जात आहेत.

पुण्याकडे जे दरोडे चालू आहेत त्यांत संबंध असल्याच्या आरोपावरून ठिकठिकाणच्या कित्येक ब्राह्मणांस पकडलें जात आहे. भिवंडीहून एकास नेल्याची बातमी मागें लिहिली व आतां समजतें कीं नुकताच कल्याणाहूनही एकास पकडून पुण्यास नेलें आहे. ने. ओ.

## जाहिरखबर.

प्रसिद्ध ' लोकहितवादी ' यांनकडील जीं पुस्तकें आम्हाकडे ठिकठिकाणच्या पुस्तकालयांत ( लायब्ररींत ) देण्याकरितां आलीं होतीं त्यापैकीं बरींच पुस्तकें आम्हाकडे ज्या लायब्ररीवाल्यांकडून मागणी आली त्यां । केवळ टपाल खर्चानें पाठविण्यांत आलीं. आतां लायब्ररीवाल्यांकडून मागणी येतील असें दिसत नाहीं आणि अद्यापि पुस्तकें तर बरींच शिल्लक आहेत ह्मणून जे कोणी वाचनेच्छु गृहस्थ हीं पुस्तकें मागतील त्यांसही तीं टपाल खर्चानें देण्याविषयीं मालकांनीं आज्ञा केल्यावरून या जाहिरातीनें सर्व वाचनेच्छु व ज्ञानेच्छु लोकां । असे कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं आम्हाकडे एक आणापासून नऊ आण्यापर्यंत टपालखर्च पाठविल्यास त्या खर्चांत जातील तितकीं पुस्तकें फुकट पाठविण्यांत येतील. मात्र त्या पुस्तकांचा त्यांणीं स्वार्थी व परमार्थी चांगला उपयोग करावा एवढी काय ती शर्त आहे. कळावें. ता. १० एप्रिल सन १८७९ इ.

हरी त्र्यंबक काळे

नासिकवृत्ताचे मालक

## नोटिसा

राजश्री पुरुषोत्तमदास वल्लद सेवाराम मारवाडी दुकान पिंपळगाव काळ्याचें तालुके जळगाव यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें कीं, तुमच्या आमच्या दुकाना २ आहेत. त्या आजपावेतों एकत्रांत चालत आहेत परंतु अलीकडेस तुमची नियत बदलून तुम्ही पुष्कळ गोष्टी लबाडीच्या केल्या आहेत यामुळें तुमची आमची आतां सरकत चालेल असें दिसत नाहीं. तुह्मास आह्मांस पुष्कळ वेळा सांगितलें कीं दोन्ही दुकानचा हिशेब करून तुम्ही आम्ही आपसांत सरकत तोडून देणें घेणें, कागदपत्र माल रोकड वगैरे सर्व आपआपले हिशाप्रमाणें वाटून घेऊ. तुम्ही आमचें सांगणें ऐकत नाहीं. मध्यंतरीं तुम्ही आम्ही मिळून पंचाईत करूं ह्मणून ठरविलें व त्याप्रमाणें पंचांचे नांवें मजकुरांनी मेहेरबानीनें लिहून दिले तरी तुम्ही पंचांपुढें येत नाहीं व निकाल करीत नाहीं. पंचांनीं त निकाल कराल तर तुमचा फार फायदा होईल व आह्मासही खर्च पडणार नाहीं. जर पंचांपुढें तुम्ही न याल व निकाल आपसांत न कराल तर आह्मास रीतिप्रमाणें सरकारांत फिर्याद करावी लागेल. ह्मणोन ही नोटिस शेवटची तुह्मास देऊन असें कळविण्यांत येतें कीं, आजपासून आठ दिवसांचे आंत जर तुम्ही आपसांत किंवा पंचमार्फत निकाल कराल तर ठीक आहे तसें न कराल तर कोर्ट खुलें होताच तुह्मावर फिर्याद करूं.

जर तुम्ही ह्या नोटिसीप्रमाणें पंचांपुढें न याल तर तुमचा आमचा पंचांपुढें निकाल करून घेण्याचा जो नियम ठरला आहे तोही रद्द समजू आणि पुढें तुमची तक्रार कोणतीही प्रकारची ऐकणार नाहीं. कळावें. तारीख १० एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) देवकरण गिरधारीमल दुकान पिंपळगाव काळ्याचें तालुके जळगाव दस्तुर खुद्द

### नोटिस.

हरी वल्लद गोविंदा तेली रहाणार पारडी तालुके अकोट जिल्हा अकोला यांस टुगी मर्द हरी तेली मुक्काम पातुर्डे तालुके जळगाव इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस. लग्न झाल्यास सुमार १० वर्षें झालीं. ते समई मी अगदी लहान होतें. माझे बापानें लग्न करून दिलें. त्या वेळीं तुह्मीही लहान असल्यामुळें मोठेपणच्या कांहीं गोष्टी कळल्या नाहींत. आतां मला पदर येऊन सुमार ३ वर्षें झालीं. तेव्हांपासून पांच सहा महिने मी तुमचे जवळ होतें तेव्हां असें आढळून आलें कीं तुम्ही मनुष्यांत नाहीं व तुह्मापासून माझा संसार व्हावयाचा नाहीं. मग मी आपले बापाचे घरीं आलें त्याला दोन वर्षें होत आलीं. माझे बापानें व भावानें तुह्मास समजून सांगून फारकत देण्याविषयीं पुष्कळ खटपट केली पण तुम्ही दुसरे लोकांचे नादीं लागून आजपर्यंत टाळाटाळ करीत आला. जातवाले जमविले होते. व एक स्त्री तुमचे परीक्षेकरितां आणली होती त्या सर्वांची खात्री झाली कीं तुम्ही मनुष्यांत नाहीं व फारकत मागत असतां देत नाहीं. यावरून तुह्मास मुद्दाम नोटिस देत आहे कीं नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत तुम्ही फारकत पाठवून द्या. किंवा तुमची खात्री असेल तर तुम्ही स्वतः माझे बापाचे एथें येऊन मनुष्यांत असल्याचें सिद्ध करून द्या. याप्रमाणें तुमचे कडून होईल तर नोटिसीची मुदत संपल्यावर फारकतीची वाट न पहातां तुमचे लग्नाचा हक्क रद्द समजून मी दुसरा घरठाव कायदेशीर रीतीनें करीन. मग तुमचे कांहीं चालणार नाहीं याजकरितां अगाऊ नोटिस दिली आहे कळावें. तारीख ९ माहे एप्रिल सन १८७९ इ०

( सही ) टुगी मर्द हरी तेली निशाणी हातची बांगडी.

### नोटिस.

महदू वल्लद गोविंदा माळी वणजारी मुक्काम कोठा खुर्द प्रगणें पातुर तालुके बाळापुर यास कडतु वल्लद शामजी घुगे वणजारी मुक्काम मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही आजपासून २ वर्षें झालीं ६० रुपये कर्जाऊ घेतले. बारा महिन्यांनीं परत देण्याचा वायदा असतां अजून दिले नाहींत. तर २ रुपये शेकड्याचे व्याजानें मुद्दल रुपये ६० व व्याज रुपये ३० एकूण रुपये ९० ही नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत द्यावे. याच प्रमाणें आमची एक गाय व दोन गोऱ्हे तुह्मापाशीं चराईनें ठेविले होते तेही सदहूं मुदतींत आमचे आमच्या स्वाधीन करावे याप्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद केली जाईल व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ९ एप्रिल सन १८७९ इसवी.

[ सही ] कडतु वल्लद शामजी घुगे याचे हातची निशाणी रेघ

### नोटिस.

रघुनाथ रामभाऊ मारवाडी दुकान कळमगव्हाण परगणें सिरपुर तालुके वाशिम यास ठाकुरदास खेमराज वहिवटदार लछिमनदास मारवाडी दुकान आलेगाव तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे खातेवहीवरून रकम येणें ती व गहूं खंडी १ एकूण घेणें आहे ती तुह्मास मागत असतां आज उद्यां करितां देत नाहीं. बारा महिने झाले त्याजवरून नोटिस दिली आहे. तर नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांचे आंत सदहूं रकमेचा व गव्हाचा उलगडा करावा मुदत चुकल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. व या नोटिशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ९ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) ठकुरदास खेमराज वहिवाटदार लछिमन दास मारवाडी दस्तुर खुद्द.

### नोटिस.

रावजी वल्लद महादाजी माळी रहाणार मौजे माणकी तालुके बाळापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आह्मी तुह्मास सहा सालबंद्यांचा पुर्जा लिहून दिला होता त्यावरून तुह्मी सर्व सालबंद्यांचे रुपये घेण्याबद्दल मे. हेर साहेब बहादुर यांचे कोर्टांत नंबर ७२ सन १८७८ ची फिर्याद केली होती. त्यांत आमचे तर्फे निवडा एकदम पैसे देण्या इतके ठाव न होतां भाली सालबंदी पैकीं रुपये ७५ कोर्टानें देवविले. ते आतां हुजूर नाजर यांजकडे दाखल केले. हल्लीं सन १२८८ सालची सालबंदी मार्गशीर्ष शुद्ध ९ रोजीं भरली ते रुपये आह्मी तुह्मास पुष्कळ वेळ देण्याकरितां घेऊन आलों होतों तुह्मी घेतले नाहींत. शेवट आह्मी सदहूं रुपये १०० तुह्मास देण्याकरितां बिलंदखां मक्तेदार बाळापुरकर याजपाशीं ठेविले आहेत. तुम्ही त्यांत पावती देऊन आमपासून आठ दिवसांचे आंत रुपये घेऊन जावें. तसें न करितां आह्मावर निनाकारण फिर्याद केल्यास मी खर्च देणार नाहीं. वर लिहिलेले ७५ रुपये जे आह्मी नाजरकडे दिले त्याचे पूर्वीं तुह्मी आपसांत घेण्याचें कबूल केल्यावरून वडेगांव मुक्कामीं माणकी एथील लोकांसमक्ष आह्मी तुह्मास देण्याकरितां काढल्यावर तुम्ही ४३ रुपये हिसकून घेतले ते आजपावेतों तुमचे जवळ मागितले असतां देऊ देऊ करितां पण देत नाहीं. या नोटिशीचे पावले दिवसापासून आठ दिवसांचे आंत सदहूं रुपये आमचे न दिल्यास व्याजासुद्धां रुपये घेण्याकरितां फिर्याद करण्यांत येईल. व या नोटिसीचा खर्चही घेण्यांत येईल. कळावें तारीख ६ एप्रिल सन १८७९ इसवी.

( स० ) चद्रभान वल्लद हरसिंग वस्ती माणकी निशाणी हातची मोहोर.

### नोटिस.

रावण्या वल्लद श्रवण्या महार मुक्काम अन्दूर प्रगणे पातुर तालुके बाळापुर यास जानासा वल्लद हिरासा लाड दुकान पातूर प्रगणें व तालुके मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे वहिखात्यावरून मुद्दल रुपये ९० व व्याज ४५ एकूण १३५ रुपये येणें व शिवाय ज्वारी १५ मण व कपूस १५ मण यावयाची त्याजबद्दल मागणें केलें असतां देतों देतों ह्मणता पण देत नाहीं त्यावरून नोटिस केली आहे तर नोटिस पोंचतांच ८ दिवसांत रकम, ज्वारी व कपाशी याचा उलगडा करावा न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्च सुद्धां भरून घेतला जाईल व या नोटिसीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख ९ एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) जानासा वल्लद हिरासा लाड दस्तुर खुद्द.

### नोटिस.

येकोजी पाटील अडनाव पवार रहणार खंडाळे परगणें नशीक ? प्रगणें व तालुके वाशीम यासी जानासा वल्लद हिरासा लाड दुकान पारटुल परगणें पातूर शेखबाबु तालुके बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे आमचे सवां सत्तावीस २७। रुपये घेणें आहेत. ते मागितले असतां देत नाहीं सबब ही नोटिस दिली आहे तर नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत रकमेचा उलगडा करावा. न केल्यास दिवाणींत दावा करून खर्चसुद्धां भरून घेतले जातील. व या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें तारीख ९ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) जानासा हिरासा लाड दुकान पारटुल द. खुद्द.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १३ अकोला. रविवार ता० २० माहे एप्रिल सन १८७९ इसवी. अंक १५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |

दाक हशील.

| | |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकाकडून आगाऊ वर्गणी यावी अगर पत्र पुढ केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्रजी लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

सर्वत्रांस कळविण्याकरितां प्रसिद्ध करण्यांत येते कीं उमरावती जेलांत व पागखान्यांत जें सामान लागतें तें खालीं लिहिल्याप्रमाणें पुरविण्याकरितां जे कोणी मक्ता घेण्याची इच्छा करतील त्यांनीं जेलचे सुपिरिंटेंडेंट साहेबांकडेस ता० १० माहे एप्रिल सन १८७९ रोजीं बारा वाजण्यापूर्वीं अर्ज करावेत व त्या अर्जा बरोबर १०० रुपये अनामत पाठविले पाहिजेत. मक्तय त्या शर्ती कोणत्या आहेत याची माहिती स्वतः येऊन जेलचे सुपरिंटेंडेंट सा० यांजकडेस अर्ज केला असतां मिळेल. आणि त्याप्रमाणेंच उमरावती एथील प्रमोद सिंधु व अकोला एथील वऱ्हाडसमाचार या छापखान्यांतही मिळेल. हा मक्ता तारीख १ माहे मे सन १८७९ इसवीपासून ३ महिन्या पर्यंतचा देण्याचा आहे.

| | मण | शेर |
|---|---|---|
| कैदीखुराकीचें सामान | | |
| जवारी पहिला क्लास | १०० | |
| गहूं दुसरा क्लास | १२० | |
| चणे पहिला क्लास | १७ | |
| तूप पहिला क्लास | २ | |
| मिरची | १ | २० |
| धने | | ३० |
| लसूण | | ३० |
| हळेद | | १५ |
| लांकडें | १३० | |
| डाळ तुरीची | ४५ | |
| चिंच | २ | २० |
| मीठ | ५ | |
| गोष | | १५ |
| दूध | | ३० |
| साकर | | ५ |
| तांदूळ | | २० |

याशिवाय किरकोळ सामान लागेल तसें

पागखान्यांत लागणारे सामान,

| | मण | शेर | |
|---|---|---|---|
| गव्हाचा आटा | | | |
| क्लास १ | १० | १२ | |
| डाळ | २ | ५० | |
| फुटाणे | १ | १० | |
| भाजी | ४ | | |
| तूप | | १२ | ८छ |
| गोश | १ | २० | |
| तेल | | १२ | |
| कांदे | | ७ | |
| लसूण | | १ | ८छ |
| मिरची | | ७ | |
| दळद | | १ | ८छ |
| चिंच | | ५ | |
| मीठ | | १० | |
| लांकडें | ११ | | |
| तमाखु | | २ | ८छ |
| गुडाखु | | २ | ८छ. |
| दूध | १ | २ | |
| सण | | ३० | |

याशिवाय किरकोळ सामान लागेल तसें

तपशील-

कारखान्याचें सामान.

विंडल आदतशेर.

| | |
|---|---|
| सूत नंबर ५०चें सुफेद | २० |
| ,, ४०चें ,, | २० |
| ,, २०चें ,, | ३० |
| ,, ४०चें लाल | ५ |
| ,, ४०चें हिरवें | ५ |
| ,, ४०चें पिवळें | ५ |
| सूत गावठी | |
| ,, नंबर ८चें सफेद | ३० |
| ,, ,, १० ,, | ३० |

| | | |
|---|---|---|
| ऊल काळी | | १०० |
| नीळ | | ५० |
| तरोळ | | ५० |
| चुना | | ५० |
| गूळ | | १५ |
| वेत | | ६० |
| सण | | ३५० |
| वास | १०० | |
| सागवानी लाकूडक्यु | | |
| निव फूट | २० | |
| शाई छापण्याची | | ३ |
| तीळ | | २१०० |

याशिवाय किरकोळ सामान लागेल तसें देण्याचें आहे.

वर दाखविलेलें सामान फक्त एक महिन्याचा खर्च वसजण्याचा आहे.

जे. एच. बर्नेस

सुपरिंटेंडेंट जेल उमरावती

## जाहिरखबर.

खालीं सही करणार यानकडून कळविले जातें कीं कसबे वेणी तालुके यवतमाळ जिल्हा ऊन या गावचीं शेतें आमचे मालकीचीं सरकारी रजिस्टरावर आमचें नाव शरीक आहे ती आम्ही हरबा हरि यास वाहण्यास दिलीं आहेत त्याचें स्वामित्वाबद्दल १००० रुपये पुढील सालचे राहिले असी नोटिस त्यास दिली. जर ते सदहू प्रमाणें नाकबूल करून ताबा सोडतील तर आह्मास दुसरे इसमास व सदहू शेतें देणें आहेत ज्यास घेणें असेल त्यांणीं आह्मास येऊन भेटावें ता. १२ एप्रिल सन १८७९ इ.

( सही ) चेनाजी वल्लद मोहोनाजी मालगुजार मौजे टाकळी जिल्हा वर्धा याचे तर्फे त्रिंबक भगवंत कुलमुखत्यार

## नोटिस

हरबाजी वल्लद तानबा हेरे रहाणार शिरपुर तालुके व जिल्हे वर्धा यासी खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, आमचीं शेतें कसबे वणी तालुके यवतमाळ एथील सरवई नंबर २२।४१—४२ हे वाहितीचे संबंधानें तुह्माकडे आहेत त्याजबद्दल आतां पुढचे सालीं जर तुह्मास वाहण्याचें असेल तर त्याजबद्दल सरकारी सारा वजा जातां १००० एक हजार रुपये तुह्मास आह्मास जमीनीचे स्वामित्वाबद्दल देणें पडेल. व हें जर तुह्मास कबूल नसतील तर नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत जमीनीचा ताबा सोडून देणें. आणि आह्मास लेखीं कळविणें. व तुह्माकडे मागील सरकारी साऱ्याबद्दल रुपये येणें राहिले आहेत ते ही नोटिस पावतांच आणून देऊन कायदेशीर पावती घ्यावी व या नोटिशीचा जबाब तुह्मी नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत देणें व जबाब न दिला तर आह्मी असें समजूं कीं तुम्ही आमचें म्हणणें ( एका सालापुरते रुपये १००० स्वामित्व व सरकारी सारा या शर्तींवर जोपावेतों आह्मास वाटेल तोंपावेतों तुह्माकडे आह्मी याच दरानें ठेऊ ) असे कबूल केलें असे समजू. सदहूंप्रमाणें करण्यास चुकल्यास आह्मी तुमची पुढें कांहीं एक तक्रार न ऐकतां तुमची वहिवाट काढून घेऊ. नोटिसीचा खर्च देणें, कळावें. तारीख १२ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) चेनाजी वल्लद मोहोणाजी मालगुजार मौजे टाकळी जिल्हा वर्धा याचे तर्फे त्र्यंबक भगवंत कुलमुखत्यार.

## नोटिस

सदू वल्लद [illegible] र माटरगाव तालुके [illegible] मदें सदू माळी [illegible] कसबे जळगांव तालुके मलकापुर जिल्हा बुलढाणें इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुझी मशी लग्न सुमार २० वर्षांपूर्वीं माझ्या अज्ञान दशेत झालें व त्याच सुमारास एक दोन वेळां तुझे घरीं काय जे येऊन राहिलें असेल ती खरी; बाकी माझे जाणतपणांत तूं मला कधींही घरीं नेऊन वागविल्याचें स्मरत नाहीं. मला तूं घरीं घेऊन जाऊन वागवावें ह्मणून माझे बापानें कित्येक वेळां तुला बोलावून आणून पंचासमक्ष गुदस्तकाळ समज दिली व राहवून घेतलें पण तूं न रहातां गावोगाव पळत फिरतोस या वरून माझा तुला कांहीं उपयोग नाहीं असें सिद्ध होतें व इकडे माझा संसार व्यर्थ जात आहे ह्मणून ही मुदास नोटिस देत आहे तर ही पावल्यापासून १५ दिवसांचे आंत मला एथें १२ वर्षांत अन्न वस्त्राला दरसाल ५० रुपये प्रमाणें ६०० रुपये [illegible] झाले आहे ते आणून देऊन मला घेऊन जावें व वागवावें नाहीं पेक्षां रुपयांबद्दल मला फिर्याद करून दुसरा गंधर्वाचा घरठाव करण्याची कायदेशीर तजवीज करावी लागेल. व तेणेंकरून कोर्ट खर्चही तुह्मास वावा लागेल ह्मणून मला फारकत देऊन मोकळें करावें. कळावें ता० १७ एप्रिल सन १८७९ इ.

( सही ) भागी मर्दे सदू माळी निशाणी हातची बांगडी

## नोटिस.

मुंगसी मर्दे अनाजी भाळणें कुणबी कुटासेकर हल्लीं वस्ती रामतीर्थ प्रगणे दहीहांडे तालुके दर्यापुर इस अनाजी वल्लद येकोबा भाळणें कुणबी रहाणार कुटासें प्रगणें दहीहांडा तालुके अकोट याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुमकडून वऱ्हाडसमाचार पत्रांत तारीख १ एप्रिल सन १८७९ इसवीची नोटिस आली ती पावली तिचा उलट जबाब देण्यांत येतो कीं तुझे लग्न मजसी लागण्यास सुमार १४।१५ वर्षें झालीं असतील आणि तुजला ऋतुप्राप्त झाल्यावर तूं मजपाशीं सात वर्षें होतीस तेव्हां मजमध्यें पुरुषत्व नाहीं असें तूं कधीं ह्मटलें नाहीं. असें असतां हल्लीं तूं मला दूषण लावतेस हें बरोबर नाहीं. मी तर घरीं नसतां, तुझे भावानें माझे पश्चात जबरीनें तुजला नेल्यावरून येथून जाण्यास तीन वर्षें झालीं असून दरम्यान तुजला आणण्याकरितां मी कित्येक वेळ आलों असतां बहाणे केले. गुदस्त सालीं तुजकरितां आठ दिवस राहून तूं आली नाहींस. हल्लीं तरी तुजला माझे घरीं येण्यास कांहीं हरकत नाहीं. असें असतां दुसऱ्याशी लग्न लाविलें जाऊं नये. इतक्यावर करशील तर जो तुशी मुहुर्त लाविल त्यावर आणि तुझ्यावर फौजदारींत फिर्याद मी केली ह्मणजे शिक्षेस पात्र व्हाल. हें लवकर समजून आजपासून १५ दिवसांचे आंत माझे घरीं तूं यावेस. न आल्यास तुजला कबजांत घेण्याविषयीं तुजवर मी दिवाणी कोर्टांत फिर्याद करीन. व या नोटिशीचा खर्च घेतला जाईल. कळावे तारीख १४ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) अनाजी येकोबा भाळणें कुणबी रहाणार कुटासें ता. अकोट नि० खुद हातची रेघ

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस वि. वि.

हिंदुस्थानदेशाचीमाहिती इतिहासावरून पाहिल्यास च्यार हजार वर्षांपासून आहे. पूर्वीची माहिती कांही नाहीं. ह्मणजे ती समजण्यास साधनीभूत जो इतिहास तो उपलब्ध नाहीं. आतां चार हजार वर्षांची जी माहिती आहे तिजवरून पाहिलें अ- सतां ह्या हिंदुस्थान देशावर अनेक लोकांचे अमल झाले. यांत आर्यधर्माचे, क्षत्रिय कुलातले, महमदी धर्माचे, हिंदुधर्माचे, व खिश्चियन धर्माचे हे प्रख्यात आहेत. या सर्वांची राजरीती प्रजा पाळण करण्या- ची रीती ही भिन्न भिन्न तऱ्हेची होती. हल्लीं सर्व हिंदुस्थान येका सार्वभौम राजा चे हातीं आहे. ते राजे इंग्लिश होत त्यांची राज्य व्यवस्था व प्रजाजन यागवि- ण्याची किंवा सुख ठेवण्याची युक्ति ही व- र्णनीय आहेत इतकेंच नव्हे तर कांहीं कांहीं प्रसंगी इतर राजांनीं त्यांचा कित्ता घ्यावा असी आहे. पण एकंदर चोंढेपणां- त येकादा अपश असतो असें ह्मणतात. जसें:— यद्रकोलिन्नतांहिमहिमूगिलैक्षारमे वळेसागेर ॥ तसा एकादा दोष आमचे हितकर्ते जे राजधुरंधर त्यांच्यामध्ये नाहीं पण या राजाचे हाता खालीं दोन अफाट राष्ट्रें आहेत एक हिंदुस्थान, दुसरें इंग्लंड आणखीही सर्व खंडामध्यें यांचें रा- ज्य आहे. सर्व देशांतील रहिवासी हे या राजाची प्रजा आहेत प्रजा आणि राजा यांचे नातें आई बाप व लेंकरे याप्रमाणें आहे. येका आई बापाचे पोटीं चार मुलें जाहलीं तर-त्यांची प्रीती सर्वांवर सार- खी असली पाहिजे, तशी जर नसली तर त्यांनीं लेकरांचें पालन यथान्यायानें केलें जाईल असें होणार नाहीं काय? इंग्लंड व हिंदुस्थान या दोन राष्ट्रांचें राज्य येका च राजाचे आहे तेव्हां तो देश आणि हा देश बंधुवर्गीय आहे, यांतील प्रजा एका कुटुंबांतील झाली. मग इंग्लिशलोकांबद्दल व हिंदुलोकांबद्दल वेगळी कल्पना कां अ सावी? आतां विद्येनें, संपत्तीनें, व शहाण पणानें वडिलाकडे विशेष अधिकार खरा पण जो ह्या गोष्टिनी कमती असतो त्या चे वडिलांपेक्षां जास्त संरक्षण करावें ही माता पित्याची सर्वत्र रीत आहे. व हेंच समजून हिंदुस्थान देशांत विद्येचा प्रसार व्हावा, व्यापार वाढावा, लोक सुखी व्हा- वे ह्मणून लक्षावधि रुपये सरकार खर्चित आहे. व हें कोणीही कबूल करील. पण यांत एक मोठा घोटाळा दिसतो तो हा कीं इंग्लिश प्रजेचे हिंदु प्रजेवर फार व र्चस्व आहे. आता वर लिहिलेले गुणपरत्वें तेवढा मान त्यांजला देणें रास्त खरा पण त्यांत कांहीं वडल आहेत व धाकले आहेत त्या प्र माणावरून तुलस्यां मामाचेच ते धाकले न व्हे हिंदु ह्मणजे मनुष्यांत जसे क्षुद्र प्राणी त्याप्रमाणें कोठें कोठें मानितात. मोठ्या अधिकाराच्या, मोठ्या योग्यतेच्या, किंवा राजकारस्थानीपणाच्या जागा हिंदुस इं ग्लिशांबरोबर मिळाव्या काय? इंग्लिश लोक रहातात तेथें स्वच्छता विशेष पाहिजे, पाणी निर्मळ पाहिजे, हिंदुस हीं आवश्यक नाहींत काय? युरोपियनाचा न्याय हिंदु न्या याधिशापुढें होऊं नये. हिंदूचा न्याय को- णापुढें चालतो; संग्रामांत पुढें बळी हिंदू मागून जयघोष इंग्लिशांनीं करावा. तर ही गोष्ट समदृष्टीनें राज्य करणाऱ्या न्यायी राजास सुधारणें आवश्य आहे.

आतां हें खरें आहे कीं आमच्या हिंदु राज्य कारकीर्दीतही आजा सर्व प्रजेस इ- तकी निर्भयता व असें सुख नव्हतें, ह्मणून आह्मी कांहीं बोलूं नये. पण मिळण्याची सवड असली व दाता दयाळू असला ह्मण जे मागणारे अधिकाधिक इच्छितात व आपली सर्व उणीव नाहींशी व्हावी असें त्यांस वाटतें. तद्वत इंग्लिश राज्यापासून आह्मांस पुष्कळ सुख आहे व हें राज्य अ क्षय असें आह्मी मनापासून इच्छितों. व आह्मांस अजून जें उणें आहे तें सर्व यां- नीं परिपूर्ण करून द्यावें असें त्यांस प्रार्थितो. ग. ब.

## वऱ्हाडसमाचार

मिति चैत्र वद्य १४ शके १८०१

## अड्रेस कमिटीची बडी सभा.

संकेत ठरल्याप्रमाणें गेले सोमवारीं मे. दस्तुर मेहेरजी साहेब सी आय ई यांना अड्रेस देण्याचे विचाराकरितां टौनहालांत तिसरे प्रहरीं सभा भरली होती. अशी मो ठी सभा व ती बहुतेक बाहेर प्रांतांतील लोकांनीं गजबजलेली अकोल्यास पहाण्या चा हा पहिलाच प्रसंग होय. जिल्ह्यांजि- ल्ह्यांतून जहागिरदार, मौलवी, काजी, दे शमुख, देशपांडे, सावूकार, पाटील व इतर संभावित गृहस्थ मिळून सुमार साडे- तीनशे गृहस्थ आले होते ते व गांवचे लो क मिळून सुमार ८०० लोक सभेस होते व १३०० लोकांनीं वाढेकरून पत्रें पाठवून आपली संमती मिळविली होती. टौनहाला त बसावयास जागा नसल्यामुळें शेंकडो लोक बाहेर उभे राहिले होते साडे पांच वाजतां सभेस आरंभ झाला. रा. ब. नारा यण भाई डायरेक्टर यांना अध्यक्ष स्थान स्वीकारण्याविषयीं विनंती झाली व ते त- त्पानापन्न झाले व त्यांनीं सुरस भाषण के लें. नंतर सभेच्या सेक्रेटरींनीं मानपत्र दे- ण्याविषयीं परवानगी मिळण्याविषयीं सर कारास अर्ज पाठविण्याविषयीचा मसुदा वाचिला. व मे. मेहेरजी साहेबांच्या ज- नम गुणाबद्दल सर्व लोकांचे उद्गार दर्शक एक निबंध वाचिला त्यांत भाई साहेब व हाईन सरकारी लोकांवर हास्तक्षेपाच्या पासूनचीं त्यांची सर्व सत्कृत्यें सुरस रीतीनें सविस्तर वर्णिलीं होती. नंतर रा. रा. यों ही बाळकृष्ण एडिटर वऱ्हाडसमाचार यांनीं त्या लेखाचें मंडण करून वाढेल गांवच्या लोकांच्या येण्यानें भाई साहेबांच्या मानपत्रा स लोक अत्यंत उत्सुक आहेत तें सांगित ले, व सरकारांत जें मानपत्र पाठवावयाचें त्यांत याच निबंधांतील गोष्टी संक्षिप्त री- तीनें लिहाव्या असें सांगितलें व डायरेक्ट र साहेबांनींही मानपत्र थोडक्यांत पाठविणें चांगलें असें सांगितलें. दुसरी त्यांनीं एक शंका काढली कीं सरकारी कामावर भाई सा. असतां त्यांस मानपत्र देण्यास सरका- र परवानगी देईल किंवा नाहीं याचा सं शय आहे. याजकरितां सरकारानें याबेळी आपली गोष्ट मान्य केली नाहीं, तर पुढें ते पेनशन घेतील त्या प्रसंगीं हा बेत क रून यांच्या हस्तक्षेप आणखी यानाची व त्यांच्या स्मरणाचीं कृत्यें करावीं असें सांगित लें. नंतर सर्वानुमतें मानपत्र देण्याची पर- वानगी मागण्याचा ठराव झाला. व पानसु पारी अत्तर गुलाब फुलें देऊन सभा विस र्जन झाली.

## म्युनिसिप्यालिटीचांचा वार्षिक रिपोर्ट.

वऱ्हाडांत कायद्या प्रमाणें एकंदर ९ म्युनिसिप्यालिट्या आहेत. त्यांचा वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध होत असतो त्याप्रमाणें सन १८७७।७८ साळचा रिपोर्ट नुकताच छापून प्रसिद्ध झाला आहे व तो रेसिडेंट सा० नीं मेहेरबानीनें आह्मांस पाठविला आहे तो स्वीकारून त्याविषयीं आह्मी आ- पले थोडे विच्यार प्रदर्शित करितों.

प्रथमतः कमिटीच्या कामाच्या स्वरूपा विषयीं सांगू. वऱ्हाडांत म्युनिसिप्यालिट्यां- ची स्थापना होऊन बरींच वर्षें झालीं आ- हेत. ज्या कायद्याप्रमाणें त्या स्थापिल्या गे- ल्या त्याप्रमाणें वऱ्हाडांतील म्युनिसिप्यालि ट्यांकरितां ठरविलेल्या विशेष नियमाप्रमा- णें आजपावेतों जनरल कमिटी व तिची शाखा म्यानेजिंग कमिटी असून सर्व का म वास्तविक जनरल कमिटीनेंच करावया- चें परंतु सामान्य दिनचर्येचीं कामें व जन रल कमिटींत ठरलेलीं कामें म्यानेजिंग कमिटीनें करावीं असा नियम आहे. हल्लीं नवीन कमिशनर सा० चे मत आहे कीं. म्युनिसिप्यालिट्यांचा सर्व अधिकार म्याने जिंग कमिट्यांत वाढवित असून जनरल कमिट्या फक्त नावाच्या आहेत वास्तव ही पद्धत मान्य आहे. म्यानेजिंग कमिट्या चे बुद्धीच कांहीं कारण नाहीं. सर्व कामें जनरल कमिट्यांनीं त्यांचे मुख्य सूत्रधार जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर यांचे देखरे- खी खालीं स्वतां करावीं. हें मत रेसिडेंट साहेबांसही मान्य आहे असें तसेंच ह्मण तात. परंतु आमचें मत यासंबंधींत यांहून भिन्न आहे, म्यानेजिंग कमिट्यांनीं जनर- ल कमिट्यांचे अधिकार बळकाविले असें कमिशनर साहेबास कदाचित कांहीं उदा हरणावरून दिसून आलें असेल. परंतु त सा प्रकार वास्तविक कोठें नाहीं, तेथें म्याने जिंग कमिट्या असणें गैर नाहीं, इतकेंच नाहीं परंतु अवश्य वाटतें त्या असणें अ- वश्य आहे. हातांखालील कामदार आपलें काम मर्यादेच्यातिरिक्त करितो ह्मणून मु- ळींच कामदार नको असें ह्मणणें हें मत कांहीं बरोबर नाहीं, कामदार चुकून मर्या- दा सोडतो तर त्याचा उपाय दुसरा आहे तो योजावा. कायद्यानें म्युनिसिप्यालिट्यां चीं कामें निर्दिष्ट केलीं असून म्यानेजिंग कमिट्यांनीं काय काय करीत जावें हेंही स्पष्टपणें ठरविलें आहे. सर्वच काम जनर ल कमिट्यांनीं करावें ह्मटलें तर होणार नाहीं. कारण त्या कमिट्यांचे मेंबर निरनि राळ्या धंद्याचे लोक असून त्या सर्वांनीं क्ष ण मिळवा कामाकरितां वारंवार एकत्र जमून बसणें अशक्य आहे. म्यानेजिंग कमिट्यांत हल्लींच्या नियमावरून अधिका र आहेत ते फारच बेताचे आहेत. फार जरूरीच्या व अवश्यकतेच्या प्रसंगाशिवाय म्यानेजिंग कमिट्यास पैसा खर्च करण्याचा अधिकार नाहीं, नवीन कामें करण्याचा अ धिकार नाहीं, कोणत्याही भानगडीच्या कामांत मुखत्यारीनें हुकुम देण्याचा अधि कार नाहीं, त्या कमिट्यांचें काम इतकेंच आहे कीं जनरल कमिट्यांतून जे ठरेल व जे हुकुम होतील त्यांची अमलबजावणी करावी, दिनचर्येचीं व साधारण वहिवाटींतील का में करावीं, कमिटीचे (जनरल कमिटीचे) नियम पाळले जातात किंवा नाहीं याविष यीं देखरेख ठेवावी आणि नोकर लोक आपलीं कामें बरोबर करितात किंवा नाहीं हे वारंवार पहावें. आमच्या मतें म्यानेजिंग कमिट्याकडेसे हीं कामें असलींच पाहिजे- त; कारण जनरल कमिट्याकडून तीं अ- शी व्हावीं तशीं होणार नाहींत. उमराव तीची जनरल कमिटी वर्षांतून दोन वेळां मात्र भरली ह्मणून सर्व प्रांतांतील वहिवा- ट चुकीची आहे व सर्वच डिपुटी कमि शनर कमिट्याकडेस लक्ष्य पुरवीत नाहींत अथवा उमरावतीप्रमाणें सर्व प्रांतांतील म्यानेजिंग कमिट्यांनीं जनरल कमिट्यांचे अधिकार बळकाविले असें ह्मणणें थोडें व मस्करीक आहे. जर म्यानेजिंग कमिट्या आपणाकडे विशेष अधिकार घेतील तर तो दोष जनरल कमिट्यांचा आहे- पाहि- जेत तर आहेत याहून आणखी सक्त निय म करावेत आणि जिल्ह्याचे अधिकारी ति तकें लक्ष्य पुरवितात त्याहून त्यांनीं अधिक पुरवावें ह्मणून त्यांस हुकूम द्यावे.

म्युनिसिप्यालिटीला सेक्रेटरी स्वतंत्र न सावा. मध्य प्रांत, वायव्य प्रांत, आणि मुं बाई यांतील वहिवाटीप्रमाणें असि. कमि शनरांनीं ते काम करित जावें असें कमिश नर साहेबें ह्मणतात. असें करण्यानें जेथें पगारी सेक्रेटरी आहेत तेथें पैशाचा थोडा बच्याव होईल हें खरें आहे, परंतु सेक्रेटरी चें कामीं असिस्टंट कमिशनर असावे व म्यानेजिंग कमिटी मोडून सर्व काम जनर ल कमिटीनें डिपुटी कमिशनरच्या योजना नें स्वतः करावें असें झालें ह्मणजे याचा परिणाम, ज्या अर्थी जनरल कमिटीचे मे बर सार्वकाळ सर्व कामाकडे पाहूं शकत नाहींत त्या अर्थी, असा होणार कीं म्युनि सिप्यालिटीचें सर्व काम डिपुटी कमिशनर व असिस्टंट कमिशनर हे करणार, व क-

मटीचे इतर म.र नावाचे मात्र अधि... राहणार. इत्यकारभाराची रीती लोकांस कळावी व यांनी स्वतंत्रतेने आपले सुखसोईचा बंदोबस्त राखावा म्हणून म्युनिसिप्यालिट्यांची योजना आहे व याकरिताच लोक आताही योजले परे बहुत प्रौढ लागले आहेत, तर यथा वेळेस त्यांस अधिकार दिल्यावाचून बरे नाही. डेप्युटी कमिशनराप्रमाणे वजनदार अधिकारी जिल्ह्यांत दुसरा नाही हे कमिशनर साहेबांचे म्हणणे खरे आहे परंतु जिल्ह्याचे ठिकाणी वजनदार, पक्के विचाराचे, व म्युनिसिप्यालिटीची कामे सुयंत्र करणारे असे गृहस्थ नाहीत असे नाही. म्युनिसिप्यालट्यांच्या खऱ्या हेतूप्रमाणे पाहिले असता या कामी डेप्युटी कमिशनर यांचे वजनाची मुळीच गरज नसावी. याशिवाय लोकांनी आपण होऊनच ते अधिकार लोकांच्या सुखसोईस अनुलक्षून चालविले पाहिजेत. जिल्ह्याचे अधिकाऱ्यांची मुखती दिसरेच वस आहे, व आम्हास वाटते तथा प्रकारचे लोक आज लागली दुर्मिळ आहे असे नाही.

कमिशनर साहेब म्हणतात की वऱ्हाडांतील म्युनिसिप्यालिट्यांच्या हद्दींत रहाणारे लोकांस कर फारच थोडा द्यावा लागतो. तेव हा अधिक असावा. या बाबतीत सही काम चालू आहे व कवकरच म्युनिसिपल फंड वाढविण्यात येईल असे आम्हास वाटते. जेथे खर्च फार आणि उत्पन्न थोडे असे असेल तेथे खर्च घटवावा. किंवा उत्पन्न वाढवावे याशिवाय दुसरा उपाय नाही. हल्ली म्युनिसिप्यालिट्यांस रोज खर्च मोठा म्हणजे पोलिस व दवाखाने यांचाच आहे. बाकी काही खर्च होत पण त्या त्या खर्चासाठी निरनिराळी उत्पन्नेही आहेत. जसे—बाजारसुधारणे खर्च लागतो. यासाठी बाजारसंबंधी कर आहे, यांप्रमाणे काटनमार्केट, तम्बाखूदलाली इत्यादि खर्च आहेत व यासाठी स्वतंत्र उत्पन्नेही आहेत. रस्तेदुरुस्तीकरिता खर्च लागतो, यासाठी काही ठिकाणी गाडीपट्टीही बसली आहे. व कोठे ती अजून बसणार आहे. ही उत्पन्ने व हे खर्च कमिट्यांच्या स्वाधीन आहेत. पोलिस व दवाखाने हे खर्च असे आहेत की या खात्यांतून जसे जसे खर्च होतील तसतसे ते म्युनिसिप्यालिट्यांस द्यावे लागतात, म्हणून ते भागविण्यासाठी कर असणे योग्य आहे. व त्याप्रमाणे तो आहेही, परंतु सर्वांवर बसणारे नवीन कर ही योजना पुढे आहे. पण आम्हास वाटते की, हल्लीच्या हरिद्रीस्थितीत लोकांवर कराचे ओझे होतके कमी असेल तितके बरे. साधल्यास खर्च कमी करावा. पण कर वाढवून नवा वाढणारे खर्च आधिक करू नयेत. पोलिसाचा खर्च कमिट्यांस द्यावा लागतो. परंतु प्रमाणाने पोलिसाची मदत कमिट्यांस मिळत नाही असा या लोकांचे कमिट्यांचा पुकारा आमचे ऐकण्यांत आहे. दवाखान्यास पाहिजे त्या औषधी सरकाराने पुरवाव्या असे आहे पण हल्ली या औषधींचा पुरवठा हवा तितका सरकारांतून होत नाही म्हणून बाजारांतून देखील औषधे दवाखान्याकरिता घ्यावी लागतात. व तो खर्च कमिट्यांस पूर्वीच्या संकेताबाहेर द्यावा लागतो असेही कधी कधी पडण्यांत येते.

खामगावास घरपट्टी आहे व ती फारच थोडी असल्यामुळे मुळीच नसल्यांत जमा आहे असे कमिशनर साहेबांचे मत आहे. उमरावती आणि इलिचपूर, एथे गाडीपट्टी आहे परंतु ती वसूल करण्यास खर्च फार लागतो. कर वसूल करण्यासाठी नवा खर्च न ठेविता काम होईल असे प्रकारे कर बसवितांनी योजना पाहिजे असे त्यांचे मत आहे. हे काही वाईट नाही. सदरील करांचे उत्पन्नाचा वसूल कमिट्या स्वतः न करिता मक्ते देतात पण तो कमिशनर साहेबांस पसंत वाटत नाही.

कमिट्यांचे वर्षांचे जितके उत्पन्न होईल त्यांतून वर्षांत होणारे सर्व खर्च भागविले पाहिजेत. जुनी शिल्लक राखलेली असते तिच्यांतून साधारण खर्च करू नयेत. ती रकम सर्वकाळ नवीन आणि फायदेशीर अशा सार्वजनिक कामास लाविली जावी असे कमिशनर साहेबांचे मत आहे, व ते आम्हास पसंत वाटते.

उमरावती शहरांत लहानशा चांगल्या गढारे असावी आणि अकोला व उपराव ती एथे पाण्याचा पुरवठा व्हावा असे सरकारच्या मनांतून आहे. आम्हास वाटते आहे की, पुष्कळ वर्षे या गोष्टींची वाटाघाट चालू आहे परंतु पैशाची संगती नसल्यामुळे काही अजून येत नाही. अकोल्यास मनु या वर्षी नवरीत वरण वाढविण्याचा विचार आहे परंतु त्यायोगाने भरपूर पाणी शहरास विपुल होईल किंवा नाही हा संशय आहे. एकंदरीत या कामास पैसा फार लागणार परंतु संतोषाची गोष्ट ही आहे की, चांगली फलद्रूप अशी योजना सरकारास दाखविल्यास सरकारांतून त्याकरिता म्युनिसिप्यालिट्यांस कर्जाऊ रकम देण्यांत येईल असे रेसिडेंट साहेबांनी वचन दिले आहे. तेव्हा म्युनिसिप्यालिट्यांकडून आता या कामांत आळस होऊ नये अशी आम्ही उभय कमिट्यांस शिफारस करितो. अकोले आणि उमरावती ही दोन शहरे वऱ्हाडांत मुख्य आहेत. सबब एथे पाणी विपुल असणे अत्यंत अवश्यक आहे. आणि त्याकरिता सरकारचे कर्ज घेतल्यास खर्च भागून कर्ज फिटेल आणि आमचे एक काम होईल. व त्याकरिता लोक खुशीने पाण्याचा कर देतील असे आम्हास वाटते.

वऱ्हाडांत म्युनिसिप्यालिट्या ५ आहेत परंतु चांगल्या भरभराटीत व सुयंत्रस्थितीत एकही नाही असे कमिशनर साहेब म्हणतात हे त्यांचे म्हणणे अंशतः खरे आहे. दुसरे ते असे म्हणतात की जिल्ह्यांचे डेप्युटी कमिशनर यांचा संबंध कमिट्यांशी निकट नाही यामुळे कमिट्यांची कामे नकी चालावीं तशी चालत नाहीत. डेप्युटी कमिशनर यांच्या स्वभावावर पुष्कळांशी कमिट्यांची बरी वाईट स्थिति अवलंबून असते यांत संशय नाही. जर ते चांगले सुस्वभावाचे असले तर नेटिवांशी मोकळ्या मनाने वागतात व न डमोठाली लोकांचीच कामे त्यांच्या हातून करून घेतात. आणि ते तसे नसले तर सर्वांत सर्व कामे अधिकाऱ्यांच्या मताप्रमाणे होऊन मेंबर लोकांस आपल्या अधिकाराचा कंटाळा येतो आणि तसे झाले म्हणजे असंतोष उत्पन्न होऊन कमिट्यांच्या कामात लोकांचा उत्साह रहात नाही हे काम सार्वजनिक आहे व सरकारीही आहे म्हणून लोकांनी अंतःकरणपूर्वक पुढारी लोकांस मदत व उत्तेजन देऊन त्यांचे हातून करविले असता ते साहजीक भरभराटीत येईल. पुष्कळ पैसे उत्पन्न होणे व पुष्कळ पैसे खर्च होणे यांतच केवळ कामाची भरभराट किंवा सुयंत्रता नाही. काम व्यवस्थित प्रकारे होऊन प्रजेच्या आणि सरकारच्या सोईचे झाले म्हणजे ते लहान असले तरी चांगल्या भरभराटीत आहे असे आम्ही म्हणू. आणि अशा प्रकारे म्युनिसिप्यालिट्यांची भरभराट होणे आहे तर सर्व अधिकार म्युनिसिप्यालिट्यांच्याच स्वाधीन असले पाहिजेत. टौनफंडाचा कर डेप्युटी कमिशनर साहेबांनी बसवावा असे अलीकडे रेसिडेंट साहेबांनी ठरविले आहे. आम्ही समजतो की यांत सरकाराने म्युनिसिप्यालिट्यांचा अधिकार काढून घेतला. कोण मनुष्य किती कराची रकम देण्यास पात्र आहे हे डेप्युटी कमिशनर साहेबांस जितके कळेल त्यापेक्षा म्युनिसिप्यालिट्यांस अधिक बारकाईने कळणार आहे. व या पुढे जर बहुमताने ती रकम ठरली तर अन्याय होण्याचा बिलकूल संभव नाही. म्युनिसिप्यालिट्यांनी ठरविलेल्या कराविरुद्ध अर्ज आले असता पुष्कळ मतांनी त्याचा विचार करण्यास सबब आहे ती डेप्युटी कमिशनर साहेबांनी बसविलेल्या करास नाही. डेप्युटी कमिशनर जे करतील तो न्याय, आणि म्युनिसिप्यालिट्या बहुमताने करतील तर तो अन्याय असे म्हणणे केवळ साहस होय म्हणून कमिशनर साहेबांचे मत या बाबतीत असावे तसे पोक्त नाही असे आम्हास वाटते.

वऱ्हाडांतील म्युनिसिप्यालिट्या अद्यापि बाल्यावस्थेत आहेत, यांना चांगले शिक्षण मिळाले, चांगला आश्रय असला, चांगला अधिकार असला, चांगल्यारीतीने अजमावून पाहण्याची संधी मिळाली, यांच्यांत चांगल्या चांगल्या लोकांची निवड झाली, व लोकांस आपले हिताहिताचा विचार यामध्ये होतो असे दिसून आले तर खरोखर या भरभराटीस येतील यांचे उत्पन्नही झाडीप्रमाणे वाढेल, आणि सरकारचा इच्छित हेतु तडीस जाईल म्युनिसिपल कमिटी काय की कमेटी व लायक कमेटी मुख्य शाबूत. अशी स्थिति आज असल्याचे कमिशनर साहेब म्हणतात; पण आम्हास वाटते की म्युनिसिपल कमिट्या काढून टाकिल्या, कर बसविण्याचा अधिकार डेप्युटी कमिशनरास दिला, व सर्व कामे डेप्युटी कमिशनरांचे धोरणाने त्यांचे सेक्रेटरी असिस्टंट कमिशनर यांच्या हातून होऊ लागली म्हणजे डेप्युटी कमिशनर व त्यांचे असिस्टंट हीच काय ती कमिटी व तीच कमेटी असे बहुतेक अशी स्थिति होणार आहे असे आम्हास वाटते. ज्या शहरास म्युनिसिप्यालिट्या नाहीत त्या शहरास सरकारी अधिकारी हेच काय ते कर्ते व इतर लोक काय ती त्यांनि हाती तीच बहुधा अशी आज स्थिति आहे व तीच पुढे या मार्गाने म्युनिसिप्यालिट्यांच्या गावांतही होणार आहे.

आमचे रेसिडेंट साहेब व कमिशनर साहेब आमचे सुदैवाने आम्हास चांगले मिळाले आहेत, पण यांच्या कारकीर्दीत म्युनिसिपालिट्यांचे सदरी लिहिल्याप्रमाणे अधिकार नष्ट होत आहेत ही गोष्ट मोठी शोचनीय होय. यांनी केवळ उमरावतीच्या उदाहरणावरून सर्व म्युनिसिपालिट्यां विषयी आपले मत न देता कांस उत्तम योजना करावी; कारण म्युनिसिपालिट्यांची योजना सर्वांशी रयतेच्या हिताकरिता आहे म्हणून यांजवर नजर ठेवण्यास रयतेला स्वातंत्र्य विशेष असावे व ते सरकाराने द्यावे अशी आमची सरकारास शिफारस आहे.

आता आम्ही आपले वाचकांस प्रत्येक कमिटीचे उत्पन्न व खर्च याची माहिती देऊन हा लेख पुरा करितो. याहून अधिक माहिती या निबंधांत लिहवत नाही.

| | जमा | खर्च. |
|---|---|---|
| इलिचपुर | १४२८६ | ११७७९ |
| उमरावती | १३०३९ | १७१०१ |
| अकोला | ८७१० | ११९९१ |
| खामगाव | १४१११ | ११९७० |
| वाशीम | २१७८ | २३११ |

अकोल्यास जमेपेक्षा ३२८१ रु. खर्च अधिक झाला व तो गुदस्त शिलकेतून केला आहे.

## वऱ्हाड.

कर्नल बुषबी साहेब बुलढाण्याचे डेपुटी कमिशनर २१ वे तारखेस रजेवर जाणार व यांचे काम पहाण्यास शिकार्पेनहून मि० मौलिस साहेब असिस्टंट कमिशनर या आठवड्यात मुंबईस परत आले त्यास नेमणार असे समजते. मि० मौलिस साहेब लवकरच एथे येतील.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटते की, मि० फिशन साहेब वाशिमचे पोलिस सुपरिंटेंडेंट हे वाघाचे शिकारीवर गेले होते. तिकडे त्यांस जबर जखम होऊन ते मरण पावले. त्यांचे जागा मि० हिप साहेब किंवा हावसम साहेब यांस मिळेल.

मि० बन्से साहेब उमरावतीचे ट्रेझरी आफिसर रजेवर गेले व त्यांचे काम कोर्टाचे मदत मि० निकोलिटस साहेब यांस कलाकवाची हुद्दा असल्यामुळे त्यांस त्यांचे काम पहाण्यास तूर्त हुकूम झाला आहे.

एथील म्युनिसिप्यालिटीचे सेक्रेटरी रा. रा. संकराव बाळरजी कडके यांनी या जागेचा राजिनामा दिला सबब सेक्रेटरी नेमण्या विषयी बुधवारी जनरलसभा होणार आहे.

अकोल्याबाहेरील मोठी धर्मशाळा मि. भैरुजी पेस्तनजी यांनी बांधलेली शिकस्त झाली आहे ती दुरुस्त पुनः बांधण्याची तजवीज मे. द. बहिमनजी साहेब यांची आहे यांनी लोकांच्या सहायाने चालविली आहे. तीकरता वर्गणी झाली असून रु. बाकी आहे व १।२ दिवसांत कामाची सुरवात होणार आहे.

खामगावकरांचे नाटक १ आठवडे एथे आहे. व परवा दुसरेही एक खामगावकर यांचे व मिश्र नाटक येऊन दोघांचेही काल खेळ झाले पाहिले नाटक चांगले झाले आहे.

## वर्तमानसार.

कलकत्यास महामारीचे आजाराने मा

त्र खात्याकडील एक युरोपियन गृहस्थ मरण पावले.

ब्रह्मदेशचा राजा इंग्लिश सरकारचे सल्यानें वागणार व लढाई होणार नाहीं. अशीं वर्तमानें आलीं आहेत.

कलकत्याचे पत्रकेंत मि. राबर्ट नाइट वायव्य प्रांतांत फिरून आले. त्यांची अशी समजूत झाली आहे कीं इंग्लिश राजाचे नेम हिंदुस्थानांत बरोबर रीतीनें अमलांत येत नाहींत.

या आठवड्यांत आफ्रिकेंतील लढाईची बातमी कांहीं चमत्कारिक दिसते. विलायतचे तारीख ४ चे तारेवरून कळतें कीं झुलू राजा तह करण्यास तयार आहे व त्याचें ह्मणणें झुलू लोकांनीं इंग्लिशावर प्रथम स्वारी केली नाहीं परंतु इंग्लिश लोकांनीं झुलू लोकांवर स्वारी केल्यामुळें हल्लीं दम्यान एथें मोठी लढाई झाली या साठीं झुलू राजांच ह्मणणें तह करावा असें आहे. तारीख ६ च्या तारेवरून कळतें कीं झुलू लोकांच्या राजाचा बंधू (हा झुलू गादीवर हक्क सांगणारा आहे) औहाम त्याचा मुलगा व १०० झुलू लोक हे इंग्लिशांच्या स्वाधीन झाले आहेत. या नंतर ता. ७ चे लंडनचे तारेवरून कळतें कीं कालेनीसचे सेक्रेटरी आफ स्टेट यांणी हाऊस आफ कामन्समध्यें असें बोलून दाखविलें कीं तह करण्यास कबूल आहो. ह्या झुलू राजाच्या ह्मणण्यांत खरेपणा आहे किंवा नाहीं याचा संशय आहे यासाठीं झुलू राजा पूर्णप्रर्णे शरण आल्याखेरीज आह्मांस त्याचे ह्मणण्याचा भरवसा ठेववत नाहीं.

चीन सरकारानें काशगरिया प्रांत जिंकून घेतल्यामुळें तेथील रशियाचे व्यापारास धोका आला आहे. सदर्हू प्रांतांत रशियन व्यापाऱ्यांनीं व्यापार चालवू नये असें चिनी अधिकाऱ्यांनीं हुकूम केले आहेत.

फौजदारी काम चालविण्याचें नवीन कायद्याचें बिल हिंदुस्थान सरकारच्या गेझेटांत प्रसिद्ध झालें आहे. हा नवीन कायदा सन १८८० सालाचे आरंभापासून अंमलांत येणार. हायकोर्टाचा क्रिमिनल प्रोसिजर प्रेसिडेन्सी व माजिस्त्रेटस आक्ट हे या नवीन कायद्यांत सामील करणार.

खजिन्यांतून सावकार लोकांकडून व श्रीमंत लोकांकडून आह्मांस ५० लक्ष रुपयांची मदत केली पाहिजे अशा अर्थाचें एक पत्र पंढरपूर एथील बाब: साहेब खाजगीवाले यांस आलें असून त्याचें हाताखालीं "आपला हरी रामोशी व त्याचे अनुयायी जी. एच. ताम्हनकर झार्क रामोशी कंपनी" अशा सह्या आहेत.

दक्षिणेकडे अत्यंत भयंकर स्थिति झाल्यामुळें पुष्कळ लोक देशोधडीस लागले गेले चांगले लोक नोकरीचे आशेनें एथें येऊन पदरचें भांडवल गमवीत आहेत एक अमलदाराजवळ शिफारस चिठ्ठीनें दरें भरलीं असून रोज नवीन शिफारसी येऊन धडकत आहेत. मात्र नोकरी कोणास मिळत नाहीं एवढीच कमताई आहे की सर्व आनंद आहे नवीन घेणाराची मेद नवी असते परंतु लवकरच तिला ओहोटी येते. केवळ खिचडीवर निर्वाह करणाऱ्या ब्राह्मण लोकांची संख्या तर एथें रोज वाढत चालली आहे.

आजपर्यंत दुसऱ्या कित्येक राष्ट्रांप्रमाणें मुंबई एथें रशियाचा वकील नव्हता तो ठेवण्याविषयीं इंग्रज सरकारानें आतां रशिया सरकारास परवानगी दिली आहे असें समजतें.

जोडे घालण्याची मनाई— धुळें एथील इंग्रजी शाळेंत विद्यार्थी आणि शिक्षक जोडे घालून बसतात हें पाहून मे. कलेक्टर आणि जडज साहेब यांनीं जोडे घालण्याची मनाई केली त्यामुळें मुलांच्या पायांत जमिनीवर पसरलेल्या तट्टयाच्या काड्या काट्यांसारख्या रुतून इजा होण्याची भीति आहे असें आर्याबतावरून कळतें. या प्रकारें शाळेच्या कामांत व लोकांच्या खासगी वहिवाटीच्या कामांत हात घालण्याचा जडजास किंवा कलेक्टरास अधिकार असल्याचें आमचे माहितींत नाहीं. कलेक्टर आणि जडज यांनीं असा हुकूम करण्यास वास्तविक कारण काय हें वरील मजकुरावरून लक्षांत येत नाहीं. व कांहीं योग्य कारण असेल असें दिसतें नाहीं. यासाठीं कांहीं कारण नसल्यास आपल्या खासगी हक्कांत अमलदारास हात घालू देणें व अमलदारांनीं अमलाचे जोरावर हात घालणें दोघांसही केवळ मूर्खपणा आहे.

ने. ओ.

नाकांतून रक्त वाहात असतां तें बंद करण्याची उत्तम युक्ती ह्मटली ह्मणजे खात असतां जबडा जसा हालतो त्याप्रमाणें भरोभरें तोंड हालवावें. जर पोराचे नाकांतून रक्त वाहात असेल तर त्याच्या तोंडांत कागदाची गोळी घालून त्यास चावावयास लावावें.

आह्मास असें समजलें आहे कीं, सांगली संस्थानांतील मंगळवेढें येथें कांहीं महिन्यांमागें दरवडा पडला होता. त्यांतील कांहीं माल त्या इलाख्यांतील एका मारवाड्याचे दुकानीं मिळाला हा दरवडा पडला त्या दिवशीं तेथील ममलेदार, मुंसफ वगैरे लोकांनीं नाटक करविलें होतें तेंव्हां पोलिसही तें पाहण्यास गेलें होतें असें सांगलीचे कारभारी तेथें जाऊन चौकशींत निष्पन्न झालें, सबब अम्मल दाराची कामाची कसुरी आहे असें ठरवून सदरील कामगारास कामावरून तूर्त अमानत केलें आहे.

भावनगरपासून बोटादपर्यंत लोखंडी सडक तयार करण्याचें काम सुरू झालें असून तत्संबधाची सर्व देखरेख मि० इंजाउट यांजकडे ठेविली आहे. ही सडक तयार होण्यास ५०००००० रुपये खर्च होतील असा अजमास आहे.

ज्ञा० प्र०

## अफगाणसंबंधीं घोटाळा.

हें चालू झालेलें अफगाणी स्थान प्रकरण कोणत्या थरास जाणार हें अजून कांहींच समजत नाहींसें झालें आहे. अफगाणअमीर शेरअली तर कधींच मरूनही गेला. व त्याच्या मागें मूलगा याकुब अमीरपणा गाजवूं लागला. गादीवर त्याचा हक्क नसून आपला आहे असें ह्मणणारे दुसरेही एक दोन उठले, पण ते शांत होऊन त्या सर्वांचें ऐक्य झालें असें दिसतें. हा त्यांचा आंतील प्रकार चालला असतां इकडे इंग्रज त्यांच्या घरांत मारखें शिरतच आहेत. त्यांणीं अफगाणहद्दींत शिरून कंदाहार व जलालाबाद हीं मोठालीं दोन ठिकाणें आपल्या कबजांत घेतलीं. शांतता करा असें नव्या अमीराचे ह्मणणें पडून आपणास खुद काबुल शहरांत जाण्याची अवश्यकता नाहीं असें इंग्रज मुख्य सरकारचें ह्मणणें पडल्यावरून त्या उभय सरकारांत तहाचें बोलणें सुरू झालें आहे. आपली फौज खुद काबुल शहरापर्यंत नेऊन नंतर तह वगैरे काय करणें असेल तें करावा. [illegible] सरकार व हिंदुस्थानांतील [illegible] ह्मणणें असून आपणास [illegible] कांहीं कारण नाहीं. [illegible] करार करून घेतला ह्मणजे [illegible] विलायत सरकार व विलायतच [illegible] क यांचें ह्मणणें आहे असें दिसतें, इतकेंच नव्हे, परंतु आमच्या स्पष्ट हुकुमावाचून तुह्मी आपली फौज जास्त पुढें सरकवूं नये. असा विलायत सरकारानें हिंदुस्थान सरकारास हुकूम केला असावा असेंही दिसतें. कीं दोघांचीं मनें शांततेकडेच वळल्यामुळें उभयतांत तहाचें वगैरे बोलणें जारीनें चालू झालें. इंग्रज सरकार कोणत्या अटी कबूल करण्याविषयीं अमिरावर सक्ति करीत आहे हें मागच्या वेळीं सांगितलेंच आहे, पण त्या अटी कबूल करण्यास अमीर तयार आहे किंवा नाहीं अगर त्या अटींबद्दल अमिराचें काय ह्मणणें आहे. हें अजून कांहींच समजत नाहीं. नेहमी लढाया वगैरे चालू राहून मनुष्यांची हानी होऊन देशांत अस्वस्थता असणें चांगलें नाहीं अशामुळें तहाचें बोलणें करावें. अशी नव्या अमिराची इच्छा असल्याचें मागें एकवेळ बाहेर आलें होतें, पण इंग्रजसरकारानें आपल्या अटी पुढें केल्यावर अमिरानें काय जबाब दिला हें कांहींच समजत नाहीं. इकडे हा तहाचा प्रकार अशा रीतीनें चालू असतां अफगाणदेशांतील लोकांच्या स्थितीकडे पाहिलें तर त्यांची स्थिति कांहीं वेगळ्याच प्रकारची दिसते. मागच्या आठवड्यांत इंग्रजी फौजेशीं त्या देशांतील लोकांच्या बऱ्याच मोठ्या समाजाचा एक सामना झाला असून त्यांत त्यांचे जरी ४०० लोक मेले तरी त्यांत इंग्रज सरकारचे दोन गोरे व एक काळा असे तीन आफीसर व दुसरे कित्येक लोक मेले आहेत. तसेंच दुसऱ्याही कित्येक ठिकाणीं [illegible] त्या लोकांकडून आमच्या [illegible] होतें आहे. आमची [illegible] आली आहे त्या सर्व [illegible] बहुधा दररोज कोठें [illegible] धापा चालू आहे [illegible] या कृतीवरून दोन गोष्टी [illegible] एक त्या नव्या अमिराला देशांतील सर्व लोक मानीत नसावे त ह्मणजे त्याचा अधिकार सर्व लोकांवर चालत नसावा अगर दुसरी. हें अमिरानें सुरू केलेलें तहाचें बोलणें व इंग्रजांचें आपल्या देशांत आगमन हें त्या लोकांस आवडत नसावें. पैकीं कोणती गोष्ट खरी असावी याविषयीं विच्यार करूं लागलें ह्मणजे नव्या अमिराचा अंमल लोकांवर चांगला बसला नसावा असें तर वाटतेंच, पण या दंग्या धोप्यास तें दुसरें कारण विशेष महत्वाचें असावें असेंही वाटतें. हा तंटा उपस्थित होण्यापासूनची स्थिति मनांत आणल्यास इंग्रज लोकांनीं आपल्या देशांत येऊनये. असें अफगाणी लोकांचें ह्मणणें असून त्या करतांच हा सर्व खटला उपस्थित झाला आहे असें, अलटीमेटमचा अमिराकडून आरंभीं जो जबाब आला त्यावरूनही होतें व ती गोष्ट त्या लोकांच्या मनांत अगदीं दृढतर झाली असल्यामुळें ही नेहमीची मारामुटी त्या कारणानेंच होत असावी असें ह्मणण्यास कांहीं अडचण दिसत नाहीं. हा असा प्रकार असल्यामुळें नेहमीं मारामुटी चालू असल्यामुळें आह्मी जरी आज त्या देशांत शिरलो आहो व मोठाल्या छावन्या स्थापन करून राज्यकारभारही चालवूं लागलों आहों तरी आमचे ते प्रयाण निर्भय नाहीं आणि ते निर्भय करण्यास एकच मार्ग असून तो जोपर्यंत पुरा होणार नाहीं तोपर्यंत हा सर्व खटाटोप व्यर्थ होणार आहे असें कित्येक इंग्रजलोक स्पष्टपणें ह्मणत आहेत. तो मार्ग ते असा सांगतात कीं, सर्व अफगाण देश एकदम खालसा करून इंग्रजी राज्यांत दाखल करावा आणि एकवेळ सक्त उपाय करून हिंदुस्थानाप्रमाणें अफगाण लोकास निःशस्त्री करून टाकावें. आतां हें ह्मणणें कितीसें रास्त आहे व तें एकाएकीं कसें अमलांत यावें हा प्रश्न वेगळा, पण तसें झाल्यास चहुंकडे सर्व शांतता होईल. हें ह्मणणें खरें दिसतें व तें सरकारच्या मनांतही घोळूं लागलें आहे असें दिसतें. मिळून आज हा सर्व प्रकार अशा स्थितींत असल्यामुळें हें अफगाणप्रकरण अजूनपर्यंत एकंदरीनें घोटाळ्यांतच आहे असें दिसतें व त्याचा परिणाम कसा होईल हें अजून कांहीं सांगता येण्यासारखें नाहीं. असो ईश्वर सत्तेनें सर्व प्रकारचा निकाल शांततेनें होईल. अशी आह्मी आशा करितों,

अ. द.

## नोटिस

नारायण वल्द येसाजी शेळकी वस्ती इसोली प्रगणें आवढापुर तालुके चिखली जिल्हा बुलढाणे यास व इतर सर्वजनास कळावें कीं, आमचा हुकूमनामा मजकुरावर अजमासें १३५० रुपयांचा झाला असून त्याची अमलबारी होणें आहे यास्तव त्यानें आपला स्थावर व जंगम माल कोणास खरेदी अगर गहाण अथवा बक्षीस वगैरे एक प्रकारें देऊं नये व कोणी घेऊं नये या विरुद्ध कोणी वर्तल्यास जप्ती समयीं त्यास आह्मी कबूल करणार नाहीं ही आगाऊ सूचना केली आहे कळावें ता. १० एप्रिल सन १८७९ इ.

(सही) खुशालजी बा नारायण राबणकार सिराळकर दस्तुर तुकाराम राबणकार

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ३ अकोला. रविवार ता० २७ माहे एप्रिल सन १८७९ इसवी. अंक १६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

## रामजोशीकृत कविता.

अथवा

लावण्या भाग दुसरा

ह्या पुस्तकाची प्रथमावृत्ति लवकरच खलास झाल्यामुळें हल्लीं दुसरी आवृत्ति विशेष सुधारून टाइपावर छापविली आहे प्रथमावृत्तिपेक्षां या खेपेस कांहीं उत्कृष्ठ नवीन लावण्या घालून टीपा वगैरे दिल्या आहेत. त्यांची किंमत पूर्वीप्रमाणें अगदी थोडा ह्मणजे आठ आणे ठेविली असून बाहेरगांवीं मात्र टपाल खर्चाबद्दल अधा आणा अधिक पडेल. पुस्तकें पुण्यास आमच्याकडे किंवा ज्ञानप्रकाश व शिवाजी छापखान्यांत व मुंबईस इंदुप्रकाश छापखान्यांत मिळतील. कळावें तारीख १८ डिसेंबर सन १८७८ इसवी.

शंकर तुकाराम शालिग्राम.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांतही हीं पुस्तकें विक्रीकरितां आलीं आहेत.

## बापू गोखल्याचें चरित्र.

जुन्या बखरीचे आधारानें ᵕ नवीन उत्तम पुस्तक रा. रा. शंकर तुकाराम शालिग्राम यांनीं पुण्यात तयार केलेले आमच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत विक्रीस आलें आहे. याची किंमत १ रुपया असून डाकहशील एक आणा आहे. अगदी अलीकडील ह्मणजे पेशवाई अखेरच्या या शूर पुरुषाचें नाव सर्वत्र मशहूर आहे सबब त्याचें यथार्थ व सांद्यंत चरित्र बहुतास वाचावयास व संग्रहीं बाळगण्यास उत्साह असेल ह्मणून आह्मी मुद्दाम याच्या प्रती विक्रीस आणविल्या आहेत. सर्वांस कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## कौमुदीमहोत्साह.

या अत्यंत उपयोगी त्रैमासिक पुस्तकामध्यें "सिद्धांत कौमुदी" संस्कृत व्याकरण, आणि त्याचा शुद्ध मराठी अर्थ, स्पष्टीकरणार्थ भरपूर टीपा, आणि पाणिनीयादि सर्व आधारग्रंथ देऊन, आणखी दुसऱ्या अनेक सोई केल्या आहेत. आजपर्यंत पांच खंड प्रसिद्ध झाले. यांत संज्ञा, परिभाषा, पंचसंधि, षडलिंग, अष्टाध्यायी, गणपाठ, धातुपाठ, लिंगानुशासन, शिक्षा, अनुवृत्तीपूर्व भाग इतकें संपूर्ण झालें. पुढील प्रकरण चालू असून क्रियापदाला आरंभ केला आहे. शिवाय दोनशें शब्दांच्या संपूर्ण विभक्ति चालवून दाखविल्या आहेत. कागद चांगले, सांचा मोठा, छापणी सर्वोत्कृष्ट, प्रत्येक खंडांत १०० पृष्ठें, किंमत इतर पुस्तकांच्या मानानें फारच अल्प ह्मणजे प्रत्येक खंडाला केवळ एक रुपया, टपालखर्च एक आणा, पण वर्षाची वर्गणी अगाऊ चार रुपये पाठविल्यास टपालखर्च नाहीं, या पुस्तकाविषयीं मे. उत्तम पंडितांनीं उत्तम अभिप्राय दिले आहेत. ज्यांस हीं पुस्तकें घ्यावयाचीं असतील त्यांहीं कृपा करून आह्मास "पोष्टपेड" पत्रीं कळवावें. ह्मणजे पुस्तकें पाठविलीं जातील.

रामचंद्र भिकाजी गुंजीकर

कौमुदीमहोत्साहकर्ते

मुंबई काकडवाडी घरनंबर ८

## जाहिरखबर.

अकोला म्युनिसिपल कमिटी कडून:-- सर्वांस प्रसिद्ध करण्यांत येतें कीं ता० २२-१-७९ रोजीं जनरल कमेटींत काटन मार्केट मुकर झालें असून त्या संबंधी नेम मुकरर झाले आहेत त्या नेमांपैकीं कलम ८ चा नेम असा आहे कीं काटन मार्केटांत येणाऱ्या कापसाच्या प्रत्येक बोजास एक आणा प्रमाणें फी घेत जावी व याप्रमाणें दर एक खंडी कपासीस घेत जावी.

सदर्हू ठराव म्युनिसिपल कायद्याचें (सन १८७३ चा आकट ४) कलम ७ प्रमाणें छापून प्रसिद्ध केला आहे तर कोणास सदर्हू ठरावाबद्दल कांहीं हरकत असल्यास ती ता. १-५-७९ चे आंत म्युनिसिपाल आफिसांत लेखी कळवावी ह्मणजे तिजबद्दल विचार केला जाईल. कळावें ता. १८ एप्रिल सन १८७९ इ.

BYMANJEE JAMASPJEE

व्हाइस प्रेसिडेंट.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## वऱ्हाडांतील शाळा खातें

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:— व वि. वि. हिंदुस्थानांत इंग्लिश सरकारचें ज्य झाल्यापासून विद्येची अभिरुची मनुष्यमात्रांस लागत चालली आहे. हजारो शाळा स्थापन झाल्या आहेत. त्यांवर उत्तम विद्वान शिक्षक नेटिव व युरोपियन यांच्या नेमणुका झाल्या आहेत. व त्यांजपासून लक्षावधि मुलांस विद्यामृताचा लाभ होत आहे. आमचा हा वऱ्हाड प्रांत वर लिहिलेले स्याज्ञ राजसत्तेंत आल्यावर याही प्रांतांत विद्येचा प्रसार होण्याकरितां शाळा घातल्या. प्रथम या देशांत शाळा ह्मणजे काय हें माहित नव्हतें. व त्याजपासून उपयोगही जाणणारे कमच होते. सुमार १८६३ इ. साली सर्व वऱ्हाडांत एक डजन शाळा झाल्या. पुढें सरकारचे मनांत असें आलें कीं, शाळाखातें स्वतंत्र करावें व इतर इलाख्याप्रमाणें डायरेक्टर एजुकेशनल इन्स्पेक्टर वगैरे नेमून वऱ्हाडवासी लोकांस यथेच्छ विद्यामृत पाजावें त्याप्रमाणें करून त्यांनीं प्रथम मे. डाक्टर शिंडोयर यांस डायरेक्टर नेमलें त्याणीं इकडे येऊन पाहिलें तों हा मुलुख अज्ञानावस्थेंत आहे वहवापरत्वें बाहेरून विद्वान लोक येण्यास उत्सुक नाहींत आणि शिकलेले लोक मिळाल्याशिवाय विद्येची गोडी लोकांस लागणार नाहीं असें पाहून विच्यार केला आणि प्राणापलीकडे जी पैशाची आशा तिची प्रेरणा केली. मोठमोठाले पगार देऊन हुशार लोक मास्तर नेमिले. सन १८६६ सालांत २०० चे वर शाळा स्थापिल्या इतकेंच नव्हे तर ६०० जडजा

क्षां जास्ती मुलें विद्याभ्यासास लागलें

माणें सन १८७५ सालापर्यंत बरे २७ प्रमाणें

मन विद्येकडे लागलें. इतक्यांत ठरावावर अ-

वानें आसाहेबांनीं सतूकत्याचे कशी करणें.

परलेकीं गमन केलें. अशा

ऱ्हाडवासी लोकांस, मा साहेब रजेवर गेले स

उप्तन्न झालें. ती अर्डन साहेब फर्स्ट ग्रेड

गेचें अधिपत्य कोणायर यांस आफिशियेटिंग

तु कते सफळ हेपयर नेमिलें व गेले महिन्या-

निघाली कीं ही स ते आपले कामावर रुजू

खरीही होती.

ख्यतें करून

कारण आ ती आणि इलिचपुर यांचे दरम्या

त्याची आ न्याचे १५ वे तारखेपासून तांग्या

टिवांस सुरू केल्याविषयीं रेसिडेन्सी आर्डर

त्र काम हिरात प्रसिद्ध झाली आहे.

वांचे हे

मुलखांचें महिन्याचा आरोग्याविषयींचा रिपोर्ट

अशीं प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून कळतें

भवति उमरावती, इलिचपुर, वणी, अकोला

त्या णे बुलढाणा या पांचही जिल्ह्यांत तापा-

स आजार होता. व बुलढाणें अकोला आ-

सग वाशीम या जिल्ह्यांत गुरांनां रोग होता.

क

मि० नॉलिस साहेब विलायेतचे रजेवरून मुंबईस आल्ले गुरुवारीं एथें आले. व त्यांची नेमणूक वाशिमास आफिशियेटिंग डिपुटी कमिशनरच्या जागीं झाल्याप्रमाणें ते तिकडे गेले.

एथील नोटिव जनरल लायब्ररीला एक इमारत बांधावी असा विच्यार चालू आहे. व अथवा वाईट टान ... ...चे ... रून, ... ... फिरापर्यंत कोणालाही ... कामाच्या संबधानें, ... ... कोणाचे नुकसान करण्याची पाळी आली असेल पण त्याचा दोष ज्याचा त्याजकडेच आहे. कोणी चांगले काम केलें व प्रसंग आला तर त्याजला बढतीही मिळाली आहे. वगैरेवरून पहातां राव बहादुरांनीं वऱ्हाडांत जें काम केलें व करीत आहेत ते युरोपियनाचे कामाबरोबर तोलिल्यास हें पाडें भुईसांड होणार नाहीं. युरोपियनांचा दरारा मोठा, व ते राजसत्ताधारी पडले मग त्यांचे हातून बंदोबस्ताचीं व सुधारणुकेचीं कामें होतात यांत नवल नाहीं. पण वरील प्रकारचा एकही भाग नसून केवळ आपले अकलेचे जोरावर व विद्येचे बळावर ह्या अफाट राष्ट्राचे डायरेक्टरचें काम आज सुमार तीन वर्षें बिनहरकत बिनबोभाट, रयत आनंदांत ठेवून करीत आहेत व पूर्वी जो पैसा खर्च होत होता त्याचे दोन तृतीयांशाबरोबर खर्च करून विद्या पूर्वीपेक्षां तीनद्वितीयांशांनीं अधिक देत आहेत. हें पाहून संतोष वाटतो. कळावें हे विनंती.

लुटली

गवाच लबाडी

...पत्र झाला. त्यावरून ... ...ा शिपायावर विश्वास घाताची फिर्याद मूर्तिजापुरास चालणार ह्मणून समजतें.

मेजर लेन साहेब मे महिन्यांच्या आरंभीं च रजेवर जाणार यांच्या जाग्यावर कोण येणार हें अजून समजत नाहीं. परंतु बाजार गप्प अशी आहे कीं, हैदराबादेहून कर्नल मेन ह्यांच्या जाग्यवर येणार. ह्या जाग्यास खरोखर हक्कदार मे० राईट साहेब उमरावती एथील पोलिस सुपरइंनटेंडेंट हे सिनियर असल्यामुळें आहेत. प्र. सि.

वाशिमच्या डे. क. चे हेड क्लार्क मि० मेन हे लवकरच पेनशन घेणार त्यांचे जागीं येथील डे. क. अफिसांतील १०० रुपयाचे क्लार्क मि. थामसन ह्यांस नेमणार असें कळतें.

वऱ्हाडांत एक इन्स्पेक्टर आफ रेजिस्ट्रेशनची १२५ ची स्वतंत्र जागा करण्यविषयीं सांगशन झालें आहे. तसेंच डिस्ट्रिक्ट रेजिस्ट्रारानां एकेक २५ पासून ३५ पर्यंत इंग्लिश जाणणारा क्लार्क द्यावा अशा विषयीं ही मंजुरात झाल्याचें कळतें.

## वर्तमानसार.

इंग्लंडच्या राजघराण्यांतील पुरुष शनिवारीं विशेष मरतात असा १६७ वर्षांतील शोध एकानें लिहिला आहे. तिसरा विलियम राजा सन १७१२त मार्चाचे १८वे तारखेस शनिवारीं मरण पावला. कुईन आनी सन १७१४त आगष्टचे १ले तारखेस शनिवारीं मरण पावली. पाहला जार्ज सन १७२७ चे जूनचे १०वे तारखेस शनिवारीं मरण

बजवात चालू आहेत असें ह्मणतात त्यांचा सुरळीत निकाल होऊन ते सरकारी अधिकारांत प्रविष्ट होवोत अशी रयतेची इच्छा आहे. मागें तर त्यांस अम्याची नेमण्याचा बूट निघाला होता तो मागें पडून पेशकारी व ती ही प्रथम वीस रुपयांची करावी असें सरकारचे मनांत कां आलें तें कळत नाहीं.

दुसरेही असे तरुण वऱ्हाडी गृहस्थ सरकारचे नजरेपुढें येऊन ते अधिकारारूढ होवोत असें इच्छितो.

दर तहशिलींतून कित्येक मुनसरीमच्या जागा वऱ्हाडांतील देशपांडे लोकांस दिल्या आहेत त्यांतही आमचे रा. रा. भवानराव देशपांड्यासारखे तरुण व हुशार गृहस्थ अधिकार पावले आहेत हें पाहून संतोष वाटतो. कळावें ही विनंती.

एक वऱ्हाडी.

---

## वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख शुद्ध ६ शके १८०१

## रामोशांचा दंगा.

सरकारी आफिसांतून एका तरुण कारकुनानें हिंदुस्थानाचा मोठा नकाशा चोरून नेला आहे व तो कारकून रजा घेऊन गेला आहे आणि हल्लीं त्याचा पत्ता नाहीं, ह्मणून तो रामोशांत सामील झाला आहे, व त्याचे धोरणानें नकाशांतील रेषा साधून गावा पुढें गाव असा क्रम राखून रामोशांची गडबड चालू आहे तेव्हां राज्याविरुद्ध हा कट असावा व यांत कित्येक हुशार लोक सामील असावेत असा कोणाकोणाचा तर्क आहे; पण आह्मांस तसें बिलकूल वाटत नाहीं. मांग, रामोशी ही जात पीढीजाद लुटारू व चोर, स्वस्थतेच्या दिवसांतही ते चोऱ्या करणारे त्यांत आज तीन वर्षें त्यांत खाण्यास अन्न नाहीं, त्यांचीं शेतें पिकत नाहींत, सरकार शेतसारा सोडीत नाहीं, मारवाडी कर्ज देत नाहींत, व कोठें कांहीं काम धंदा त्यांनां मिळत नाहीं, तेव्हां निरुपाय होऊन उपाशी मरण्यापेक्षां अशी गडबड करून सरकारचे हातीं सापडून मरावें हाच इरादा त्यांचा असावा, किंवा पुढें काय होईल याजविषयीं त्यांनीं कांहीं विचारच केला नसावा. अन्नासाठीं खवळून ते मर्यादा सोडून उठले असावेत असें आह्मांस वाटतें.

प्रथमतः सरकारास हें कांहीं विशेष वाटलें नाहीं; पण आतां निकरास आल्या सारखें झालें तेव्हां सरकारानें याची चौकशी करण्याची व बंदोबस्ताचे उपाय योजण्याची तजवीज केली आहे. ह्मणजे एक कमिशन नेमिलें. त्यांत ज्या ज्या जिल्ह्यांत ही गडबड आहे तेथील कलेक्टर व पोलिस सुप्रिंटेंडेंट यांस मेंबर नेमून रिविन्यू कमिशनर साहेबांसही त्या कामीं योजिलें आहे. त्याप्रमाणें त्यांचे संकेत हो जिल्ह्यांत घोड नदीस या कमिशकचेरी लवकरच होणार आहे.

स्वा० ... तीन महिने झाले, स महाग ... आहे टोन्ही पिकें हातचीं गेलीं, व ते अतीशय दुबळे झाले आहेत. सबब त्यांकडे दुर्लक्ष्य केलें तर फार नाश होईल. व भयंकर रोग उत्पन्न होतील.

लोकांच्या निर्वाहाकरितां पाट बंधाऱ्याचीं कामें सुरू केलीं आहेत तीं:— भादलवाडी तलाव, निरेचा कालवा, अष्टीचा तलाव, ह्मसवडचा तलाव, मुचकुंदी तलाव, बेगम तलाव, आणि डोणीचा रिझर्वायर इतक्या ठिकाणीं कामें सुरू करण्याविषयीं मार्च्यांचे ६ वे तारखेस हुकूम दिले आहेत. तसेंच सोलापुराहून गदग पर्यंत रेलवे करण्याचें सांगशन केलें आहे. व गरज लागेल तर आणखीही कलादगी जिल्ह्यांत धरणाचीं कामें सुरू करण्याची सरकारची तयारी आहे.

मध्यभागचे रिविन्यू कमिशनरानीं ठिकठिकाणीं धर्मार्थ अन्न देण्याचीं स्थानें करावीं असें अगत्य आहे ह्मणून कळविल्यावरून ती ही गोष्ट मंजूर केली आहे. तसेंच स्यानिटरी कमिशनर मि० लम्स्डन साहेब यांचे हाताखालीं आणखी पुष्कळ लोक देऊन देशांत आरोग्य राहावें याविषयीं काळजी घेण्याची तजवीज केली आहे. व सर्व भागांतून आटवडेपत्रकें मागविलीं आहेत.

सरकारानें ही योग्य तजवीज केली. याबद्दल आह्मास संतोष वाटतो. व लोकांनीं ही वर्गण्या कराव्या असें आह्मी त्यांस सुचवितों.

ा सर्व ठिकाणीं ते जातील
मूळ कारण काय? उठले-
व ...री फिसाद आहे कीं का-
गा ...चेच बंड आहे किंवा
दोन श... आहे? व याच्या उप
भोईपासून ...जे या सर्व गो
आहे. व द... ते सरकारास
खा त्वरेनें कर...च इच्छितों
रेलवे ३६ मैल ...कीय कांहीं
ल रुंदीचें प्रमाण
त्यामुळें खर्च फार ... गोष्टी
मैलास २०००० रु ...गवून
जलें आहे. लोखंडाची ...भोह
उतरली आहे ह्मणून ३ ...द्ो
प्रस्तुत मोठी सोय झाली ...रु
एंजिनामागें २० गाड्या ...
कींत ३ टन वजन असतें.
सास ८ मैल याप्रमाणानें ...
पासून पालीपर्यंत रेलवे ३
झालेला आहे. त्यावर उत्पन्न
पेक्षां अधिक होतें असें आढ...
बडोदा सरकारानें ही टूम चां...
व अशा लहान रेलवे ठिकठिक
तर फार चांगलें होईल.

---

च गडबड वीस वर्षांमागें केली होती व एका पोलिस सुप्रिंटेंडेंटास ठार मारिलें होतें. त्याला ही पुढें सरकारानें धरून त्याचें शासन केलें.

च्याळीस वर्षांमागें मद्रासेकडील क्याप्टन म्याकिंटाश यांनीं रामोशी लोकांविषयीं माहितीचा एक लेख लिहून सरकारांत पाठविला आहे त्यांत हे लोक पूर्वीपेक्षां आतां कमी झाले आहेत तरी यांची संख्या १३००० आहे असें लिहिलें आहे. पुणें व सातारा जिल्ह्यांत यांची वस्ती फार. पेशवाई मोडून इंग्रजी झाली तेव्हां या लोकांविषयीं सरकारानें अशी तजवीज काढली कीं गावचे संरक्षणास ह्मणजे जागल्याचे कामीं यांनां ठेवावें. व खानगी बंगल्यावरूनही ते रामोशी लोक पहाऱ्यावर ठेवूं लागले त्यावरून मुंबईकडे व अन्यत्रही पाहरेकरी ह्मणजे रामोशी असा शब्द होऊन गेला आहे.. मग त्या कामावर ब्राह्मण, शूद्र, मुसल्मान असला तरी त्याला रामोशी ह्मणतात असें आह्मी कोठें कोठें ऐकिलें आहे. चोरापासून संरक्षण करण्यासाठीं चोरास (रामोशास) नोकर ठेविले ही गोष्ट चमत्कारिक दिसते; पण हिचा परिणाम चांगला झाला. नोकर राहिलेला रामोशी धन्याचे मालाची कधीं चोरी करणार नाहीं असा त्यांचा बाणा झाला व त्याप्रमाणें अजून वहिवाट चालू आहे.

हल्लीं जो रामोशांचा दंगा सुरू झाला आहे त्याला ते अन्नास मोताद झाले हेंच आहे व सरकारानें या गोष्टीकडे लक्ष्य देऊन त्यांची सोय करावी असें आमचें सरकारास सांगणें आहे, पुष्कळ रामोशी लोक शेती करून आहेत; पण आज तीन वर्षें त्यांचे शेतांतून कांहीं उत्पन्न होत नसून सरकारचा शेतसाऱ्याविषयींचा जबरदस्त तगादा त्यांमागें आहे, व त्यांस कर्ज वाम मिळत नसून मोल मजुरीचा धंदाही मिळत नाहीं. तेव्हां ते आपले जातीवर गेले असें ह्मणतात. असें असेल तर सरकारानें दुष्काळग्रस्त प्रांतांतून शेतसारा सवलतीनें घ्यावा किंवा मुळींच माफ करावा, व त्यांनां अन्नाचे सोईस लावावें. मनुष्य पोटानें गांजले जाऊन जिवावर उदार झालें ह्मणजे कायद्यानाही मानित नाहीं. अशी स्थिति आहे तर सरकारानेंच त्यांचें रक्षण केलें पाहिजे.

---

## राक आयल अथवा केरोसीन तेल.

आमचे सर्व वाचकांस ठाऊक झालेंच असेल कीं, अलिकडे या तेलाचा प्रसार आपले देशांत बहुत झाला आहे. कुणबी, माळी, तेली, तांबोळी देखील आपले घरीं या तेलाच्या चिमण्या लावितात, व ज्यांस चिमण्या मिळत नाहींत किंवा अधिक खर्चाच्या वाटतात ते पितळेचे, लोखंडी वगैरे साधे दिवे निदान बाटल्यांवर बत्त्या बसवून तेणकरून ा तेलाचा उपयोग करूं लागले आहेत. ...ायती वस्तु वापरूं नयेत अशी आह्मी म-

---

बडोद्याकडे खोट्या नोटी करणारा कर्ति नाहीं. व हें तेल एरवींच्या दि-
मुसल्मान पकडला आहे. हा फोटोग्राफ्या तेलापेक्षां फार स्वस्त आहे व याचा
लून विलायतेहून जाऊन आलेला आहेश फार चांगला पडतो ह्मणून हें यांनीं
ह जार रुपयांची एकेक अशा ६० खोल्ई च ाळ आहे; पण याजबद्दल फा
नोटी केलेल्या पोलिसानें पकडल्या, री ठेविली पाहिजे. ती ठेविली
त्या तयार करण्याचें सर्व सामानही पकडलें

नाहीं तर प्राणनाश होतात. व वित्तविषयाचें नुकसान होतें. एक तर या तेलाच्या डब्याच्या जागीं दिवा बिलकूल नेऊं नये. हें फार जलद ज्वालग्राही आहे ह्मणून पेट केव्हां व कसें घेतें तें कळत नाहीं. सबब डब्यांतून तेल वेगळें काढून घेणें तें दिवसा उजेडीं घेणें फार चांगलें. व डबा ठेवणें तो वरदळीच्या जागेच्या वेगळा ठेवित जावा, चिमणी पुसणें, तेल घालणें दिवा लहान मोठा करणें व तो विजविणें हीं कामें करवतील तर मालकानें स्वतां केलीं पाहिजेत किंवा फार काळजीच्या मनुष्याकडून करविलीं पाहिजेत. ह्मणजे फारसा धोका नाहीं.

या दिव्यापासून वाचणाराचे डोळ्यास त्रास होतो हा गैरफायदा आहे; पण वाचणारांची त्यांतून फार बारीक ह्मणजे इंग्रजी वाचणारांची संख्या आपले देशांत तूर्त फार कमी आहे ह्मणून बहुतांस त्यापासून अनुपयोग नाहीं. जपलें मात्र पाहिजे एवढेंच आमचें सांगणें आहे. मागें दोन तीन ठिकाणीं या तेलापासून भयंकर परिणाम झाल्याच्या गोष्टी आह्मी लिहिल्या होत्या. व गेल्या आठवड्यांत आमचे अकोल्यासही एक मनुष्य या तेलाच्या पेट घेण्यापासून दगावला सबब सर्वांस आह्मी सावध करितों. नाश केव्हां होईल हें पूर्वी कळत नसतें; तरी सर्वकाळ सावधगिरी ठेवणें बिलकूल गैरफायद्याचें नाहीं हें सर्वांनीं लक्ष्यांत ठेवावें.

---

## अफगाणिस्थान

हें प्रकरण आज कित्येक महिने चालू आहे. मोठिशी लढाई नाहीं तरी हमेशा छांटूं चालूच आहे. व अफगाण लोकांचा आमच्या सैन्यानें पराभव केला अशीं वर्तमानें येत आहेत. फौजा पुढें चाल न करितां जेतावातानें शत्रूस रोखून आहेत. याकुबखान काय करितो आहे व थेट काबुलावर फौजा जाणार किंवा नाहीं याविषयीं तथ्य मजकूर गुप्त आहेत व विलायतेस याविषयीं वादविवाद चालू आहेत. लढाई हल्लीं चालू आहे असें दिसत नाहीं व मिटली आहे असेंही ह्मणवत नाहीं. अफगाणीस्थानांतील जीं दोन स्थळें व घाट रस्ते इंग्लिश सरकारानें हस्तगत केले तेवढे पुष्कळ झाले त्याचा बंदोबस्त राखावा व काबुल सर करण्याच्या भरीस पडूं नये. अफगाणी स्थानांत बंदोबस्ताकरितां चाळीस हजार फौज पाहिजे व तिचे खर्चाचा बोजा हिंदुस्थानाला सहन न होण्यासारखा आहे, शिवाय काबुलच्या अमिरानें आपण होऊन इंग्लिश सरकारचें कांहीं वाईट केलें नाहीं, व तो आतां मरणही पावला सबब युद्ध संग्राम बंद करावा. व घाट रस्त्याचा बंदोबस्त ठेवून रशिया वगैरे शत्रू हिंदुस्थानाकडे न येतील एवढ्यावर परवी ठेवावी ह्मणजे बस आहे असे विचार विलायतेंत हल्लीं चालू आहेत व सैन्य पुढें ढकलण्याविषयीं हुकूम आलेले नाहींत व तहाचे बोलणेंही चालू असल्याची वार्ता आहे यावरून हें अफगाणस्थानचें युद्धप्रकरण आतां अधिक माजेल असें दिसत नाहीं. व लवकरच तह होऊन सर्व खटाटोप मिटेल असें वाटतें.

ब्रह्मदेशांत गडबड आहे, आफ्रिका खंडां

---

## झुलू प्रकरण.

आफ्रिकाखंडांत हें एक लढाईचें प्रकरण कसेंच माजलें आहे. या रानटी लोकांशीं आ

त गडबड आहे, अफगाणीस्थानांत लढाई झालेलीच आहे, रशिया व चीन यांच्यांत कुरापती चालू आहेत, हिंदुस्थानांत वर्षानुवर्ष दुष्काळ पडतच आहेत. अशीं सर्व अस्वस्थतेचीं लक्षणें मनांत आणून आमचे इंग्लिश सरकार आतां लढाईचें पाऊल पुढें न ठेवण्याचें करील तर फार चांगलें व परमेश्वर त्यांस तशी बुद्धि देवो असें आह्मी इच्छितों.

## दुष्काळ निवारणार्थ तजविजी.

मुंबई इलाख्यांत या वर्षी चांगला पाऊस पडून पिकें आलीं असतां तीं उंदरानीं खाऊन फस्त केलीं व लोक अन्नास मोताद झाले मिळून सतत तीन वर्षे तिकडे ईश्वराच्या अवकृपेनें क्षोभ झाला आहे याबदलचीं वर्तमानें वाचून आह्मास फार वाईट वाटतें. सरकारानें या कामीं विशेष लक्ष पुरविलें नव्हतें; पण तेंही योग्य वेळीं आतां पुरलें जाऊन सरकारानें विपत्तीग्रस्तांस सहाय देण्याकरितां कंबर बांधिली हें पाहून आह्मास संतोष वाटतो.

मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब बहादूर यांनीं तारीख १० एप्रिलचे मिन्युट लिहिलें आहे त्यांत ठराव केला आहे कीं, दक्षिण देशाचा पूर्वभाग ह्मणजे बहुतेक सोलापुर जिल्हा, पुणें, सातारें जिल्ह्याचा पूर्वभाग. कलादगी जिल्ह्याचा कांहीं भाग, व धारवाड जिल्ह्याचा पूर्व भाग यांत लोक अन्नास महाग झाले, त्यांचीं सालमजकूरचीं दोन्ही पिकें हातचीं गेलीं, व ते अतिशय दुबळे झाले आहेत. सबब त्यांकडे दुर्लक्ष्य केलें तर फार नाश होईल. व भयंकर रोग उत्पन्न होतील.

लोकांच्या निर्वाहाकरितां पाट बंधाऱ्याचीं कामें सुरू केलीं आहेत तीं:— भादलवाडी तलाव, निरेचा कालवा, अष्टीचा तलाव, ह्मसवडचा तलाव, मुचकुंदी तलाव, बेगम तलाव, आणि डोणीचा रिझर्वायर इतक्या ठिकाणीं कामें सुरू करण्याविषयीं मार्च्याचे ६ वे तारखेस हुकूम दिले आहेत. तसेंच सोलापुराहून गदक पर्यंत रेलवे करण्याचें सांगशन केलें आहे. व गरज लागेल तर आणखीही कलादगी जिल्ह्यांत धरणाचीं कामें सुरू करण्याची सरकारची तयारी आहे.

मध्यभागचे रिविन्यू कमिशनरानीं ठिकठिकाणीं धर्मार्थ अन्न देण्याचीं स्थानें करावीं असें अगत्य आहे ह्मणून कळविल्यावरून तीही गोष्ट मंजूर केली आहे. तसेंच स्यानिटरी कमिशनर मि० लमस्डन साहेब यांचे हाताखालीं आणखी पुष्कळ लोक देऊन देशांत आरोग्य राहावें याविषयीं काळजी घेण्याची तजवीज केली आहे. व सर्व भागांतून आठवडेपत्रकें मागविलीं आहेत.

सरकारानें ही योग्य तजवीज केली. याबदल आह्मास संतोष वाटतो. व लोकांनीं ही वर्गण्या कराव्या असें आह्मी त्यांस सुचवितों.

## झूलू प्रकरण.

आफ्रिकाखंडांत हें एक लढाईचें प्रकरण बरेंच माजलें आहे. या रानटी लोकाशीं आमचे इंग्लिश सरकार लढाइ करीत आहे. ते हजारों लोकांच्या जमावानिशीं येऊन सरकारच्या थोड्या फौजेवर येऊन तुटून पडतात व तिचा नाश करितात. दोन महिन्यां मागें पुष्कळ युरोपियन आफिसर व शिपाई त्यांनीं ठार मारल्याविषयींचें वर्तमान प्रसिद्ध झालेंच आहे. त्या पुढें मार्च महिन्यांत १२ वे तारखेस ४००० झुलू लोकांनीं एका पलटणीवर चाल केली व तींतील एक क्यापटन आणि ४० लोक मारले. व २० लोकांचा पत्ता नाहीं. नंतर ६००० फौज तेथील सैन्याच्या मदतीस गेली. लुनेबर्ग एथेंही २०००० झुलू लोकांनीं कर्नल वुड यांच्या हाताखालच्या फौजेवर हल्ला केला पण त्यांत त्यांचाच पराभव झाला असें ह्मणतात. तरी सरकारचे सात आफिसर व ७२ लोक ठार झाले. नंतर लार्ड चेम्स फोर्ड यांनीं जिंगोलेवा एथें एप्रिलचे दुसरे तारखेस मोठी लढाई करून १२००० झुलू लोक ठार मारले असें ह्मणतात.

याही प्रकरणाविषयीं विलायतेंत मोठी वाटाघाट चालू आहे. व सर बार्टल फ्रियर यांस लोक दोष देत आहेत. तसेंच सेनापती लार्ड चेम्सफोर्ड यांचीही नाचक्की विलायतेंतील लोकांच्या बोलण्यांत आहे. या दोघांही आफिसरांस मार्गे जावें लागेल, किंवा त्यांतून कोणी आपण होऊन राजिनामा देतील असें ह्मणतात. याविषयीं सविस्तर पुढें लिहू.

## बडोद्याकडील लहान रेलवे.

मुंबईहून गुजराथ प्रांतांत एक मोठी रेलवे "बांबे वडोदा आणि सेंट्रल इंडिया" या नावाची गेली आहे. तिला जोडून बडोद्याच्या गायकवाड सरकारानीं आपल्या राज्यांत एक दोन शाखा केल्या आहेत. त्यांतील एक दभोईपासून चांडोळपर्यंत नुकतीच सुरू झाली आहे. व दभोईपासून भदरपुराकडे दुसरी शाखा त्वरेनें करण्याचें काम चालू आहे. ही रेलवे ३६ मैल आहे. हिच्या दोन रेलांमधील रुंदीचें प्रमाण अडीच फुटाचें धरलें आहे त्यामुळें खर्च फार कमी लागतो. ह्मणजे दर मैलास २०००० रुपये लागतात असें समजलें आहे. लोखंडाची किंमत हल्लीं बरीच उतरली आहे ह्मणून असे रेलवे करण्याची प्रस्तुत मोठी सोय झाली आहे. या रेलवेवर एंजिनामागें २० गाड्या जोडतात. त्या प्रत्येकींत ३ टन वजन असतें. व ही गाडी तासास ८ मैल याप्रमाणानें चालते. आनंदापासून पालीपर्यंत रेलवे ३ वर्षांपूर्वी तयार झालेला आहे. त्यावर उत्पन्न थोरल्या रेलवेपेक्षां अधिक होतें असें आढळून आलें आहे बडोदा सरकारानें ही टूम चांगली काढली व अशा लहान रेलवे ठिकठिकाणीं झाल्या तर फार चांगलें होईल.

बडोद्याकडे खोट्या नोटी करणारा एक मुसलमान पकडला आहे. हा फोटोग्राफर असून विलायतेहून जाऊन आलेला आहे. यानें हजार रुपयांची एकेक अशा ६० खोट्या नोटी केलेल्या पोलिसानें पकडल्या, व त्या तयार करण्याचें सर्व सामानही पकडलें. खऱ्या नोटीचे फोटोग्राफ घेऊन त्यांना एक प्रकारच्या मिश्रणाचे रंग देऊन हुबेहूब खोट्या नोटी बनविल्या आहेत. त्या ओळखून काढण्यासही प्रयास पडतात. पुण्यास खोट्या नोटी करणारे डावरे प्रारंभ्धारा अ.ले होते त्या मागें या मुसलमान भाईनीं हें कृत्य आरंभिलें होतें; पण लवकरच पकडलें गेले हें फार चांगलें झालें. त्याची चौकशी आतां लवकरच होईल.

## वऱ्हाड.

मि० जे. एच बर्नी फर्स्ट क्लास एकस्ट्रा-आसिस्टंट कमिशनर यांस १९ वे तारखेपासून १८ महिन्यांची फर्लो रजा मिळाली.

सन १८६९ चे ११ वे कायद्याप्रमाणें मि० एच एस निकोलेट्स यांस अमरावतीच्या स्मालकाज कोर्टाचे दावे पहाण्याचा अधिकार दिला.

मेजर डब्ल्यु लाटण अकोल्याचे अफिशियेटिंग डिपुटी कमिशनर व मेजर आर. एस. थामसन बुलढाण्याचे आफिशियेटिग डिपुटी कमिशनर यांस खालीं लिहिलेले अधिकार मिळाले.

१ क्रिमिनल प्रोसेजर कायद्याचे ३६ वे कलमाप्रमाणें गुन्ह्यांची चौकशी करणें.

२ हरएक प्रकारचे आणि कोणत्याही रकमेचे दिवाणी दावे डिस्ट्रिक्ट जडज या नात्यानें घेणें व त्याची चौकशी करणें, तसेंच हजार रुपयांच्या अधिकारांच्या सिविल जडजाच्या मूळ फैसल्यावर अपील घेणें.

३ क्रिमिनल प्रोसेजर कलम २७ प्रमाणें सेकंड व थर्ड क्लास माजिस्त्रेटचे ठरावावर अपील घेऊन त्यांची संक्षिप्त चौकशी करणें.

कर्नल अलेक्झांडर साहेब रजेवर गेले सबब मि० टी हामिलटन साहेब फर्स्ट ग्रेड एक्झिक्युटिव इंजिनियर यांस आफिशियेटिंग सुप्रिंटेंडिंग इंजिनियर नेमिलें व गेले महिन्याचे २८ वे तारखेस ते आपले कामावर रुजू झाले.

अमरावती आणि इलिचपुर यांचे दरम्यान या महिन्याचे १९ वे तारखेपासून तांग्याची डाक सुरू केल्याविषयीं रेसिडेन्सी आर्डर मध्यें जाहिरात प्रसिद्ध झाली आहे.

मार्च महिन्याचा आरोग्याविषयींचा रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून कळतें कीं, उमरावती, इलिचपुर, वणी, अकोला आणि बुलढाणा या पांचही जिल्ह्यांत तापाचा आजार होता. व बुलढाणें अकोला आणि वाशीम या जिल्ह्यांत गुरांनां रोग होता.

मि० नौलिस साहेब विलायतचे रजेवरून मुंबईस आलले गुरुवारीं एथें आले. व त्यांची नेमणूक वाशिमास आफिशियेटिंग डिपुटी कमिशनरच्या जागीं झाल्याप्रमाणें ते तिकडे गेले.

एथील नेटिव जनरल लायब्ररीला एक इमारत बांधावी असा विच्यार चालू आहे. व तसें घडून आल्यास राव बहादूर नारायणभाई डायरेक्टर हे इमारतीला लागेल तो खर्च देणार आहेत हें त्यांचें औदार्य पाहून आह्मास संतोष वाटतो.

जुने तारागावकरांनीं बभ्रुवान, गोरख व नृसिंह, यांविषयीं काल थोडे प्रयोग केले. हा यांचा खेळ शेवटचा होता पण स्त्रीमिश्र नाटककारांचा खेळ कांहीं विशेष कारणामुळें काल झाला नाहीं ह्मणून जुन्यांचा पुन्हा होईल.

रा. रा. गंगाधर वासुदेव निभोणकर डायरेक्टर साहेबांचे हेड क्लार्क मुलीचे लग्नाकरितां गुरुवारीं रजा घेऊन सिन्नरकडे गेले.

मेजर फ्यारर साहेब वाशिमचे डिपुटी कमिशनर यांस मेजर लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल आफ पोलिस हे रजेवर जात आहेत. त्यांचे जागीं तूर्त नेमिलें.

यवतमाळाकडे " पब्लिकवर्कस" खात्याकडून तिकडील लोकांची स्थिति फार वाईट झाली आहे ह्मणून लवकर रिलिफ वर्कस सुरू होणार आहे.

मेजर लेन साहेब इ० ज० आफ पोलिस यांची स्वारी यवतमाळाकडे गेली आहे.

मे० राईट साहेब पोलिस सुपरइंनटेंडेंट गेल्या आठवड्यांत मूर्तिजापुरास डाक लुटण्याच्या कामांत तपासाकरितां गेले होते. ते व पोलिस इन्स्पेक्टर उभयतां परत आल्याचें समजतें. तपासा अंती डाक खरोखर लुटली नसून डाक घेऊन जाणाराचीच लबाडी असावी असा संशय उत्पन्न झाला. त्यावरून सदहू डाकवाल्या शिपायावर विश्वास घाताची फिर्याद मूर्तिजापुरास चालणार ह्मणून समजतें.

मेजर लेन साहेब मे महिन्यांच्या आरंभीच रजेवर जाणार यांच्या जाग्यावर कोण येणार हें अजून समजत नाहीं. परंतु बाजार गप्प अशी आहे कीं, हैदराबादेहून कर्नल मेन ह्यांच्या जाग्यवर येणार. ह्या जाग्यास खरोखर हक्कदार मे० राईट साहेब उमरावती एथील पोलिस सुपरइंनटेंडेंट हे सिनियर असल्यामुळें आहेत. प्र. सि.

वाशिमच्या डे. क. चे हेड क्लार्क मि० मेन हे लवकरच पेनशन घेणार त्यांचे जागीं येथील डे. क. अफिसांतील १०० रुपयाचे क्लार्क मि. थामसन ह्यांस नेमणार असें कळतें.

वऱ्हाडांत एक इन्स्पेक्टर आफ रेजिस्ट्रेशनची १२५ ची स्वतंत्र जागा करण्याविषयीं सांगशन झालें आहे. तसेंच डिस्ट्रिक्ट रेजिस्ट्रारानां एकेक २९ पासून ३९ पर्यंत इंग्लिश जाणणारा क्लार्क द्याना असा विषयीं ही मंजुरात झाल्याचें कळतें.

## वर्तमानसार.

इंग्लंडच्या राजघराण्यांतील पुरुष शनिवारीं विशेष मरतात असा १६७ वर्षांतील शोध एकानें लिहिला आहे. तिसरा विलियम राजा सन १७१२त मार्चाचे १८वे तारखेस शनिवारीं मरण पावला. कुईन आनी सन १७१४त आगष्टचे १ले तारखेस शनिवारीं मरण पावली. पाहिला जार्ज सन १७२७ चे जूनचे १०वे तारखेस शनिवारीं मरण

पावला. दुसरा जार्ज सन १७६०चे आक्टोबरचे २५वे तारखेस शनिवारीं मरण पावला. तिसरा जार्ज सन १८२०चे जानेवारीचे २९वे तारखेस शनिवारीं मरण पावला. चवथा जार्ज सन १८३० चे जूनचे २६वे तारखेस शनिवारीं मरण पावला. केंटची डचेस सन १८६१चे मार्चाचे १६वे तारखेस शनिवारीं मरण पावली.. प्रिन्स कान्सर्ट सन १८६१चे डिसेंबरचे १४वे तारखेस शनिवारीं मरण पावले; आणि प्रिन्सेस अलाइस सन १८७८चे डिसेंबरचे १४वे तारखेस शनिवारीं मरण पावली.

व्हाइसराय साहेबांची स्वारी लाहोराहून सिमल्यास गेली.

काठेवाडाहून दुष्काळग्रस्त लोक मुंबईस पुष्कळ येऊं लागले आहेत. बोरीबंदरावर हल्ली ५००० हे लोक तळ देऊन राहिले आहेत.

सोलापुराकडे व इंदापुराकडे दुष्काळाचा तडाका सुरू झाला आहे. याही वर्षीं तिकडे पिकें तयार होऊन उंदरांचे उपद्रवानें लोकांचे हातीं लागलीं नाहींत. त्यामुळें लोक उपाशीं मरूं लागले आहेत. व सोलापुराकडे लोकांस जगविण्यासाठीं कामें सरकार काढूं लागलें आहे. इंदापुराकडे कांहीं तजवीज झाल्याचें अजून कळत नाहीं. लोकांचे हलाखीची आरोळी फार आहे.

गुजराथेंत दुष्काळ आहे. व अमदाबादेकडे लोकांस उपाशीं न मरूं देण्याच्या खटपटी सुरू झाल्या आहेत.

मुंबईचे दिवाळखोरनारायण नरसी केशवजी यांस पकडून पाठविण्याविषयीं मुंबई सरकारानें गोवे सरकारास लिहिलें त्यानीं त्याचे तीन साथीदार पकडले आहेत. व त्यांच्या जवळ नरसीचा असलेला माल व रोख रुपये २६०० पाठविले आहेत. नरसी तेथें नाहीं, व ह्या लोकांस पाठवावें किंवा कसें ह्मणून गोवे सरकारानें मुंबई सरकारास विचारिलें आहे.

हिंदुस्थान सरकार पब्लिकवर्क्स खात्यांत खर्च कमी करणार त्यामुळें सुमार २०० इंजिनियर आफिसर रिकामे होण्याचा संभव आहे. हें फुगलेलें खातें झडविण्याची सरकारानें चांगली वेळ आणिली आहे असें एका इंग्लिश पत्रांत लिहिलें आहे. या खात्यांत सरकारचा पैसा कसा व्यर्थ खर्च होत आहे हें पुढील एका गोष्टीवरून ध्यानांत आणावें. दिनापुर आणि ब्यांकीपुर हें एक स्टेशन आहे तेथें ४ एक्झिक्युटीव इंजिनियर आहेत. एक लश्करी खात्याकडे, एक जनरल व प्राविन्सियल खात्याकडे, एक इरिगेशन खात्याकडे व एक रेल्वे खात्याकडे आहे. या शिवाय जिल्ह्याचा रोडसेस इंजिनियर पांचवा आहे. यांनां मोठमोठाले पगार आहेत, त्यांच्या हाताखालीं मोठमोठाले दुसरे इंजिनियर आफिसर आहेत, सबार्डिनेट्स आहेत व मोठमोठाले आफीस खर्च आहेत सबब यांत छाट झाला पाहिजेच.

कलकत्यास ट्रामवेच्या गाड्या वाफेच्या यंत्रानें चालू करण्याचा विचार आहे. कारण घोडे चांगले मिळत नाहींत, फ्रान्स व स्काटलंड यांजमध्यें वाफेच्या यंत्रानेंच ट्रामवेच्या गाड्या चालतात.

मि० मोतीलाल सुरतेचे पोलिस इन्स्पेक्टर जे तेथील लायसेन्स ख्यावसाच्या दंग्याच्या वेळी विशेष प्रसिद्धीस आले त्यांनीं सन १८६७ सालच्या दंड्याचे प्रसंगीं सरकारास पुष्कळ मदत केली होती त्याबद्दल त्यांनां तीन हजार रुपये बक्षिस देण्याचे शिल्लक राहिले होते ते आतां त्यांस दिले, पण त्या करितां विशेष समारंभ वगैरे कांहीं झाला नाहीं. पोलिस सुपरिंटेंडेंट साहेबानीं आपले बंगल्यावर शिपाई लोकांसमक्ष त्यांनां बक्षिशी दिली असें कळतें.

टाइम्स आफ इंडिया नावाचें जें मुंबईस इंग्रजी वर्तमानपत्र आहे तें प्रथम सन १८३७ त निघालें. व पहिल्यानें आठवड्यांतून दोनदा निघत होतें. व सन १८५१ सालीं नित्याचें निघूं लागलें.

हिशेबाच्या सन १८७८–७९ सालाच्या पहिल्या ११ महिन्यांत परदेशांतून एकंदर ३५,०१,३८,२४२ रुपयांचें सामान हिंदुस्थानांत आलें व याच्या मागील वर्षांत इतक्याच काळांत ३७,९५,१२,५१४ रुपयांचें आलें होतें. तसेंच ५,०९,००,४२२ रुपयांचा माल हिंदुस्थानांतून परदेशांत गेला. व मागील वर्षांत इतक्याच काळांत ५८,७८,६९,३२३ रुपयांचा गेला होता. तसेंच आयातीचे जकातीचें उत्पन्न ३,६६,७५,७१० रुपये झालें होतें व मागील वर्षीं इतक्याच काळांत ४१२०९९९७ रु० व निर्गतीचे जकातीचें उत्पन्न सदहू सालांत ४९,१९,३२८ व मागील वर्षीं इतक्याच काळांत ४४.८२,८८८ रुपये झालें होतें. ने. ओ.

---

## जाहिरात.

## वैद्यसुधाकर.

हा नवीन ग्रंथ शिळेछापावर छापून विक्रीस तयार झाला आहे यांत वैद्यकासंबंधी सर्व अवश्यकतेचे अनुभवशीर विषय असून सर्व ठिकाणीं मिळण्यासारख्या अशा सुलभ औषधांची योजना झाली आहे. यांतील सारांश येणेंप्रमाणें:—कोश, नित्यवर्तनक्रम यांत मनुष्यानें प्रातःकाळपासून निजेपर्यंत कसें वर्तावें, स्त्रियांचा ऋतुकाल, शुक्र व स्त्रीरज यांचीं लक्षणें, डोहाळ्यावरून गर्भिणीचे व गर्भाचे नियम, अष्टविधा परीक्षा ( नाडी इत्यादि) व सामुद्रिक लक्षण, वैद्यास सूचना, औषधी आणावयास, तयार करण्यास, व देण्यास मुहूर्त, रोग्यास स्नान करण्यास मुहूर्त, औषधी आणावयाचा प्रकार, औषधी युक्तायुक्तीविचार औषधादिकांचें मान, औषधीप्रतिनिधी, औषधसेवनकाल, सहा रसांचे गुण, देशकाल लक्षण, वायु, पित्त, कफ, यांचा प्रादुर्भाव, औषध घेण्याचा प्रकार, देश मानाचा प्रकार, ओकारी व ढाळाचा विधी, धातुपुष्टीची व कामोत्पत्तीचीं औषधें, तऱ्हे तऱ्हेचे पाक, चाटण, चूर्ण, मात्रा, रस, गोळ्या, धातूचीं भस्में करण्याचा प्रकार, यंत्राच्या आकृति. प्रकरण, प्रत्येक खाण्याचे जिनसांत ( भाजी पाला फळफळावळ इ० ) गुणदोष काय आहेत त्यांचें स्पष्टीकरण, सोमल, सर्प, कुत्रें, उंदीर, विंचू, वगैरेच्या विषावर तर फारच उत्तम योजना झाली आहे. सर्व रोगांवर औषधी व पथ्यापथ्य. या एकाच ग्रंथाच्या संग्रहानें अनेक ग्रंथांचे श्रेय येणार आहे यांत संशय नाहीं. याची किंमत एक रुपया चार आणे. पोष्टेजाबद्दल १ आणा अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

रंगनाथ सखाराम लाळे किकवीकर.

---

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचें औषधाच्या डब्या विक्रीवास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत मिसळून गंधाचे उटी प्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ८६ आणे.

हें औषध गजकरण शिवाय करून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षां पूर्वीं आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यापासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलीकडे सदहू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत. तारीख १० माहे अक्टोबर सन १८७८ इसवी.

---

## नोटिसा

---

चंद्रभान वल्लद हरसिंगजी पाटील मौजे माणकी प्रगणे बाळापुर तालुके व जिल्हे अकोलें यास रावजी वल्लद महादाजी माळी रहाणार मौजे मजकूर तालुके व जिल्हे मजकूर याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं, तुह्मी तारीख ६ एप्रिल सन १८७९ इसवीची नोटिस तारीख १३ एप्रिलचे वऱ्हाडसमाचारांतून दिली तीचें उत्तर येणेंप्रमाणें.—

आह्मी तुह्मावर सालबंदी करितां फिर्याद केली होती तेव्हां कोर्टानें ठराव केला कीं, ७५ रुपये रोख देऊन प्रत्येक मार्गशीर्ष शुद्ध ५ स दरसाल १०० रुपये प्रमाणें पांच वर्षांत ५०० रुपये द्यावे असा केला, परंतु सदहू ठरावाप्रमाणें देखील तुह्मी वर्तन केलें नाहीं ह्मणून फक्त ७५ रुपये तुह्मी कोर्टांत भरले पण १०० रुपये गेले मार्गशीर्षांत दिले नाहींत ह्मणून पुन्हा तुह्मावर एकदम सालबंदी करितां फिर्याद करण्याचा प्रसंग येईल असें वाटतें. तुह्मी आह्मास कळवितां कीं आह्मी रुपये बिलंदरवा जवळ ठेविले त्याजवळून मागून घ्यावे परंतु या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं तुह्मी असामी जयत असतां आह्मांस दुसऱ्याला रुपये मागावयास जाण्याची गरज नाहीं. तुह्मी करारास रुपये आणून द्यावे व कायदेशीर पावती घ्यावी हें तुमचें कर्तव्य आहे. आतां एकंदरीनें पहातां तुह्मी केलेल्या करारा प्रमाणें वागणार नाहीं असें मागील अनुमानावरून दिसून येतें ह्मणजे प्रयम तुह्मावर ७५३८= सातशें त्रेपन रुपये दोन आण्याचा फैसल सुमार तीन वर्षांपूर्वीं आह्मी मिळविला ते रुपये तुह्मी सालबंदीनें देण्याचा करार केला व तुह्मी आपलीं ३ शेतें गहाण लावून दिलीं. पण आमचे सालबंदीचे रुपये न देतां उलट शेतें मात्र दुसऱ्यास खरेदि लिहून दिलीं. व पुन्हाही तीं शेतें तुह्मी विक्री करण्यास काढिल्याचें ऐकिवांत आहे व आमचे रुपये देत नाहीं ह्मणून आह्मांस तुमचे बोलण्यावर विश्वास ठेववत नाहीं व तुह्मांस कर्जही पुष्कळ आहे व जिनगी पाहिली तर घरसुद्धां दुसऱ्याला नोंदून दिलें आहे. तर ही नोटिस पावल्यापासून ७ दिवसांचे आंत आमचे रुपयांची अदाई करावी व कायदेशीर पावती घ्यावी, नाहीं पेक्षां कोर्ट मार्फत फिर्याद करून व्याजासुद्धां रुपये वसूल करण्यांत येतील. तुह्मी नोटिशींत लिहितां कीं ४३ रुपये आह्मी हिसकून घेतले. पण या लिहिण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या ४३ रुपयासाठीं तुह्मी गेले महिन्यांत आह्मावर फौजदारीही केली होती परंतु तेथें योग्य इनसाफ होऊन तुह्मी खोटे ठरले तेव्हां त्या लिहिण्यांत कांहीं अर्थ नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल. कळावें. तारीख २३ माहे एप्रिल सन १८७९ इसवी.

( सही ) रावजी वल्लद महादाजी माळी रहाणार माणकी
दस्तुर खुद.

---

## नोटिस.

हनवतगीर गुरु ध्यानगीर गोसावी रहाणार दहिगाव तर्फ सुर्जी अंजनगाव तालुके दर्यापुर जिल्हे इलिचपुर यास रामगीर गुरु हरीगीर गोसावी रहाणार मौजे वासिंब तर्फ बोरगाव मंजू तालुके व जिल्हे अकोलें याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे बुलकी नामें कन्येचें तुमचे मंगलगीर नामें मुलाशीं लग्न होऊन सुमार ८ वर्षे झालीं पण सदहू मुदतींत आमचे मुलीची ने आण तुमचे कडून अथवा तुमचे मुलाकडून झाली नाहीं. इतकेंच नाहीं तर तुमचा मुलगा तीर्थ यात्रा करीत फिरत असून तुह्मी तिचे खाण्यापिण्याची सुद्धां फिकीर ठेवित नाहीं तेणेंकरून गेले आठ वर्षांत तिचे अन्नवस्त्राबद्दल मला २०० रुपये खर्च आला आहे तो आणून देऊन मुलीला घेऊन जावें तिला चांगलें प्रकारें वागवावें. तुह्माकडून व तुमचे मुलाकडून तिला वागविण्याचें होत नसल्यास ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचें आंत खाणें खर्चाबद्दल २०० रुपये व लग्नामध्यें तुह्मास दिलेले १५० रुपये असे ३५० रुपये वर दिलेल्या मुदतींत आणून द्यावे न दिल्यास याबद्दल तातडीच फिर्याद केली जाईल व या पुढें मुलीचे अन्नवस्त्राबद्दल दरमहा दहा रुपये प्रमाणें भरून घेतला जाईल किंवा तुमचे मुलाचा लग्नसंबंधी हक्क रद्द करण्याची कायदेशीर तजवीज केली जाईल हें खूप समजावें. यावर तुमची कांहीं तक्रार असल्यास नोटिसीनें मुदतींत कळवावें. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें, तारीख १९ माहे एप्रिल सन १८७९ इ.

( सही ) रामगीर गुरु हरीगीर गोसावी
दस्तुर खुद.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.